सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २८८ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदुस्थान विश्वात भारत हा एकच असा देश आहे की ज्याची दुसऱ्याच्या सत्ता, संपत्तीवर कधीही नजर गेली नाही. प्रभू रामचंद्रांनी किष्किंधापती वालीचा वध केला आणि त्याचे बंधू सुग्रीव यास राज्यावर बसविले. सोन्याच्या लंकेवर विजय प्राप्त करून रावणाचा भाऊ बिभीषण यास सिंहासनावर बसविले.

- **भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# कोकाटेंची मंत्रिपदावरून हकालपट्टी

## ▸▸मुख्यमंत्र्यांच्या शिफारसीला राज्यपालांची मंजुरी ▸▸अटकेची टांगती तलवार कायम

**मुंबई, दि.१७ डिसेंबर**

राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सदनिका घोटाळा प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर हा महत्त्वपूर्ण टप्पा समोर आला असून आता माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिला असल्याची माहिती समोर आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटे यांचे क्रीडा खाते काढण्याची शिफारस राज्यपालांकडे केली होती. त्यानंतर आता कोकाटे यांचे खाते हे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे देण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच आता हे खाते कोणाकडे दिले जाणार याचा निर्णय हा अजित पवार यांच्याकडे असणार आहे. त्यामुळे क्रीडा खाते कोणाकडे दिले जाणार याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे. सदनिका घोटाळाप्रकरणी जिल्हा न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्यानंतर माणिकराव कोकाटे आज सकाळीच मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांच्यावर तिथे उपचार सुरू असल्याची माहिती आहे. नाशिक सत्र न्यायालयाने सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यामुळं माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली होती. विरोधी पक्ष माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झाले होते. कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मात्र, त्याची सुनावणी शुक्रवारी होणार आहे, त्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचं समोर आलं आहे. सदनिका घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज युक्तिवाद होऊन न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. तसेच, माणिकराव कोकाटे यांना कधी अटक केली जाणार हे पाहता येईल.



### लिलावती रुग्णालयात दाखल?

**»» माणिकराव कोकाटे लिलावती रुग्णालयात दाखल असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अकराव्या मजल्यावरील एका खोलीत त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. अटकेची टांगती तलवार असताना दुसरीकडे माणिकराव कोकाटे रुग्णालयात उपचारासाठी दाखल असल्यामुळे याविषयी विविध चर्चा रंगली आहे.** ■

# आता १० तास आधी लागणार आरक्षण चार्ट

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून आता तिकिटांची वेटिंग लिस्ट किंवा आरएसी स्थिती आधीपेक्षा लवकर समजणार आहे. पहिल्यांदाच रेल्वे बोर्डाने आरक्षण चार्ट तयार करण्याच्या वेळेत बदल केला. यामुळे प्रवाशांना ट्रेन सुटण्याच्या तब्बल १० तास आधी त्यांच्या तिकिटाची स्थिती कळू शकणार आहे.

नवीन नियमानुसार सकाळी ५ ते दुपारी २ वाजेदरम्यान सुटणाऱ्या गाड्यांसाठी पहिला आरक्षण चार्ट आदल्या दिवशी रात्री ८ वाजेपर्यंत तयार केला जाईल. दुपारी २.०१ ते रात्री ११.५९ आणि मध्यरात्री १२ ते पहाटे ५ वाजेपर्यंत सुटणाऱ्या गाड्यांसाठीचा चार्ट ट्रेन सुटण्याच्या १० तास आधी तयार केला जाईल. यापूर्वी हा चार्ट केवळ चार तास आधी बनविला जात होता. जुन्या पद्धतीमुळे वेटिंग लिस्ट किंवा आरएसीमध्ये असलेल्या प्रवाशांना शेवटच्या क्षणापर्यंत तिकीट कन्फर्म झाले की नाही, याची माहिती मिळत नव्हती. अनेक प्रवासी दूरवरून स्टेशनवर पोहोचायचे आणि नंतर तिकीट कन्फर्म नसल्याचे समजायचे. यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक तणाव वाढत होता. विशेषतः दुर्गम भागांतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### बाजारात नफावसुली कायम

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारातील नकारात्मक कल बुधवारीही कायम राहिला. सलग तिसऱ्या सत्रात घसरण नोंदवत प्रमुख निर्देशांक लाल निशाण्यावर बंद झाले. जागतिक बाजारातील कमकुवत संकेत आणि मोठ्या बँकांच्या शेअर्समधील नफावसुलीमुळे गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतला. त्यामुळे बाजारात मंदीचा माहौल होता. मात्र, काही कंपन्यांचे शेअर्स बाजाराच्या मदतीला धावून आल्याने मोठी घसरण टळली. बाजार बंद होताना निर्देशांकातील कंपन्यांमध्ये समसमान विभागणी पाहायला मिळाली. ३० पैकी १५ शेअर्स वाढले होते तर उर्वरित १५ शेअर्सवर मंदीचे सावट राहिले. निफ्टीतही ५० पैकी २६ शेअर्स विक्रीच्या दबावाखाली होते तर २४ कंपन्या सावरलेल्या स्थितीत राहिल्या. ■

### धनंजय मुंडे यांनी घेतली अमित शाह यांची भेट



**नवी दिल्ली** : माणिकराव कोकाटेंवर अटकेची टांगती तलवार असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी बुधवारी अचानक केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. कोकाटेंचे मंत्रिपद गेल्यास ते मुंडे यांना मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. धनंजय मुंडे यांनी आज दिल्लीत सत्ताधारी रालोआच्या विविध नेत्यांची भेट घेतली. ते सकाळी ११ वाजता संसद भवनात आले. तिथे जवळपास एक तास होते. त्यानंतर त्यांनी अमित शाह यांची भेट घेतली. चर्चेचा तपशील मात्र बाहेर येऊ शकला नाही. पण, ही चर्चा राज्यातील विद्यमान घटनाक्रम तथा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित होती, असा दावा सूत्रांनी केला. मात्र, त्याला अधिकृत दुजोरा मिळू शकला नाही. ■

# अपघातस्थळी दहा मिनिटांच्या आत पोहोचेल रुग्णवाहिका!

## योजनेवर वेगाने काम सुरू असल्याची गडकरींची माहिती

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

अपघात झाल्यानंतर घटनास्थळी दहा मिनिटांच्या आत रुग्णवाहिका पोहोचू शकेल, अशा योजनेवर सरकार काम करत असल्याचे केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज राज्यसभेत स्पष्ट केले.

राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाच्या उत्तरात गडकरी म्हणाले की, अपघात स्थळी आवश्यक ते मदतकार्य करत जखमींवर तातडीने उपचार करता येईल, अशा सुसज्ज रुग्णवाहिका राज्य सरकारच्या सहकार्याने तयार केल्या जात आहेत.

इंडियन मेडिकल असोसिएशनने केल्या एका अभ्यासाचा दाखला देत गडकरी म्हणाले की, योग्यवेळी जखमींना उपचार मिळाले तर दरवर्षी अपघातात होणारे ५० हजार मृत्यू टाळता येतील. राज्य सरकारच्या सहकार्याने अपघात स्थळी दहा मिनिटाच्या आता पोहोचतील, अशी रुग्णवाहिकांची सेवा उपलब्ध करुन दिली जाईल, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, २०२५ मध्ये सरकारने 'राहवीर' योजना जाहीर केली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

## मोदींची कबर खोदण्याची स्वप्न पाहणाऱ्या काँग्रेसची कबर जनता खोदेल

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ डिसेंबर-**

भारतीय लष्कर दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करत असताना आणि संपूर्ण देश एकजुटीने उभा असताना काँग्रेसचे नेते मात्र पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कबर खोदण्याची भाषा करणाऱ्यांची कबर देशाची जनता खोदेल, असा हल्ला केला. राहुल गांधी, पृथ्वीराज चव्हाण आणि पी. चिदंबरम यांच्या भूमिकेवर टीका करताना शिंदे म्हणाले की, लष्कराच्या कारवाईवर प्रश्न विचारणे म्हणजे थेट जवानांचे मनोबल खच्चीकरण करणे आहे.

**एकनाथ शिंदेंचा काँग्रेसवर प्रहार**

पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने राबवलेल्या ऑपरेशन 'सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांचे तळ अचूकपणे उद्ध्वस्त करण्यात आले. ही कारवाई अत्यंत प्रिसाईज असून कोणतेही नागरी नुकसान झाले नाही. या कारवाईमुळे भारताची लष्करी ताकद आणि राजकीय इच्छाशक्ती जगासमोर पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे, असे शिंदे म्हणाले.

मात्र, या शौर्यपूर्ण कारवाईनंतर काँग्रेसच्या नेत्यांकडून करण्यात आलेली वक्तव्ये देशविघातक असूनही टीका देशप्रेमातून नाही, तर पाकिस्तानप्रेमातून होत आहे. काँग्रेस नेत्यांची विधाने पाकिस्तानमध्ये हेडलाईन बनत आहेत, हे अत्यंत लाजिरवाणे आहे, असे ते म्हणाले. '२६/११ च्या वेळी काँग्रेस सरकारने जर सडेतोड उत्तर दिले असते, तर आज देशाला पुन्हा पुन्हा अशी किंमत मोजावी लागली नसती,' असा टोला लगावून 'अब गोली का जवाब गोली से,' असे सांगत शिंदे यांनी, पाकिस्तानविरोधातील ही कारवाई संपूर्ण देशाच्या आत्मसन्मानाशी जोडलेली आहे. देश, लष्कर आणि पंतप्रधानांविरोधात गरळ ओकणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही, असा इशारा दिला.

# भारत-इथियोपिया नैसर्गिक भागीदार

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

◆ **अदिस अबाबा, १७ डिसेंबर**

प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि जोडणीच्या बाबतीत भारत आणि इथियोपिया हे नैसर्गिक भागीदार आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथियोपियाच्या संसदेला संबोधित करताना सांगितले.

मंगळवारी आपल्या पहिल्या द्विपक्षीय दौऱ्यावर इथियोपियात पोहोचलेल्या मोदींनी या पूर्व आफ्रिकन देशाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित केले. नरेंद्र मोदी यांनी संबोधित केलेली जगातील ही १८ वी संसद होती. इथियोपिया आफ्रिकेच्या एका महत्त्वाच्या ठिकाणी वसलेले आहे. भारत हिंद महासागराच्या केंद्रस्थानी आहे. प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि जोडणीच्या बाबतीत आम्ही नैसर्गिक भागीदार आहोत, असे नरेंद्र मोदी म्हणाले.



इथियोपियाच्या संसदेत पोहोचल्यानंतर पंतप्रधान मोदी यांच्याशी हस्तांदोलन करताना जनप्रतिनिधी

या वर्षाच्या सुरुवातीला संरक्षण सहकार्य करारावर स्वाक्षरी झाल्यामुळे परस्पर सुरक्षेप्रति आमची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. या व्यवस्थेमुळे अधिक घनिष्ठ लष्करी सहकार्यावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे मोदी म्हणाले. भारत आणि इथियोपियात हवामानासोबतच आत्मिक पातळीवरही आपुलकी आहे. दोन्ही देशांच्या पूर्वजांनी केवळ वस्तूंचीच नव्हे, तर कल्पना आणि जीवनशैलीचीही देवाणघेवाण केली होती.

लोकशाही ही एक जीवनशैली आणि एक प्रवास आहे, याची जाणीव दोन्ही देशांना आहे. ती कधी चर्चेने, कधी मतभेदांनी, पण नेहमीच कायद्याच्या राज्यावरील विश्वासाने आकार घेते. राज्याचे चाक जनतेच्या साथीने पुढे सरकते, तेव्हा प्रगतीचे चाक आशा आणि उद्दिष्टांसह पुढे जाते. जागतिक दक्षिण देशांबद्दल नरेंद्र मोदी म्हणाले, हा प्रदेश आपले भविष्य स्वतःच घडवत आहे आणि भारत व इथियोपियाची त्याबद्दल समान दृष्टी आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### जागतिक दक्षिण कुणाच्याही विरोधात नाही

**»» आमची दृष्टी अशा जगावर आहे, जिथे जागतिक दक्षिण कोणाच्याही विरोधात नाही, तर सर्वांसाठी पुढे येईल. आपण एकत्र उभे राहून अधिक न्याय्य, समान आणि शांततापूर्ण जगासाठी काम करतो, असे ते म्हणाले. जगाची व्यवस्था भूतकाळातच अडकून राहिली तर जग पुढे जाऊ शकत नाही, असे नरेंद्र मोदी यांनी नमूद केले.** ■

## ममतांच्या मतदारसंघातून वगळले ४५ हजार मतदार

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विधानसभा मतदारसंघातील भवानीपूरमध्ये एसआयआर अंतर्गत मसुदा यादीतून सुमारे ४५,000 मतदार वगळण्यात आले आहे.

# झेडपी, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ डिसेंबर-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये एखाद्या इच्छुकाचा उमेदवारी अर्ज जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद ठरविल्यास त्याविरुद्ध न्यायालयात आव्हान देता येणार नाही. निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहणार आहे.

त्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात,यादृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे.त्यामुळे आता निवडणूक निर्णय अधिकारीच त्यासाठी सर्वेसर्वा असणार आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे.

**निवडणूक अधिनियम सुधारणा प्रस्तावाला मंत्रीमंडळाचा हिरवा कंदील**

# ढाक्यातील दूतावासाला धमकी

▸ बांगलादेशच्या उच्चायुक्तांना बजावले समन्स
▸ केंद्र सरकारने घेतली गंभीर दखल

**नवी दिल्ली** : बांगलादेशातील ढाक्यातील भारतीय उच्चायुक्तालयास मिळालेल्या धमकीच्या पृष्ठभूमीवर भारताने बुधवारी बांगलादेशचे उच्चायुक्त एम. रियाझ हमीदुल्ला यांना समन्स बजावले.

ईशान्येकडील राज्यांना उद्देशून 'सेव्हन सिस्टर्स'ला वेगळे ठेवण्याची धमकी देणाऱ्या एका नेत्याच्या वक्तव्यानंतर अवघ्या एका दिवसात ही कारवाई करण्यात आली. भारताने एम. रियाझ हमीदुल्ला याच्याकडे या प्रकरणी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. भारतातील अरुणाचलप्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा या ईशान्येकडील राज्यांना एकत्रितपणे 'सेव्हन सिस्टर्स' म्हणून ओळखले जाते. नॅशनल सिटिझन पार्टी (एनसीपी) चा म्होरक्या हसनत अब्दुल्ला याने पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकण्यास सुरुवात केली आहे. बांगलादेश अस्थिर झाल्यास ईशान्य भारतातील सात राज्ये (सेव्हन सिस्टर्सला) वेगळे पाडण्याची आणि ईशान्येकडील फुटीरतावाद्यांना आश्रय देण्याची धमकी त्याने दिली आहे. आपल्या तीव्र भारतविरोधी वक्तृत्वासाठी ओळखला जाणारा अब्दुल्ला हा विद्यार्थी-नेतृत्वाखालील एनसीपीचे मुख्य संघटक आह



# बांगलादेश सीमेवरून आले ७,५२८ घुसखोर

## ▸▸केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांची माहिती

**नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

२०१४ पासून आतापर्यंत सर्वाधिक घुसखोरी भारत-बांगलादेश सीमेवरून झाली आहे. गेल्या ११ वर्षांत ७५२८ घुसखोर भारतात आले, तर याच काळात चीनकडून भारतीय सीमेत कोणतीही घुसखोरी झाली नसल्याची माहिती केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत लेखी उत्तरात दिली.

राय यांनी सांगितले की, भारतपाकिस्तान सीमेवरून ४२५ घुसखोरांनी बेकायदेशीरपणे देशात प्रवेश केला. त्याचवेळी भारत-चीन सीमेवर घुसखोरीचे कोणतेही प्रकरण अद्याप नोंदवले गेलेले नाही. भारताने सुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि घुसखोरी रोखण्याच्या उद्देशाने भारतपाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर कुंपण लावण्याचे काम सुरू केले. आतापर्यंत ९३ टक्के कुंपणाचे काम पूर्ण झाले आहे, तर भारत-बांगलादेश सीमेच्या सुमारे ७९ टक्के भागात कुंपण लावण्यात आले आहे. २०२५ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबरपर्यंत बांगलादेश सीमेवरून ११०४ घुसखोर भारतात आले. पाकिस्तान सीमेवरून ३२, म्यानमार सीमेवरून ९५ आणि नेपाळ-भूतान सीमेवरून ५४ लोक बेकायदेशीरपणे भारतात दाखल झाले. भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेची एकूण लांबी २,२८९.६६ किलोमीटर आहे. यापैकी २,१३५.१३६ किलोमीटरवर कुंपण पूर्ण झाले आहे.

### राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करण्याला प्राधान्य

भारत-बांगलादेश आंतरराष्ट्रीय सीमेची एकूण लांबी ४,0९६.७0 किलोमीटर आहे. यापैकी ३,२३९.९२ किलोमीटरवर कुंपण घालण्यात आले आहे, जे ७९.0८ टक्के आहे. सुमारे ८५६.७७८ किलोमीटर सीमेवर अद्याप कुंपण घालणे बाकी आहे. भारत-म्यानमारच्या १,६४३ किलोमीटर लांबीच्या सीमेपैकी आतापर्यंत ९.२१४ किलोमीटर भागावर प्रत्यक्ष कुंपण घालण्याचे काम पूर्ण झाले आहे. सीमा कुंपण घालणे घुसखोरी रोखण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करण्याच्या सरकारच्या धोरणाचा एक भाग असल्याचे राय यांनी सांगितले.

# तुमच्या देशातही भूमीला मानतात माता!

### इथियोपियाच्या संसदेत पंतप्रधान मोदींचे भावोद्गार

◆ **नवी दिल्ली, १७ डिसेंबर**

आमचे वंदे मातरम् आणि तुमचे राष्ट्रगीत, या दोन्हींमध्ये देशाला मातेचा दर्जा देण्यात आला आहे. आपण दोन्ही देश आपल्या भूमीला माता मानतो. हे साम्य पाहून मी भारावून गेलो आहे, असे भावोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथियोपियाच्या संसदेत काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या इथियोपियाच्या दौऱ्यावर आहेत. इथियोपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी इथियोपियाला सिंहांची भूमी, असे वर्णन केले आणि देशात घरी असल्यासारखे वाटले असे सांगितले. त्यांनी दोन्ही देशांमध्ये भूमीला माता म्हटले जाते हे लक्षात घेऊन दोन्हींच्या राष्ट्रगीतांची तुलना देखील केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आज तुमच्या सर्वांसमोर उभे राहणे माझ्यासाठी खूप मोठे सौभाग्य आहे. प्राचीन ज्ञान आणि आधुनिक आकांक्षा असलेल्या राष्ट्राच्या हृदयात असलेल्या लोकशाहीच्या या मंदिरात उपस्थित राहणे हा सन्मान आहे.



पंतप्रधान मोदी यांना 'द ग्रेट ऑनर निशाण ऑफ इथिओपिया' या सर्वोच्च पुरस्कार प्रदान करताना इथियोपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली

### जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक

पंतप्रधानांनी इथियोपियाला जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक म्हणून वर्णन केले आणि म्हटले की त्याचा इतिहास त्याच्या पर्वतांमध्ये, दऱ्यांमध्ये आणि त्याच्या लोकांच्या हृदयात जिवंत आहे. आपण देखील एक प्राचीन संस्कृती आहोत, सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास या आवाहनाने प्रेरित होऊन भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करत आहोत.

मातृभूमीबद्दलच्या आपल्या भावना आपला सामायिक दृष्टिकोन देखील प्रतिबिंबित करतात. दोन्ही देशांचे पृथ्वीला 'माता' म्हणून संबोधणे, हे आपल्याला आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगण्याची आणि आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्याची प्रेरणा देतात. पंतप्रधान म्हणाले की ते १.४ अब्ज भारतीयांच्या शुभेच्छा घेऊन येतात आणि इथियोपियाच्या संसदेबद्दल, तिच्या लोकांबद्दल आणि तिच्या लोकशाही प्रवासाबद्दल त्यांचा खोल आदर व्यक्त करतात. ◂(वृत्तसंस्था)

### सर्वोच्च सन्मान मिळवणारे मोदी पहिले जागतिक नेते

इथियोपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांनी मंगळवारी मोदींना देशाचा सर्वोच्च सन्मान प्रदान केला होता. ते 'द ग्रेट ऑनर निशाण ऑफ इथिओपिया' हा सन्मान मिळवणारे पहिले जागतिक नेते ठरले. पंतप्रधान मोदी यांनी इथियोपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांचे देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केल्याबद्दल आभार मानले. ते म्हणाले, मी हा सन्मान भारतीय लोकांच्या वतीने हात जोडून आणि नम्रपणे स्वीकारतो. पंतप्रधान मोदींनी बुधवारी इथिओपियाच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित केले. ही जगातील १८ वी संसद आहे, जिथे पंतप्रधान मोदींनी भाषण दिले. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## बांगलादेश, अफगाणिस्तान विजयी

**◆ दुबई, १७ डिसेंबर**

येथे सुरु असलेल्या आशिया चषक १९ वर्षांखालील वन-डे क्रिकेट स्पर्धेत सोमवारी खेळल्या गेलेल्या साखळी सामन्यात बांगलादेशने श्रीलंकेवर ३९ धावांनी, तर अफगाणिस्तानने नेपाळवर १३९ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी विजय नोंदविला. बांगलादेशचा इक्बाल हुसेन इमोन व अफगाणिस्तानचा झैतुल्लाह शाहीन सामनावीर पुरस्काराचे मानकरी ठरले.

बांगलादेशने ४६.३ षटकांत सर्वबाद २२५ धावा काढल्या, प्रत्युत्तर देताना श्रीलंकेचा संघ ४९.१ षटकांत १८६ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

बांगलादेशच्या सलामीवीर झवाद अबरार (४९), रिफात बेग (३६), कर्णधार अझीझुल हाकिमी (२९), कलाम सिद्धीकी (३२) व फरीद हसनने (२९) दमदार फलंदाजी करत संघाची बाजू मजबूत केली.

◀(वृत्तसंस्था)

# तिसऱ्या ॲशेस कसोटीला मुकल्यानंतर स्टीव्ह स्मिथ बॉक्सिंग-डेमध्ये परतणार

**◆ ॲडेलेड, १७ डिसेंबर**

ॲडेलेड येथे बुधवारी झालेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर झाल्यानंतर स्टीव्ह स्मिथ बॉक्सिंग डे वर ऑस्ट्रेलियासाठी ॲशेस सामन्यात परतण्याचे लक्ष्य ठेवत आहे.

नाणेफेकीच्या एक तास आधी स्मिथ ऑस्ट्रेलियन प्रशिक्षक ॲन्ड्र्यू मॅकडोनाल्डशी मैदानावर बोलत होता, तेव्हा त्याला चक्कर येणे व मळमळ यातून बरे होण्यासाठी अकरा जणांच्या संघातून वगळण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला.

यामुळे ऑस्ट्रेलियासाठी उस्मान ख्वाजाला अनपेक्षितपणे बोलावण्यात आले, डावाची सुरुवात करण्याऐवजी स्मिथच्या जागी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची संधी मिळाली.

ऑस्ट्रेलियाच्या संघ व्यवस्थापनाने नंतर सांगितले की



स्टीव्ह स्मिथ

स्मिथवर आतील कानात 'संभाव्य वेस्टिब्युलर समस्येसाठी' उपचार सुरू आहेत, नेट सराव सत्रादरम्यान या स्टार फलंदाजाला दुखापत झाल्याच्या अटकळांना नकार दिला.

त्याने शनिवारी व रविवारी ऑस्ट्रेलिया संघासोबत सराव केला, सोमवारच्या सत्रात भाग घेतला नाही, परंतु मंगळवारी परतला आणि बुधवारी सकाळी नेटमध्ये पुन्हा फलंदाजी केली.

गत काही दिवसांपासून स्टीव्हला थोडे आजारी वाटत आहे,'' असे पुनरागमन करणारा कर्णधार पॅट कमिन्स नाणेफेकीच्या वेळी म्हणाला. 'तो आज सकाळी आला आणि त्याने धडक दिली पण त्याला वाटले नव्हते की तो या सामन्यासाठी उठेल, म्हणून तो घरी निघून गेला आहे. पण आम्ही खूप भाग्यवान आहोत की आम्हाला उस्मानसारखा खेळाडू मिळाला आहे जो लगेच खेळू शकेल, असे कमिन्स म्हणाला. स्मथला पूर्वी चक्कर येण्याची लक्षणे होती. तो २६ डिसेंबरपासून मेलबर्न क्रिकेट मैदानावर सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी परतण्याची शक्यता आहे, असे संघ व्यवस्थापनाने म्हटले आहे.

◀(वृत्तसंस्था)

## विश्वविजेता संघाला मिळाली टाटा सिएरा एसयूव्ही

**नवी दिल्ली** : टाटा मोटर्सने नुकत्याच लाँच केलेल्या एसयूव्ही सिएराची पहिली खेप भारतीय महिला क्रिकेट संघाला भेट दिला आहे. या कार्यक्रमात टाटा सन्स आणि टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स लिमिटेडचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन आणि एमडी व सीईओ शैलेश चंद्र उपस्थित होते.

कंपनीने घोषणा केली होती की ती प्रत्येक संघातील सदस्याला सिएराचे टॉप मॉडेल देईल. भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी हरवून ही ट्रॉफी जिंकली होती. सिएराची डिलिव्हरी १५ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. टाटाने नुकतेच नवीन सिएराच्या सर्व व्हेरिएंटच्या एक्स-शोरूम किमती जाहीर केल्या होत्या, ज्या ११.४९ लाखांपासून सुरू होऊन २१.२९ लाखांपर्यंत जातात. याची स्पर्धा ह्युंदाई क्रेटा, किआ सेल्टोस, स्कोडा कुशाक, फोक्सवॅगन टायगन, मारुती ग्रँड विटारा, होंडा एलिव्हेट आणि एमजी एस्टरशी आहे. ■

# उस्माने डेम्बेले, ऐताना बोनमतीला फिफाचा सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार

**◆ दोहा, १७ डिसेंबर**

मंगळवारी फिफा पुरस्कारांमध्ये उस्माने डेम्बेले आणि ऐताना बोनमती यांना २०२५ च्या सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. या वर्षी पुरुष व महिला बॅलन डीओर जिंकल्यानंतर त्यांच्या बक्षिस संग्रहात भर पडली.

दोहा येथे एका खाजगी डिनरमध्ये फिफाने त्यांचे वार्षिक सर्वोत्कृष्ट पुरस्कारांचे आयोजन केले.

डेम्बेलेने पॅरिस सेंट-जर्मेनसाठी (पीएसजी) आपल्या पहिल्या चॅम्पियन्स लीग जेतेपदात उत्तम कामगिरी केली व बोनमतीने स्पेन आणि बार्सिलोनासाठी उत्कृष्ट कामगिरी केली.

फिफा पुरस्कारांसाठी जगभरातील राष्ट्रीय संघाचे कर्णधार, प्रशिक्षक, माध्यमे आणि चाहते



पुरस्कारासह उस्माने डेम्बेले व ऐताना बोनमती

मतदान करतात.

दोन युरोपियन विजेत्यांनी प्रशिक्षक पुरस्कार जिंकले: सरिना विगमनने स्वित्झर्लण्डमध्ये इंग्लंडला सलग दुसऱ्यांदा महिला युरो जेतेपद मिळवून दिले - अंतिम फेरीत स्पेनला हरवले - आणि लुईस एनरिकने पीएसजीला चॅम्पियन्स लीग आणि फ्रेंच जेतेपद मिळवून दिले.

पहिल्या चार पुरस्कारांना सप्टेंबरमध्ये पॅरिसमध्ये सादर झालेल्या बॅलन डीओर पुरस्कारांप्रमाणेच सन्मान होता.

◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### मेस्सीने मानले आभार



**मियामी** : लियोनेल मेस्सीने भारतात फुटबॉलचे भविष्य उज्ज्वल असेल अशी आशा व्यक्त केली आणि आपल्या तीन दिवसांच्या भारत दौऱ्यादरम्यान मिळालेल्या उदार आदरातिथ्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या दौऱ्यात चार वेगवेगळ्या शहरांमध्ये हजारो चाहते या अर्जेंटिनाच्या प्रतिभावान खेळाडूची एक झलक पाहण्यासाठी गर्दी करत होते. जामनगरमधील अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वंतारा वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्राला भेट देण्यासाठी आपला मुक्काम एक दिवसाने वाढवल्यानंतर, मेस्सी बुधवारी मियामी येथील आपल्या निवासस्थानी परतला. इन्स्टाग्रामवर, या ३८ वर्षीय मेस्सीने दौऱ्याचा एक मिनिटाचा हायलाइट्स व्हिडिओ पोस्ट केला, यात भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अभिनेत्री करीना कपूर खान व अनेक तरुण फुटबॉलपटूंसोबतच्या त्याच्या भेटीगाठींचे क्षण दाखवण्यात आले आहेत. ■

### खरेदीदार न मिळाल्याने उमेश यादव निराश



**नवी दिल्ली** : अनुभवी भारतीय वेगवान गोलंदाज उमेश यादवला आयपीएल २०२५ च्या लिलावात कोणीही खरेदीदार मिळाला नाही, त्यामुळे तो 'निराश व अस्वस्थ' झाला आहे, असे वृत्त आहे. इतका मोठा अनुभव असूनही, त्याला कोणत्याही फ्रँचायझीकडून बोली लागली नाही. १४० हून अधिक आयपीएल सामने खेळलेल्या आणि मोठी कारकीर्द असलेल्या खेळाडूसाठी हा एक आश्चर्यकारक निकाल आहे, जो आयपीएल २०२४ मध्ये गुजरात टायटन्सकडून खेळला होता.

### चक्रवर्तीला टी-२० मानांकनात सर्वोत्तम रेटिंग

**दुबई** : भारताचा फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मायदेशात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत सलग तिसऱ्यांदा दोन बळी घेतल्यानंतर टी-२० गोलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानी आपली आघाडी वाढवत कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळवले आहे.

गत आठवड्यात खेळल्या गेलेल्या दोन टी-२० सामन्यांमध्ये प्रत्येकी दोन बळी घेणाऱ्या चक्रवर्तीने आपल्या खात्यात ३६ रेटिंग गुणांची भर घातली. त्यामुळे त्याचे गुण वाढून कारकिर्दीतील सर्वोत्तम ८१८ गुण झाले आहेत. आता त्याच्या सर्वात जवळच्या प्रतिस्पर्धी, दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाज जेकब डफी (६९९) पेक्षा त्याच्याकडे ११९ गुणांची आघाडी आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगनेही मालिकेतील तिसऱ्या सामन्यात द. आफ्रिकेविरुद्ध प्लेअर ऑफ द मॅच ठरलेल्या कामगिरीच्या जोरावर टी-२० आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या क्रमवारीत चार स्थानांची सुधारणा करत १६ वे स्थान पटकावले आहे. दक्षिण आफ्रिकेच्या मार्को जॅनसेन (१४ स्थानांनी वर चढून २५ व्या स्थानावर), लुंगी एनगिडी (११ स्थानांनी वर चढून ४४ व्या स्थानावर) आणि ऑटनील बार्टमन (शीर्ष १०० च्या बाहेरून ६८ व्या स्थानावर) यांनीही याच यादीत प्रगती केली आहे. भारताचा युवा सलामीवीर अभिषेक शर्मा फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी कायम आहे, तर आता वर्मा चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, ज्यामुळे २०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी दोन भारतीय फलंदाज अव्वल पाचमध्ये आपले स्थान पक्के करून आहेत. ■

## भारत-दक्षिण आफ्रिका चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द; शेवटचा सामना १९ डिसेंबरला



**लखनौ** : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द करण्यात आला आहे. लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर सायंकाळी ७ वाजता सामना सुरू होणार होता, परंतु दाट धुक्यामुळे टॉस होऊ शकला नाही. पंचांनी सहा वेळा परिस्थितीची पाहणी केली, परंतु रात्री ९:३० वाजेपर्यंत परिस्थितीत सुधारणा न झाल्याने सामना रद्द करण्यात आला. पाच सामन्यांच्या मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे. भारताने पहिला सामना १०१ धावांनी जिंकला. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने मुल्लानपूर येथे दुसरा सामना ५१ धावांनी जिंकून पुनरागमन केले. तथापि, धर्मशाळेत झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारताने सात विकेट्सने विजय मिळवत पुन्हा आघाडी मिळवली. अंतिम सामना १९ डिसेंबर रोजी अहमदाबाद येथे खेळला जाईल. वारंवार अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

## सांगोला महाविद्यालयाच्या सुजाता बाबरला उंच उडीत सुवर्ण



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे झालेल्या क्रीडा महोत्सवात सांगोला महाविद्यालयाच्या सुजाता बाबर हिने १.५१ मीटर उंच उडी मारून सुवर्ण पटकाविले.

याबद्दल तिचा महाविद्यालयातर्फे सन्मान करण्यात आला. तिचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळिमरे, सचिव ॲड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, खेळाडूस मार्गदर्शन करणारे प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले व क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी अभिनंदन केले.



## सेंट थॉमस स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

येथील सेंट थॉमस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापक फादर रॉबिन व हॉकी प्रशिक्षक जरार कुरेशी यांच्या उपस्थितीत झाले. श्री कुरेशी यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उजमा यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रिसीला यांनी केला. क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी क्रीड़ा शिक्षक अमित येवलेकर, राजेंद्र गायकवाड, सिल्वस्टर जॉन, दामोदर यांनी परिश्रम घेतले

## गारमपल्लीच्या भेदक गोलंदाजीमुळे युनायटेड विजयी

**मास्टर्स क्रिकेट अकादमीची १२ वर्षांखालील क्रिकेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**



मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत नेयनीस गारमपल्लीच्या (४-२९) भेदक गोलंदाजीच्या जोरावर युनायटेड क्रिकेट क्लबने पंढरपूरच्या कर्मयोगी विद्यानिकेत संघावर चार गडी राखून मात केली. नयनीश सामन्याचा मानकरी ठरला.

डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या चौथ्या दिवशीचा सामना युनायटेड क्रिकेट क्लब विरुद्ध क्रिकेट केवीपी संघ यांच्यात झाला. केवीपी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १८.३ षटकांत सर्वबाद ७२ धावा केल्या. युनायटेडकडून नेयनिश गारमपल्ली २९ धावांत ४ तर शरवनने २२ धावांत ३ बळी घेतले.

विजयी ७३ धावांचे लक्ष्य युनायटेड संघाने १७.५ षटकांत ६ गडी बाद करीत सहज गाठले. युनायटेडकडून अभय अमरापूरकरने ३४ धावा तर पुष्पकर पवारने १७ धावा केल्या.



## सोशलच्या रेहान मुल्लाची महाराष्ट्र वरिष्ठ फूटबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

जयपूर, राजस्थान होणाऱ्या ७९व्या राष्ट्रीय संतोष ट्रॉफी फुटबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र वरिष्ठ फुटबॉल संघात सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस ॲण्ड कॉमर्सच्या बी.ए. भाग एक वर्गात शिकणाऱ्या रेहान मुल्लाची निवड झाली आहे. तो अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्याचा प्रभारी प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यास वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेचे सचिव डॉ.के पी. चौगुले, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले

## सॉफ्टबॉल सबज्युनियर मुले व मुली निवड चाचणी स्पर्धा आज

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या वतीने सॉफ्टबॉल सबजुनियर मुले व मुली शहर व जिल्हा निवड चाचणी स्पर्धा गुरूवार १८ डिसेंबर रोजी विमानतळसमोरील श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरेनगर येथे दुपारी ४ वाजता होणार आहे. खेळाडूंनी आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे. यातून निवडलेला संघ हा २६ ते २८ डिसेंबर दरम्यान धुळे येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल. जिल्हा स्पर्धेसाठी १ जानेवारी २०११ नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहे. खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे सचिव प्रा. संतोष खेंडे ९८५०६६६७९५ अथवा गंगाराम घोडके ९४२३७१७२७७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, उपाध्यक्ष प्रा. संतोष गवळी व सचिव प्रा. संतोष खेंडे यांनी केले आहे

## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये दि. १३ डिसेंबर रोजी शाळेच्या भव्य क्रीडांगणावर वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

याचे उद्घाटन सकाळच्या सत्रात साईराज हणमे व तनिष्का ठोकळ, तर सायंकाळच्या सत्रात शारीरिक शिक्षण संचालक संतोष गवळी व क्रीडा शिक्षक संतोष खेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शोभायात्रा व शिस्तबद्ध परेडने झाली. त्यानंतर मशाल प्रज्वलन व क्रीडाशपथविधी पार पडला. विविध इयत्तेतील विद्यार्थ्यांनी शिस्त व खेळाडूवृत्तीचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांच्या जयघोषाने व रंगीबेरंगी सजावटीमुळे संपूर्ण क्रीडांगणात चैतन्य निर्माण झाले होते. मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी वार्षिक शालेय अहवाल सादर केला. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खेळांमधील आपले कौशल्य आणि सांघिक कामगिरीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यावेळी सादर करण्यात आलेल्या कवायती व फ्यूजन नृत्य कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. समारोपाच्या सत्रात विजेत्या विद्यार्थ्यांना पदके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

# जुबेर शेख व सृष्टी रुपनवर जिल्हा खो-खो संघाचे कर्णधार

**बीड येथे आजपासून सुरु होणाऱ्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्हा संघ रवाना**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा पुरुष खोखो संघाच्या संघाच्या कर्णधारपदी येथील उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या जुबेर शेख याची तर महिला संघाच्या कर्णधारपदी येथील किरण स्पोर्ट्स क्लबच्या सृष्टी रुपनवर हिची निवड झाली.

या संघाच्या उपकर्णधारपदी अनुक्रमे सौरभ चव्हाण (किरण स्पोर्ट्स) व समृद्धी सुरवसे (कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली, पंढरपूर) यांची निवड सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केली. बीड येथे १८ ते २१ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या ६१वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत भाग घेण्यासाठी हे दोन्ही जिल्हा संघ रवाना झाले.

किरण स्पोर्टस्च्या वतीने महिला संघाचे सराव शिबिर गणेश पवार यांनी घेतले. या सराव शिबिराचा समारोप वसुंधरा महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी देशमुख व स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या हस्ते झाला. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष अजितकुमार संगवे, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, सदस्य संतोष कदम, पुंडलिक कलखांबकर, राष्ट्रीय खेळाडू युसूफ शेख, यशोदीप आठवले आदी उपस्थित होते. श्रीकृष्ण कोळी यांनी सूत्रसंचालन केले.

उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या पुरुष संघाच्या सराव शिबिराचा समारोप ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झाला. यावेळी संघास आणि प्रशिक्षक आशिष अवधूर्ती व संघ व्यवस्थापक वैभव लिगाडे यांना उत्कर्ष क्रीडा मंडळाचे कार्याध्यक्ष सुनील चव्हाण, सचिव अजित शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

**स्पर्धेची गटवारी याप्रमाणे**

**पुरुष गट** : अ गट - पुणे, रायगड, छ. संभाजीनगर. ब गट - मुंबई उपनगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग. क गट - सांगली, जळगाव, बीड. ड गट - धाराशिव, रत्नागिरी, लातूर. इ गट - मुंबई, परभणी, हिंगोली. फ गट - सोलापूर, नाशिक नांदेड. ग गट - अहिल्यानगर, धूळे, जालना. ह गट - ठाणे, सातारा, पालघर.

**महिला गट** : अ गट - धाराशिव, लातूर, परभणी. ब गट - सांगली, रायगड, जळगाव. क गट - पुणे, सातारा, सिंधुदुर्ग. ड गट - नाशिक, जालना, बीड. इ गट - रत्नागिरी, नंदुरबार, छ. संभाजीनगर. फ गट - सोलापूर, अहिल्यानगर, हिंगोली. ग गट - ठाणे, धुळे, नांदेड. ह गट - मुंबई, मुंबई उपनगर, पालघर.



**बीडचे जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते उद्घाटन**

**बीड** : महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व बीड ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या या स्पर्धेसाठी गटवारी जाहीर झाली असून गतविजेते पुणे व धरशिवने पुन्हा एकदा विजेतेपदासाठी जोरदार तयारी केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन १८ डिसेंबर रोजी सायंकाळी ठीक ४.३० वा. श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात पार पडणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते पार पडणार असून त्यावेळी जतीन रहमान (मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड), नवनीत कावत (जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड.), शेखर पाटील (क्रीडा उपसंचालक, छ. संभाजीनगर विभाग), डॉ. चंद्रजीत जाधव (सचिव महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, उपाध्यक्ष महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन), सुधाकर चिंचाणे (जिल्हा नियोजन अधिकारी, बीड), अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड), सचिन गोडबोले (उपाध्यक्ष महाराष्ट्र खो-खो असोसिएशन), गोविंद शर्मा (कोषाध्यक्ष भारतीय खो-खो महासंघ), ॲम्युचर खो-खो असो. बीडचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, सचिव विजय जाहेर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महत्वाचे...

## अल्पवयीन मुलीस पळवले; अज्ञाताविरूध्द गुन्हा

**अक्कलकोट दि.१७ डिसेंबर**

येथील एका १७ वर्षे ०८ महिनेचे अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव तिचे अज्ञानपणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले असल्या बाबत उत्तर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवार दि.१७ रोजी सकाळी ११ वा च्या सुमारास त्या मुलीचे आई वडील कामानिमित्त घरातून बाहेर गेले होते. घरात आजी आणि मुलगी ही दोघेच होते. दुपारी एक वा.चे सुमारास शेजारी राहणारे फिर्यादीचे फोन वर फोन करुन तुमची मुलगी घरात नाही असे सांगीतल्याने फिर्यादी वडील लागलीच घरी आले. तेंव्हा त्यांची मुलगी घरी दिसली नाही. त्यानंतर आजुबाजुला अक्कलकोट शहरात, एस टी स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन येथे शोध घेतला व इतर नातेवाईकांकडे चौकशी केली असता ती मिळुन आली नाही. फिर्यादीच्या मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणास्तव तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले बाबत अज्ञात इसमाविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.या बाबत पोलिस अधिक तपास करीत आहे.



## लोकविकास विद्यालयातील विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**वेळापूर, दि.१७ डिसेंबर-**

करमाळा विट येथे झालेल्या १४ वर्षे खो-खो राज्यस्तरीय निवड चाचणीमध्ये लोकविकास विद्यालयातील यश राजू कदम व यश राहूल बनसोडे या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक अजित बनकर, सागर एकतपूरे, नितिन बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूच्या यशबद्दल संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, शिवगंगा दूध डेअरी चेअरमन भागवत गायकवाड, सचिन बनकर मुख्याध्यापक सुनील पातळे, अमोल पांढरे यांनी अभिनंदन केले.

## पत्नीकडून पतीवर चाकू हल्ला; सासु व दिरालाही मारहाण

**बार्शी, दि. १७ डिसेंबर -**

**पत्नीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल, बार्शी बसस्थानकात घडला प्रकार**

कौटुंबिक वादातून बार्शी बसस्थानकात झालेल्या वादाचे रुपांतर थेट हाणामारी व चाकू हल्ल्यात झाल्याची घटना दि. १५ डिसेंबर रोजी घडली आहे. याप्रकरणी जखमी पतीने पत्नी व तिच्यासोबत आलेल्या अनोळखी दोन महिला व एक पुरुषाविरुद्ध पती जगदीश जीवनराव कवडे (वय ३५, रा. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी पत्नी सुप्रिया धर्मराज मगर हिच्यासह दोन अनोळखी महिला व एका पुरुषाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी जगदीश व पत्नी सुप्रिया ही गेल्या १० वर्षांपासुन एकत्र राहत नसून मागील एक वर्षापासुन बार्शी कोर्टात पोटगीसाठी केस चालू आहे. फिर्यादी जगदीश त्याचे आई व भावासह बार्शी येथे वकिलांना भेटण्यासाठी आले होते. त्यानंतर ते आपल्या मुलाला भेटण्यासाठी महात्मा फुले शाळेत गेले असता मुलगा शाळेत नसल्याचे समजले. पुढे तुळजापूरला जाण्यासाठी ते बार्शी बसस्थानकात आले असता बसमध्ये चढत असताना त्यांची पत्नी सुप्रिया धर्मराज मगर हिच्यासह दोन अनोळखी महिला व एक पुरुष बसमध्ये आले. यावेळी पत्नीने शिवीगाळ करत पतीच्या तोंडावर चापट मारली तर इतर महिलांनीही मारहाण केल्याचा आरोप आहे. पतीची आई वाद सोडविण्यासाठी आली असता तिलाही मारहाण करण्यात आली. पुढे पत्नीने हातातील चाकूने वार करण्याचा प्रयत्न केला असता पतीच्या उजव्या हाताला चाकू लागून तो जखमी झाला. पत्नीबरोबर असलेल्या अनोळखी पुरुषानेही चाकूने वार केल्याचा आरोप आहे. वाद सोडविण्यासाठी आलेल्या भावालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. घटनेनंतर आरोपींनी धमकी देत घटनास्थळावरुन पलायन केल्याचे सांगण्यात आले. जखमींनी फोन केल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपचारासाठी जगदाळे मामा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी पत्नी सुप्रिया धर्मराज मगर व दोन अनोळखी महिला व एका पुरुषाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमीष; दागीने लंपास, एका विरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि. १७ डिसेंबर-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस शहरातील स्वीटहार्ट कॅफेत नेवून मी तुझ्याशी लग्न करणार आहे असे म्हणत दोन्ही हात पकडून जवळ ओढून मोबाईल मध्ये सेल्फी काढून तुझ्याजवळील सोन्याचे दागीने दे अन्यथा तुझे फोटो व्हायरल करीन अशी धमकी देवून दागीने घेतल्या प्रकरणी शिवम विलास चव्हाण (रा.सुस्ते ता.पंढरपूर) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलीची आरोपीने प्रथम ओळख करुन दि.८ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता मंगळवेढा शहरातील शिवप्रेमी चौकातील स्वीटहार्ट कॅफे मध्ये त्या मुलीस नेवून मी तुझ्याशी लग्न करणार आहे असे सांगून तिचे दोन्ही हात पकडून तिला जवळ ओढून खांद्यावर हात टाकून त्याच्या मोबाईल मध्ये त्या मुलीसोबत सेल्फी काढून घेतला व तुझ्या जवळील सोन्याचे सगळे दागीने मला दिले नाहीत तर तुझे फोटो मी प्रसार माध्यमावर व्हायरल करीन अशी धमकी देवून सदर पिडीतेजवळी सोन्याचे झुबे काढून घेतले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जोग हे करीत आहेत. दरम्यान मंगळवेढा शहरात अनेक ठिकाणी व्यावसायिकांनी कॅफे सुरु केले असून या कॅफे मध्ये तरुण मुले व मुली यांची ये जा सुरु आहे. यापुर्वीही शिवप्रेमी चौकातील कॅफेमध्ये घटना घडल्यामुळे गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर काही दिवस पोलीसांचेही कॅफेकडे करडी नजर होती. त्यामुळे हा प्रकार थांबला होता. सध्या पोलीसांचे दुर्लक्ष होत असल्याने पुन्हा कॅफे मधून हा प्रकार घडल्याचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यासाठी पोलीसांनी शहरातील कॅफेवर बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रीया पालकामधून व्यक्त होत आहेत.




# सामाजिक सुरक्षेसाठी समान नागरी कायद्याची आवश्यकता

## माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित : शेठ लोणकणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

दहशतवाद, परदेशी नागरिकांची घुसखोरी, अंमली पदार्थ, सायबर गुन्हे अशा सर्वच बाजूंनी सामाजिक सुरक्षितता धोक्यात आणण्याचे काम राष्ट्राच्या शत्रूकडून होत आहे. त्यामुळे सामाजिक सुरक्षितता जपण्यासाठी भारतात समान नागरी कायद्याची आणि प्रत्येक भारतीयाने अष्टावधानी असण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित (मुंबई) यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट सोलापूर आयोजित शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन बुधवारी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात झाले.

व्याख्यानमालेचे यंदाचे २९ वे वर्ष आहे. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रवीण दीक्षित यांनी सामाजिक सुरक्षा या विषयावर गुंफले. प्रारंभी व्याख्यानमालेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी




व्यासपीठावर मसापाच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, कार्याध्यक्ष किशोर चंडक, समन्वयक ॲड. जे. जे. कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर, शोभा बोल्ली उपस्थित होते. किशोर चंडक यांना खयाल या राष्ट्रीय संस्थेतर्फे उत्कृष्ट तिकीट संग्राहक- भारताचे वरिष्ठ सुपरस्टार हा एक लाख रुपये पारितोषिक असलेला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित यांच्या हस्ते मानपत्र, शाल देऊन महाराष्ट्र साहित्य परिषद आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टतर्फे किशोर चंडक यांचा सन्मान करण्यात आला.

प्रवीण दीक्षित म्हणाले, भारताबरोबरच ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, अमेरिका आणि जगातील अनेक देश दहशतवादाने त्रस्त आहेत. अनेक बांगलादेशी आणि इतर देशातील नागरिक भारतात बेकायदेशीरपणे राहत आहेत. ते भारतात घुसखोरी करून मतदानदेखील करत आहेत. अशा कोणत्याही सामाजिक सुरक्षा विषयीच्या संकटांबद्दल माहिती मिळाली तर नागरिकांनी सतर्क राहून संबंधित यंत्रणेला ती कळवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी केंद्र शासनाने ११२ हे मोबाईल ॲप मोफत उपलब्ध करून दिले आहे. सामाजिक सुरक्षा ही सुरक्षा यंत्रणांसोबतच प्रत्येक नागरिकाचीही जबाबदारी आहे, असे श्री. दीक्षित याप्रसंगी म्हणाले.

सायबर गुन्हेगारी हे भारतीय समाजासमोर निर्माण झालेले संकट आहे. शासन स्तरावर वारंवार सायबर गुन्हेगारी बाबत समाजाला जागृत करून देखील अनेक नागरिक सायबर गुन्हेगारीला बळी पडत आहेत. तंत्रज्ञानाचे युग असले तरी तंत्रज्ञान वापरताना सतर्कताही बाळगण्याची आवश्यकता आहे. वाहन खरेदी विक्री, अनोळखी व्यक्तीला भाड्याने घर देणे, संशयास्पद व्यक्तींकडून खरेदी करणे अशावेळी नागरिकांनी सावध राहून खात्री करून मगच निर्णय घेतला पाहिजे. भारताने जगाचे नेतृत्व करण्याचे स्वप्न तरुण पिढीच पूर्ण करणार आहे. शासन आणि प्रशासनाने कठोर होऊन समान नागरी कायदा संपूर्ण देशात लागू करण्याची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालय आणि देशभरातील विचारवंतांनी याकरिता अनेकदा आग्रह धरला आहे. उत्तराखंड राज्याप्रमाणे देशातील सर्व राज्यांनी हा कायदा लागू करावा. याचे देशाच्या सामाजिक सुरक्षेवर सकारात्मकच परिणाम दिसतील, असे देखील प्रवीण दीक्षित याप्रसंगी म्हणाले.

ॲड. जे. जे. कुलकर्णी यांनी परिचय करून दिला. प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर यांनी प्रास्ताविक केले. शोभा बोल्ली यांनी मानपत्राचे वाचन आणि सूत्रसंचालन तर प्रा. भीमगोंडा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

### आज विनोदाचे आत्मपर अंतरंग

शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेत आज (गुरुवारी) डॉ. रवींद्र तांबोळी (नांदेड) हे विनोदाचे आत्मपर अंतरंग या विषयावर बोलणार आहेत. सोलापूरकरांनी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सायंकाळी ठीक ६ वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टचे कार्यवाह किशोर चंडक यांनी केले आहे.




# मंगळवेढ्यात महसूलचे कर्मचारी सामुहिक रजा टाकून गेले संपावर

**कार्यालयीन काम ठप्प झाल्याने नागरिकांना आल्या पावले परतावे लागले**

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १७ डिसेंबर**

विधानसभेत चार तहसिलदार,चार मंडलाधिकारी दोन ग्राम महसूल अधिकारी यांना निलंबीत केल्याने त्यांचे निलंबन रद्द करावे या मागणीसाठी मंगळवेढा महसूल विभागातील कर्मचारी दि.१६ पासून सामुहिक रजेवर गेल्याने कामानिमित्त येणार्या नागरिकांची मोठी हेळसांड झाल्याचे चित्र होते.

नागपूर हिवाळी अधिवेशनात दि.१२ रोजी लक्षवेधी प्रश्नाव्दारे गौण खनिज प्रकरणामधील कामकाजाकडे दुर्लक्ष केल्याने चार तहसिलदार, चार मंडलाधिकारी,दोन ग्राम महसूल अधिकारी यांना अन्यायकारक पध्दतीने विधानसभेत निलंबीत केल्याचा दावा महसूल कर्मचार्यांनी करुन सामुहिक रजा टाकून आंदोलन छेडले आहे. मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातील अनेक नागरिक कामानिमित्त तहसिल कार्यालयात आल्यानंतर सर्व कामकाज ठप्प असल्याचे दिसल्याने त्यांनी नाराजी व्यक्ती करत आल्या पावलाने परत जाणे पसंद केले. सामुहिक रजेचे निवेदन कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षामार्फत जिल्हा प्रशासनाला देण्यात आले होते. या निवेदनावर महसूल सहाय्यक एस.आर.कोळी, सहाय्यक म.अधिकारी,पी.आर.निराळी, ए.पी. वानोळे,संगीता ताड,व्ही.आर.उगले, आर.ए.जुंदळे, ए.एल.गायकवाड,एम. एस.शिंदे, यु.आर. बनसोडे आदी कर्मचार्यांच्या या निवेदनावर सह्या आहेत. मंगळवारी तहसिल कार्यालयात केवळ निवासी नायब तहसिलदार या उपस्थित होत्या.

# चार वर्षांच्या चिमुकल्यांचा समुद्रात पराक्रम

**कर्मवीर जलतरण तलावातील फ्लिपर्स स्वीम क्लबचे राज्यस्तरीय यश**

**मालवण समुद्र जलतरण स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.१७ डिसेंबर**

मालवण येथे दि. १३ व १४ डिसेंबर रोजी दोन दिवस चाललेल्या राज्यस्तरीय समुद्र जलतरण स्पर्धेत कर्मवीर जलतरण तलाव येथील फ्लिपर्स स्वीम क्लबच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत अवघ्या ४ वर्षांपासून पुढील वयोगटातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. विशेष म्हणजे या चिमुकल्या खेळाडूंनी ५०० मीटरपासून ते थेट १०किलोमीटरपर्यंत समुद्रात यशस्वी जलतरण करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. खडतर समुद्र प्रवाह, उंच लाटा व आव्हानात्मक वातावरणातही खेळाडूंनी दाखवलेले धैर्य, आत्मविश्वास व तांत्रिक कौशल्य विशेष उल्लेखनीय ठरले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सातत्यपूर्ण सरावाचे हे फलित असल्याचे दिसून आले.

**यशस्वी खेळाडू-** १) हृदयांश डोईफोडे (वय ४)- ५०० मीटर २) एकांश भोसले (वय ४)- ५०० मीटर ३) शिवराज बारबोले (वय ९)- १ किलोमीटर ४) दर्शन चव्हाण (वय ९)- १ किलोमीटर ५) तन्वी नवले (वय ९)- १ किलोमीटर व १० किलोमीटर ६) शौर्य नवले (वय १०)- २ किलोमीटर व १० किलोमीटर ७) जान्हवी वास्कर- ३ किलोमीटर व १० किलोमीटर ८) माधव शिंदे- ३ किलोमीटर व १० किलोमीटर ९) जयसिंह शिंदे- ३



किलोमीटर व १० किलोमीटर १०) रुद्र नवले- १० किलोमीटर. मार्गदर्शक- बाळराजे पिंगळे (कोच).

या यशाबद्दल पालक, प्रशिक्षक, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच क्रीडाप्रेमींनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले असून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# टेंभुर्णी येथे शनिवारी डॉ. पावले व डॉ. परळे यांचा विशेष सन्मान

**राजयोगिनी उषा दिदींचे अध्यात्मिक प्रवचन होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१७ डिसेंबर-**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय टेंभुर्णीच्या विद्यमाने जागतिक कीर्तीचे हृदयरोग तज्ञ डॉ. अमित पावले व सोलापूरचे दयरोग तज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांच्यासह मान्यवरांचा सन्मान शनिवारी २० डिसेंबर रोजी टेंभुर्णी येथील पुष्पक मंगल कार्यालयात होणार आहे. यावेळी माउंट आबू राजस्थान येथील ब्रह्मकुमारी संस्थेच्या वक्तया राजयोगिनी उषा दिदी यांचे 'सुखी जीवनाचा आधार श्रेष्ठ कर्म' या विषयावर प्रवचन होणार असल्याची माहिती जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी माजी आमदार विनायकराव पाटील, अकलूज सेंटरच्या संचालिका शिवरात्री बहनजी, टेंभुर्णीच्या संचालिका अनिता बहनजी, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, माढा विधानसभा अध्यक्ष रमेश पाटील, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुकाराम ढवळे, संभाजी गोटू पाटील, दीपक पाटील उपस्थित होते. अनिता बहनजी यांनी ब्रह्माकुमारी संस्थेचा परिचय करून दिला. डॉ. पावले अमेरिकेतील सेंट लुईस येथील बीजेसी हॉस्पिटल मधील निष्णात हार्ट सर्जन आहेत.शनिवारी कार्यक्रमानंतर किमान दीड हजार लोकांच्या जेवणाचे आयोजन केले आहे.

# पोलीस-पाटील हे पोलीस प्रशासनाचे कान अन् डोळे : यामावार

**५० गावच्या पोलीस पाटलांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ डिसेंबर-**

पोलीस-पाटील हे पोलीस प्रशासनाचे डोळे, कान असून त्यांनी गावपातळीवर शांतता प्रस्थापित करावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांनी केले.

ते अक्कलकोट येथील दक्षिण पोलीस ठाण्यात आयोजित पोलीस-पाटील दिनानिमित्त सन्मान कार्यक्रमात बोलत होते. यावेळी पालिस निरिक्षक सुरेश चिल्लवार, सपोनि साईनाथ सुरवसे, पोलीस पाटील संघाचे जिल्हा अध्यक्ष शिवानंद फुलारी उपस्थित होते. सपोनि सुरवसे यांनी प्रस्ताविक केले. सर्व पोलीस पाटील यांनी मागील वर्षभर केलेल्या कार्याची दखल घेऊन प्रमाणपत्र, गुच्छ, फेटा बांधून सन्मान करण्यात आला. डीवायएसपी यामावर म्हणाले, पोलीस पाटील यांनी पोलिसांना प्रत्येक घटना, घडामोडीची माहिती वेळच्या वेळी द्यावी. मागील वर्षभरातील अतिवृष्टीसह विविध प्रसंगी उत्तम काम केल्याचे कौतुक केले. पोलीस निरीक्षक चिल्लवार यांनी आगामी निवडणूकीतही सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी सपोनि अमोल माने, सपोनि साईनाथ सुरवसे, पोलीस सुनील माने, अजय भैरगुंडे, सिद्धाराम घंटे, अरुण राऊत, हरिदास सलगरे, सुभाष दासरी यांच्यासह पोलीस पाटील उपस्थित होते. सुनील माने यांनी सूत्रसंचालन केले. बहिरगुंडे यांनी आभार मानले.



पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार मागील दोन वर्षांपासून सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात हा उपक्रम राबविला जात आहे. अक्कलकोट दक्षिण, उत्तर, वळसंग, मंद्रूप, मोहोळ, बार्शी, करमाळा, माळिशरस, सांगोला, पंढरपूर, सोलापूर तालुका, कुर्डवाडी, माढा येथेही पोलीस पाटील दिन उत्साहात झाला.

# भाजपला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीच्या एकीची वज्रमूठ

**रविवारी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन जागा वाटप अन् प्रभागांवर होणार चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

आगामी महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजेल आहे. मतदान आणि मतमोजणी यांच्या तारखा निश्चित झाल्या आहेत. निवडणुकीच्या गोळा बेरजेच्या राजकारणाला आता सुरुवात झाली आहे. महापालिका निवडणुकीत महायुतीला विशेषतः भाजपला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीने वज्रमूठ बांधली आहे. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासमवेत मनसे, माकप, वंचित बहुजन आघाडी देखील असणार आहे. त्यांच्यात जागा वाटपाचा तिढा नसणार आहे. पण, कोणत्या पक्षाला किती जागा व कोणते प्रभाग कोणाला सोडायचे, यावर रविवारी सर्वपक्षीय बैठक होणार आहे.

दरम्यान, भाजपने स्वबळाची तयारी केली असून, महायुती न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस देखील स्वबळावर लढणार आहे. या पार्श्वभूमीवर आपण एकत्रितपणे लढलो तर आपल्याला सर्वाधिक जागा मिळू शकतात, असा विश्वास महाविकास आघाडीला वाटत आहे. त्यानुसार शहरातील २६ प्रभागांमध्ये महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्षाचे प्रमुख पदाधिकारीच उमेदवार असतील, अशी सद्यः स्थिती आहे. त्यात काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेचे जिल्हाप्रमुख गणेश वानकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महेश गादेकर, रियाज मोमीन, मनसेचे जिल्हाप्रमुख विनायक महिंद्रकर, वंचित बहुजनचे शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, मापकचे माजी आमदार नरसय्या आडम यांच्या पत्नी कामिनी आडम असे प्रमुख उमदेवार असतील. त्यांच्यासमवेत बाकीचे उमेदवार निवडणूक आणायचे महाविकास आघाडीच्या नेत्यांचे नियोजन असल्याची चर्चा आहे.आम्ही एकजुटीने लढून सर्वात मोठा पक्ष आमची महाविकास आघाडीच राहील, असा विश्वास सर्व पक्षातील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यादृष्टीने महाविकास आघाडीतील सर्व पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. १६ जानेवारीला कोणता पक्ष मोठा आणि कोणाचा महापौर होणार हे स्पष्ट होणार आहे.

निवडणुकीसाठी आम्ही महाविकास आघाडीमधूनच लढणार आहोत. त्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, मनसे, माकपसह अन्य पक्ष सहभागी असतील. जागावाटपाचा मुद्दा आमच्यात प्रमुख नसणार आहे, उमेदवारी अर्ज भरायला सुरवात होण्यापूर्वी आघाडीतील सर्व पक्षातील पदाधिकाऱ्यांची बैठक होईल. त्यावेळी सविस्तर चर्चा होऊन रणनिती निश्चित होईल. असे आघाडीच्या नेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

एमआयएमचा एकला चलो रेचा नारा भाजपविरोधात निवडणूक लढताना एमआयएमने शहरातील प्रभाग १४, १६, १७, २०, २१ आणि २२ मध्ये स्वबाळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. शहराध्यक्ष शौकत पठाण यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. हे सहा प्रभाग सोडून बाकीच्या प्रभागांमध्ये जुळवून घेण्यासाठी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासमवेत बोलणे सुरू असल्याचेही शौकत पठाण यांनी सांगितले. पण, त्यांचा हा प्रस्ताव महाविकास आघाडीतील काँग्रेस नेते मान्य करणार नाही हे निश्चित मानले जात आहे. त्यामुळे महापालिकेच्या रणांगणात एमआयएम स्वबळावरच मैदानात असणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# एकेक 'रोशन' शोधून काढा...

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातल्या मथुर गावातल्या रोशन कुळे या शेतकऱ्याला सावकारी कर्जापायी आपली किडनी विकावी लागली...! खरंच माणुसकी जिवंत आहे का, असा भयावह प्रश्न उपस्थित करणारी ही दुर्दैवी घटना. व्यवस्थेच्या निष्ठुर झालेल्या काळजाचे हे वास्तव. आपल्या लेकरावर ही वेळ आल्याचे पाहून 'काळ्या आई'चा आत्मा किती दुखावला असेल!... सावकारांनी रोशन यांच्याभोवती कर्जाचा सापळा रचला, तब्बल २० टक्के व्याज आणि प्रतिदिन ५ हजार रुपये भुर्दंड बसवून एका लाखाचे ७४ लाख केले. कळस म्हणजे हे कर्ज फेडण्यासाठी याच सावकारांनी रोशनला त्याची दुचाकी, शेतीची अवजारे, ट्रॅक्टर विकून झाल्यावर, किडनी विकण्याचा अमानुष सल्ला दिला आणि रोशनचा नाईलाज त्याच्या अवयवाहून मोठा झाला. कोणत्याही सहृदय माणसाचे मन हेलावून जाईल, अशी ही घटना.

मथुर नावाचे छोटेसे गाव. तिथे राहणारा रोशन कुळे नावाचा तरुण शेतकरी आई-वडील, भाऊ, पत्नी आणि २ चिमुकल्यांसह आनंदातच जगत होता. चार एकरावर तो शेती करायचा. हात-पाय चालत होते, डोळ्यात स्वप्नं होती आणि काळजात 'काळ्या आई'विषयी अपार आस्था होती. पण व्यवस्थेने त्याला अशा वळणावर आणून सोडले की आपल्या घरच्या माणसांना सन्मानाने जगवण्यासाठी, सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी त्याला स्वत:च्या शरीराचा लचका तोडून विकावा लागला. सावकारी कर्जाचा डोंगर उपसण्यासाठी या अन्नदात्याने चक्क स्वत:ची किडनी विकली, हे पाहून, ऐकूनही ज्याच्या डोळ्यात अश्रू येत नसतील तर आपल्याला माणुसकीचे काहीही सोयरसुतक उरलेले नाही, हे समजून जा. ही केवळ एका रोशनची शोकांतिका नाही, तर हा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या गळ्याला पडलेला फास आहे. दशके उलटली, सरकारे आली आणि गेली. दरवर्षी विधिमंडळ सभागृहाच्या पायऱ्यांवरून शेतकरी कल्याणाच्या गप्पा मारल्या जातात. आम्ही कर्जमाफी दिली, सन्मान निधी दिला, पीक विमा दिला, अशा घोषणांचा पाऊस पडतो. कोट्यवधी रुपयांचे पॅकेजेस जाहीर होतात. तरीही प्रश्न उरतो की, या योजना खरोखरच गरजूंपर्यंत पोहोचत असतील तर मग 'रोशन'ला किडनी का विकावी लागली? सारेच राजकीय नेते आपण शेतकऱ्यांची लेकरे आहोत, असे उच्चरवाने सांगतात. सारेच राजकीय पक्ष आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना 'राजा' म्हणतात. पण हा राजा किती कंगाल झालाय, याचा कुणालाही अंदाज नाही. सरकारी कागदांवर शेतकरी श्रीमंत दिसत असेलही; पण मातीत राबणारा बळीराजा बव्हंशाने आजही दारिद्र्याच्या दलदलीत रुतलेला आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती म्हणजे उघडी भळभळणारी जखमच आहे. आकडेवारी काय सांगते? नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, भारतात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होतात. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात या प्रगतिशील राज्यात एकूण २७०६ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली. त्यातही सर्वाधिक १०६९ आत्महत्या एकट्या अमरावती विभागात झाल्या. अगदी ताज्या अहवालानुसार, २०२५ च्या सुरुवातीच्या ९ महिन्यांत अर्थात सप्टेंबरपर्यंत मराठवाड्यात ७८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. अवघ्या महाराष्ट्राचा विचार केला तर ही संख्या फार मोठी होईल. शेतकऱ्यांच्या मृत्यूंचे हे आकडे भयावह आहेतच. शिवाय, जिवंतपणी मरण यातना भोगणाऱ्या शेतकरी कुटुंबांची संख्याही लाखोंच्या घरात आहे. रोशन हा अशा दुर्भाग्याचे लेणे कपाळी आलेल्यांपैकी एक. महाराष्ट्रात सुमारे ८२ टक्के शेतकरी अत्यल्प भूधारक आहेत. लहरी वातावरण, महाग बियाणे, रासायनिक खत आणि पुरेशा साधनसामुग्रीच्या अभावाने उत्पन्नाचा आणि खर्चाचा ताळमेळ बसत नसल्याने प्रति कुटुंब सरासरी १ ते १.५०० लाखांहून अधिक कर्ज शेतकऱ्यांच्या डोक्यावर आहे. शासनाच्याच आकडेवारीनुसार, कर्जमाफीनंतरही ७० टक्के शेतकरी कर्जाच्या जाळ्यातून मुक्त झालेले नाहीत. एकीकडे निसर्ग झोडपत असतो, सरकारच्या लहरींचा कहर असतो आणि गावागावांत सावकारांचा ससेमिरा असतो. महाराष्ट्रात 'सावकारी प्रतिबंधक अधिनियम २०१४' हा कडक कायदा अस्तित्वात आहे. विनापरवाना सावकारी करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. तरीही गावोगावी सावकारांची समांतर सत्ता चालते. वीस-वीस टक्के किंवा त्याहून अधिक मासिक व्याजाने ते शेतकऱ्याला कर्ज देतात. लहानसा कर्जाचा आकडाही काही वर्षांत लाखांच्या घरात जातो. सावकार केवळ शेतकऱ्यांना लुबाडत नसतात. ते साऱ्या व्यवस्थेची लक्तरे फाडत असतात. शेतकऱ्यांना पायाशी लोळण घ्यायला लावतात आणि प्रसंगी मरण पत्करायला भाग पाडतात. कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे, कोरे धनादेश घेणे किंवा अवघी जमीनच आपल्या नावावर करून घेण्याचे प्रकार आजही महाराष्ट्रात राजरोस सुरू आहेत. प्रशासन आणि पोलिस यंत्रणा यावर आळा घालण्यात अपयशी ठरली आहे. अनेकदा या सावकारांना स्थानिक राजकारण्यांचे अभय असते. रोशन कुळे या शेतकऱ्याने किडनी विकली. कारण सावकारांचा तगादा त्याच्या आत्मसन्मानाला पटत नव्हता. कर्जाचे व्याज घ्यायला आलेला सावकार बायको-मुलांसमोरच त्याची इज्जत काढायचा. एकदाचे हे संपवू आणि पुन्हा आपल्या कुटुंबासह आनंदाने जगू, असा विचार करून, अगदी मनावर दगड ठेवूनच रोशनने आपली किडनी विकली असणार. जगण्यासाठी आवश्यक असलेला अवयव विकताना त्याच्या काळजाला असंख्य छिद्रे पडली असतील. पण कुठे फिटले त्याचे कर्ज? कंबोडियाला जाऊन किडनी विकल्यानंतरही केवळ आठ लाख रुपये आले. कर्ज तर व्याजावर व्याज चढून ७४ लाखांचे झाले होते. त्याने हे पूर्ण कर्ज फेडले पाहिजे, असे ही व्यवस्था आणि आपला समाज म्हणत असेल तर त्याला उरलेले अवयव एका झटक्यात विकावे लागतील. अन्यथा ७४ लाखांचे दीड कोटी काही महिन्यांत होतील!

रोशनसारख्या अनेक शेतकऱ्यांचे असेच हाल आहेत. रोशनवर किडनी विकण्याचा प्रसंग आला. इतरांनाही काही ना काही विकावेच लागते. शेतकरी कर्जासाठी बँकांकडे का जात नाहीत, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बँकांचे नियम, 'सिबिल स्कोअर'ची अट आणि कागदपत्रांचा ढीग सामान्य शेतकऱ्यांना समजण्यापलीकडचा आहे. बँकेत गेल्यावर व्यवस्थापकांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि कर्जासाठी लागणारे हेलपाटे यापेक्षा शेतकऱ्याला सावकाराचा उंबरठा जवळचा वाटतो. सावकार कागद विचारत नाही. फक्त कुठल्या तरी कागदावर सही घेतो आणि चटकन पैसे देतो. सावकार त्याच क्षणी शेतकऱ्याच्या आयुष्याची दोरी आपल्या हाती घेतो. बँकिंग व्यवस्था शेतकऱ्यांना दिलासा देऊ शकत नाही तेव्हाच अवैध सावकारांचे फावते. एखाद्याला अडकित्त्यात धरावे तसे सावकार बळीराजाला अडवून ठेवतो. रोशन कुळे यांची व्यथा समोर आली म्हणून आज आपण हळहळतो आहोत. पण विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशाच्या कोनाकोपऱ्यात असे कितीतरी 'रोशन' असतील, ज्यांनी कदाचित आपल्या घरातील दागिने, बैलजोडी आणि स्वत:चे अवयवही गहाण ठेवले असतील. विकलेही असतील. आता असा एकेक 'रोशन' शोधण्याची आणि त्याच्या पाठीशी उभे राहण्याची वेळ आली आहे. रोशन कुळे यांच्या प्रकरणाची तर शासनाने, प्रशासनाने सखोल चौकशी करावी आणि सावकारांना दंडित करावेच. शिवाय, शेतकऱ्यांवर कुठे-कुठे अन्याय होत आहे, हेही पटवारी, कोतवाल, ग्रामसेवकांना कामाला लावून तातडीने शोधले पाहिजे. अवैध सावकारी आणि त्यातून घडलेली ही शोकांतिका ही माणुसकीला लागलेली कीड आहे. सरकारसाठी हा आत्मचिंतनाचा विषय आहे. पाठ थोपटून घेणे फार झाले. घोषणाबाजी पुरे झाली. विरोधी पक्षांचे 'नॉन इश्यूज'वर ढोल बडविणेही आता थांबले पाहिजे. शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज पोहोचतेय का, याची शहानिशा करताना त्यासाठीची व्यवस्था तत्काळ दुरुस्त केली पाहिजे. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही त्यासाठी झटले पाहिजे. अन्यथा, ज्या हातांनी आपल्याला अन्न मिळते, तेच हात उद्या रिकामे आणि छिन्नविछिन्न अवस्थेत दिसतील आणि इतिहासाच्या पानावर हे कायमचे कोरले जाईल की, एका प्रगत राज्यात शेतकऱ्याला सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी आपली किडनी विकावी लागली! ▮

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# वेब ४.० तंत्रज्ञान

एकविसाव्या शतकाची सुरुवात होऊन आता २५ वर्षे झाली आहेत. तरीही, गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये तंत्रज्ञानात, समाजजीवनात ज्या प्रकारे बदल झाले, तितके त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते असे म्हणता येईल. कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन या त्रिकुटामुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. आजचे इंटरनेट मुख्यतः माहिती शोधणे, संवाद साधणे आणि व्यवहार करण्यापुरते मर्यादित आहे; परंतु उद्याचे इंटरनेट अधिक वेगवान, बुद्धिमान, सुरक्षित आणि मनुष्यकेंद्रित असेल. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, मिश्र-वास्तव, ६ जी नेटवर्क आणि ब्लॉकचेन यामुळे इंटरनेटचा अनुभव संपूर्णपणे बदलणार आहे. उद्याचे इंटरनेट सर्वप्रथम त्याच्या वेग आणि क्षमतेमुळे ओळखले जाईल. ६ जी नेटवर्क भरपूर वेग प्रदान करेल आणि विलंब वेळ जवळपास शून्य असेल. यामुळे स्वयंचलित वाहने, रोबोटिक सर्जरी आणि मोठ्या प्रमाणात उपकरणांचे संचालन सहजशक्य होईल. 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'चा विस्तार इतका वाढेल की घरातील प्रत्येक उपकरण, शहरे, उद्योग आणि वाहतूक व्यवस्था इंटरनेटला जोडलेली असेल. या परिवर्तनाचा पुढील टप्पा म्हणजे एआय चालित इंटरनेट. भविष्यातील इंटरनेट फक्त निर्देश दिल्यावर काम करणार नाही, तर वापरकर्त्याच्या गरजा आधी ओळखून सेवा देईल. वैयक्तिक सवयी, आवाज, भाव-भावना, आणि वर्तन यांचे विश्लेषण करून इंटरनेट प्रत्येक वापरकर्त्याला स्वतंत्र अनुभव देईल. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शॉपिंग आणि शासन या सर्व ठिकाणी एआय एजंट्स वापरकर्त्यांच्या वतीने निर्णय घेतील, कामे करतील आणि समस्यांचे निराकरण करतील. इंटरनेट अधिक संवेदनशील आणि परिस्थितीपरत्वे बदलणारे होईल, ज्याला 'प्रिडिक्टिव्ह इंटरनेट' म्हणता येईल.

अशा या सर्व बदलांच्या पृष्ठभूमीवर वेब ४ हे पुढील पिढीचे इंटरनेट म्हणून उदयास येत आहे. वेब १.० वाचण्यासाठी (ब्राऊजर) होते, वेब २.० वाचण्यासाठी आणि लिहिण्यासाठी तसेच सोशल मीडिया, इंटरॲक्टिव्हिटी साधणारे होते. वेब ३.० सिमेंटिक वेब असल्याने मशीन डेटाचा अर्थ समजून घेते. या पृष्ठभूमीवर वेब ४.० ची प्रमुख वैशिष्ट्ये लक्षात घेण्याजोगी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग वेब ४.० च्या केंद्रस्थानी एआय असेल. हे वापरकर्त्याची गरज ओळखून विशिष्ट आणि वैयक्तिकृत सेवा देण्यासाठी डेटाचे विश्लेषण करेल. मानव-मशीन सहकार्य यात पाहायला मिळेल. डिजिटल उपकरण मानवी भावना आणि हेतू




अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतील आणि वापरकर्त्यासोबत भागीदाराप्रमाणे काम करतील. अखंड आणि सर्वव्यापी कनेक्टिव्हिटी हे याचे ठळक वैशिष्ट्य असेल. इंटरनेट ऑफ थिंग्जच्या माध्यमातून कार, स्मार्ट उपकरणे, घरे इत्यादी रोजच्या वापरातल्या वस्तू वेबशी जोडल्या जातील आणि संवाद साधतील. संवर्धित वास्तविकता आणि आभासी वास्तविकता हे या तंत्राचे वैशिष्ट्य भन्नाट असेल. वापरकर्ते केवळ मॉनिटरवर माहिती पाहण्याऐवजी आभासी जगात वावरतील. विकेंद्रीकरण आणि ब्लॉकचेनच्या अनुषंगानेही याचे महत्त्व मोठे असेल. डेटा आणि व्यवहारांची सुरक्षा, पारदर्शकता आणि मालकी वापरकर्त्याकडे राहील. या तंत्राद्वारे व्यवहार करताना डिजिटल सहायक लगेच निर्णय घेईल आणि व्यवहार पूर्ण करेल. इंटरनेटचा अनुभव फक्त डिजिटल न राहता मानवी स्वरूपाचा होईल.

वेब ४.० हे इंटरनेटला 'मानवी भाव' देणारे युग असेल. वेब ४.० ला सिम्बायोटिक वेब किंवा इंटेलिजेंट वेब असेही म्हणतात. ही वर्ल्ड वाईड वेबची पुढील पिढी आहे, जी मानव आणि डिजिटल उपकरणांमध्ये अधिक सहज आणि बुद्धिमान संवाद साधण्यावर केंद्रित आहे. यामुळे इंटरनेट आणखी शक्तिशाली होईल. मागील वेब आवृत्त्यांपेक्षा हे अधिक प्रगत असेल. वेब ४.० चे तंत्र समजून घेण्यासाठी आणि आत्मसाद करण्यासाठी काय करावे, हा एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्र शिक्षण येथे महत्त्वाचे ठरते. केवळ संगणकीय भाषा (कोडिंग) शिकण्याऐवजी, माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेणारे अल्गोरिदम (गणिती सूत्रे) कसे तयार करायचे हे यासाठी शिकायला हवे. पायथॉनसारख्या संगणकीय भाषांचा सखोल अभ्यास करावा लागेल. त्याचबरोबर वेगवेगळ्या उपकरणांना (गॅझेट्सना) इंटरनेटने कसे जोडायचे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा करायचा, यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. विकेंद्रित साखळी (ब्लॉकचेन) अर्थात माहितीची सुरक्षा आणि पारदर्शकता राखणाऱ्या ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचे मूलभूत सिद्धांत (तत्त्वे) समजून घ्यावे लागतील. त्यासाठी प्रात्यक्षिक आणि थेट औद्योगिक कामावर भर द्यावा लागेल. नुसते पुस्तकी ज्ञान न घेता स्वत:चे छोटे कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल किंवा वस्तूंचे इंटरनेट आधारित ॲप तयार करावे लागेल. यामुळे तुमचा अनुभव वाढेल. कोणत्याही गुंतागुंतीच्या तांत्रिक अडचणीवर योग्य तोडगा काढण्याची क्षमता विकसित करावी लागेल, कारण या क्षमतेला जास्त मागणी असेल.

या अनुषंगाने ज्ञान सातत्याने वाढवणे महत्वाचे ठरावे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे (सर्टिफिकेशन) महत्त्व येथे ओळखता येईल. जागतिक स्तरावर मान्य असलेल्या क्लाऊड, सायबर सुरक्षा आणि यंत्र शिक्षण क्षेत्रातील प्रमाणपत्रे मिळवणे कामी येईल. शिकणाऱ्यांनी या अनुषंगाने भावनिक आणि संवाद कौशल्ये विकसित करावीत. तुम्ही तयार केलेले जटिल तंत्रज्ञान सहकाऱ्यांसमोर किंवा ग्राहकांसमोर सोप्या भाषेत स्पष्टपणे मांडता आले पाहिजे. मोठ्या आणि विविध विषयांवरील प्रकल्पांमध्ये (प्रोजेक्ट्समध्ये) टीमसोबत जुळवून घेण्याची कला आत्मसात करावी लागेल. वेब ४.० मध्ये एआय एजंट्स आपल्या वतीने काम करतील. खरेदीपासून प्रवासापर्यंत, आरोग्य तपासणीपासून गुंतवणुकीपर्यंत डिजिटल सहायक लगेच निर्णय घेईल आणि व्यवहार पूर्ण करेल. इंटरनेटचा अनुभव फक्त डिजिटल न राहता मानवी स्वरूपाचा होईल. हे इंटरनेटला 'मानवी भाव' देणारे युग असेल. यामुळे समाजात सर्व क्षेत्रांमध्ये मोठे सकारात्मक बदल घडतील. शिक्षण अधिक वैयक्तिक आणि आभासी होईल; विद्यार्थी जगभरातील वर्गखोल्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित असल्यासारखे शिकू शकतील. आरोग्यक्षेत्रात एआय आधारित निदान, दूरस्थ शस्त्रक्रिया आणि वैयक्तिक हेल्थ मॉनिटरिंग सामान्य होईल. उद्योगांमध्ये स्मार्ट फॅक्टरी आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया वाढेल. शासनातील सेवा पूर्णपणे डिजिटल आणि तत्काळ उपलब्ध होतील. उद्याचे इंटरनेट हे अधिक वेगवान, सुरक्षित, बुद्धिमान आणि मानवी स्वरूपाचे असेल. वेब ४.० ही मानव आणि मशीन यांच्यातील बुद्धिमान भागीदारीची नवी क्रांती असेल. येऊ घातलेला बदल फक्त तंत्रज्ञानापुरता मर्यादित न राहता संपूर्ण समाजव्यवस्था, शिक्षण, उद्योग आणि मानवी जीवनपद्धती यावर खोलवर परिणाम करणार आहे. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भाजपाला लाभले तरुण अध्यक्ष

भाजपाच्या कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्षपदी बिहारच्या नितीन नबीन यांची अखेर नियुक्ती झाली. त्यामुळे भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष तेच होणार, हे स्पष्ट झाले आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कोण येणार, याबद्दल बरीच उत्सुकता होती. अध्यक्षपदासाठी अनेक नावांची चर्चाही होती. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीप्रमाणे आपल्या धक्कातंत्राच्या कार्यशैलीचा परिचय करून देत या पदावर नितीन नबीन यांची निवड केली. यामुळे अनेकांना धक्का बसला. कारण राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी गेल्या काही दिवसांत ज्या नावांची चर्चा होती, त्यात नितीन नबीन यांचे नाव कुठेच नव्हते. या सर्व दिग्गज नेत्यांना मागे टाकत नितीन नबीन यांनी अध्यक्षपदावर बाजी मारली. कधीकाळी आपण भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होऊ, असा विचारही त्यांनी कधी केला नसेल.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाईल, असे बोलले जात होते; पण तो अध्यक्ष बिहारचा असेल, अशी कल्पना स्वप्नातही कोणी केली नसेल. ४५ वर्षांच्या भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्षपद ४५ वर्षांच्याच नितीन नबीन यांच्या गळ्यात पडले, असे करत भाजपाच्या नेतृत्वाने तरुण रक्ताला आपण संधी देत असल्याचे दाखवून दिले. भाजपा हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. या पक्षात काम करणाऱ्या प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांला संधी मिळते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे ८० वर्षांचे असताना देशातील सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष ४५ वर्षांचा आहे, हाच भाजपा आणि देशातील अन्य राजकीय पक्षातील फरक आहे. प्रसिद्ध चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन यांचा एक गाजलेला संवाद आहे, 'हम जहा खडे होते है, वही से लाईन शुरु होती है'. त्याच धर्तीवर देशातील सर्व राजकीय पक्षाच्या भल्याभल्या नेत्याची आणि पत्रकारांची विचार करण्याची क्षमता संपते, तेथून पंतप्रधान मोदी यांची विचार करण्याची क्षमता सुरू होते, असे म्हणायला हरकत नाही. नितीन नबीन बिहारमधील भाजपाचे ज्येष्ठ नेते नवीनकिशोर सिन्हा यांचे पुत्र. पाटण्याच्या बांकीपूर विधानसभा मतदारसंघातून ते सलग पाचवेळा विधानसभेवर निवडून आले. भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा ते बिहारच्या



नितीशकुमार मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री होते. भाजयुमोचे राष्ट्रीय महसचिव तसेच नंतर बिहार प्रदेश भाजयुमोचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. बिहार भाजयुमोचे अध्यक्ष असताना नितीन नबीन यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते अब्दुल जलील मस्तान यांच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा नोंदवला होता, तसेच त्यांच्या नागरिकत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. एका मेळाव्यात मस्तान यांनी पंतप्रधान मोदी यांच्या छायाचित्राला चपलांनी मारण्याचे आवाहन केले होते.

भाजपाने छत्तीसगडचे प्रभारी म्हणून नितीन नबीन यांना जबाबदारी सोपवली होती. छत्तीसगडमधून काँग्रेसला सत्तेवरून पायउतार करण्यात आणि राज्यात भाजपाला सत्तेवर आणण्यात नितीन नबीन यांची महत्वपूर्ण भूमिका होती. तेव्हापासूनच ते भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्या नजरेत आले होते. मागील आठवड्यात गृहमंत्री अमित शाह छत्तीसगडची राजधानी रायपूरच्या दौऱ्यावर असताना तेथे त्यांनी नितीन नबीन यांची अचानक भेट घेतली. या गोपनीय भेटीत नितीन नबीन यांच्याकडे भाजपाची धुरा सोपवण्याची पटकथा लिहिण्यात आली असे समजते. विशेष म्हणजे याची कुणकुण पक्षात कोणालाच लागली नाही. शाह यांच्या भेटीच्या दुसऱ्या दिवशी नितीन नबीन दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी भाजपाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि संघटन मंत्री बी. एल. संतोष यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. अशाप्रकारे देशातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षाचे नेतृत्व नितीन नबीन यांच्याकडे आले.

पुढील वर्षी म्हणजे २०२६ च्या जानेवारी महिन्यात भाजपाच्या राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाईल आणि पक्षाची अधिकृत सूत्रे त्यांच्याकडे येतील. भारतीय जनसंघ हा भारतीय जनता पक्षाचा पूर्वाधिकारी म्हटला पाहिजे. तरुणांकडे पक्षाचे नेतृत्व सोपवण्याचा प्रकार जनसंघातही होता, त्याचीच पुनरावृत्ती भाजपात झाली. अटलबिहारी वाजपेयी पहिल्यांदा भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ते ४४ वर्षांचे होते. लालकृष्ण अडवाणी यांनी ४६ व्या वर्षी जनसंघाचे अध्यक्षपद स्वीकारले. नितीन नबीन सध्या कार्यकारी अध्यक्ष झाले आहे. येत्या काही दिवसांत नियमित राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी येईल, तेव्हा ते ४५ वर्षांचे असतील. भाजपाच्या आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वांत लहान आणि तरुण अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावाची नोंद झाली आहे. अमित शाह भाजपाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ४९ वर्षांचे होते, तर नितीन गडकरी यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारले तेव्हा ते ५२ वर्षांचे होते. नितीन नबीन भाजपाचे बारावे अध्यक्ष आहेत. आतापर्यंत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, डॉ. मुरलीमनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, बंगारू लक्ष्मण, जन कृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथसिंह, नितीन गडकरी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवले. कुशाभाऊ ठाकरे भाजपाचे सर्वांत ज्येष्ठ अध्यक्ष म्हणावे लागतील, ७६ व्या वर्षी ते भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. त्यानंतर जन कृष्णमूर्ती यांच्याकडे ७३ व्या वर्षी भाजपाचे अध्यक्षपद आले. बंगारू लक्ष्मण ६१ वर्षांचे असताना, तर नड्डा ६० वर्षांचे असताना भाजपाचे अध्यक्ष झाले.

लालकृष्ण अडवाणी ५९ व्या वर्षी पहिल्यांदा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले, तर अटलबिहारी वाजपेयी यांनी ५६ वर्षांचे असताना भाजपाचे पहिले अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. डॉ. मुरलीमनोहर जोशी भाजपाचे अध्यक्ष झाले, तेव्हा ५५ वर्षांचे होते. राजनाथसिंह यांनी ५४ व्या तर व्यंकय्या नायडू यांनी ५३ व्या वर्षी भाजपाचे अध्यक्षपद स्वीकारले. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, राजनाथसिंह, अमित शाह तसेच जे. पी. नड्डा एकापेक्षा जास्त कार्यकाळ भाजपाचे अध्यक्ष होते. भाजपाचे सर्वाधिक काळ अध्यक्षपद लालकृष्ण अडवाणी यांनी भूषवले, तीन कार्यकाळ मिळून अडवाणी जवळपास ११ वर्षे भाजपाचे अध्यक्ष होते, अटलबिहारी वाजपेयी, अमित शाह आणि जे. पी. नड्डा दोन कार्यकाळ मिळून सहा वर्ष भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. राजनाथसिंह यांनी पाच वर्षे भाजपाचे अध्यक्षपद सांभाळले. नितीन गडकरी यांनी चार वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पद भूषवले. बंगारू लक्ष्मण आणि जन कृष्णमूर्ती सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त एक वर्ष भाजपाचे अध्यक्ष होते. २०२९ ची लोकसभा निवडणूक भाजपा नितीन नबीन यांच्या नेतृत्वात लढवेल, असे दिसते. नव्या दमाच्या नेत्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यामुळे आधीच उत्साहाने फसफसणाऱ्या भाजपात नवचैतन्य निर्माण होईल, यात शंका नाही. ▮

९८८१७१७८१७

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# हरवलेले शिक्षण..!

आज शिक्षण हा विषय केवळ धोरणांचा किंवा अभ्यासक्रमाचा राहिलेला नाही, तर तो थेट समाजाच्या भवितव्याशी जोडलेला गंभीर प्रश्न बनला आहे. कधीकाळी गुरुकुल पद्धतीत राजा असो वा रंक, श्रीमंत असो वा गरीब, सर्व मुले एकाच आश्रमात, एकाच गुरुकुलात समान शिक्षण घेत होती. ज्ञानासोबत शिस्त, संयम, कष्ट, मूल्ये आणि माणूसपण घडवले जात होते. आज मात्र 'कॉन्व्हेंट संस्कृती'ने शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच बदलून टाकले आहे. सरकारी शाळा म्हणजे गरिबांची आणि कॉन्व्हेंट म्हणजे प्रतिष्ठेचे, यशाचे प्रतीक, असा धोकादायक भ्रम समाजाच्या मनात पद्धतशीरपणे रुजवला गेला आहे.

सरकारी शाळांची अवस्था आज अत्यंत विदारक झाली आहे. इमारती आहेत, शिक्षक आहेत, पगार आहेत; मात्र विश्वास उरलेला नाही. या शाळांमध्ये शिकवणारे शिक्षक सरकारकडून नियमित पगार घेतात, पण त्यांची स्वत:ची मुले त्याच शाळांमध्ये शिक्षण घेत नाहीत, ही वस्तुस्थिती कुणालाही अस्वस्थ करणारी आहे. लाखो रुपये फी भरून तीच मुले खाजगी कॉन्व्हेंटमध्ये शिकतात. मग एक मूलभूत प्रश्न उभा राहतो- जे शिक्षक आपल्या शाळेत आपल्या मुलांना घालायला तयार नाहीत, ते इतर पालकांना त्या शाळेवर विश्वास ठेवायला कसे सांगू शकतात? की सरकारला हे सगळे दिसत असूनही ते मुद्दाम डोळ्यांवर झापड बांधून बसले आहे? 'आम्ही सरकारकडून अनुदान घेत नाही, त्यामुळे आम्हाला नियम लागू होत नाहीत' या सबबीखाली गल्लीबोळात, वसाहतींमध्ये कॉन्व्हेंट उभे राहिले. फी ठरवताना कोणताही निकष नाही, कोणतीही मर्यादा नाही. रिक्षावाल्यापासून ते मध्यमवर्गीय नोकरदार पालकांपर्यंत सगळेच कर्ज काढून, गरजा बाजूला सारून आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये घालू लागले. पालकांच्या मनात भीती निर्माण करण्यात आली- इथे नाही घातलं तर मूल मागे पडेल, स्पर्धेत टिकणार नाही, समाजात स्थान मिळणार नाही. पण या महागड्या शिक्षणातून मुलांच्या हाती नेमकं काय येतं? ना धड इंग्रजी येतं, ना नीट मराठी येतं. संस्कार, क्रीडा, कला, समाजभान या सगळ्या गोष्टी अभ्यासाच्या ओझ्याखाली गाडल्या जातात. मोबाईल आणि तथाकथित तंत्रज्ञानाच्या नावाखाली मुलांचे बालपण हिरावून घेतले जाते. खेळाच्या मैदानाऐवजी स्क्रीन, संवादाऐवजी रील्स आणि संवेदनशीलतेऐवजी स्पर्धा अशी पिढी घडवली जात आहे. या कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश घेतला की त्याच शाळेतून पुस्तके घ्यायची, त्यांनी सांगितलेल्या दुकानातूनच गणवेश खरेदी करायचा, गॅदरिंग, इव्हेंट, फंक्शन यांच्या नावाखाली वर्षानुवर्षे पालकांकडून पैसे उकळायचे. हे सर्व माहिती असूनही त्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालकांची धडपड सुरूच असते. कारण पर्याय उरलेला नाही, अशी भावना त्यांच्यात रुजवली गेली आहे. शिक्षणाची पूर्णपणे वाट लागली आहे, हे स्पष्ट दिसत असतानाही सरकार याकडे पाहायला तयार नाही. भारतामध्ये सर्वाधिक काळा व्यवसाय शिक्षण क्षेत्रात चालतो, असे ठामपणे सांगितले जाते. तरीही या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्याची ना राजकीय इच्छाशक्ती दिसते, ना प्रशासकीय गंभीरता. कधी काळी सरकारी शाळांतून शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, अभियंते, लेखक, पत्रकार आणि उद्योजक घडत होते. आज त्या शाळा ओस पडत चालल्या आहेत आणि भविष्यातील पिढी फी भरणारी पण विचारशून्य होत चालली आहे. जो समाज शिक्षणाला व्यापार बनवतो, तो समाज आपल्या भविष्याशीच तडजोड करतो. माणूस घडवणाऱ्या शिक्षणाऐवजी ग्राहक तयार करणारी व्यवस्था निर्माण झाली आहे. या कॉन्व्हेंट संस्कृतीवर वेळीच लगाम घातला नाही, तर विचाराने सुदृढ, मूल्यनिष्ठ आणि समाजाशी नातं जपणारी पिढी घडवणं अशक्य होईल. शिक्षण म्हणजे इमारत, फी आणि इंग्रजी माध्यम नव्हे; शिक्षण म्हणजे माणूस घडवण्याची प्रक्रिया आहे, हे पुन्हा एकदा ठामपणे स्वीकारण्याची हीच योग्य वेळ आहे. आपलं मूल मागे राहू नये या भीतीचा फायदा घेत शिक्षणसंस्थांनी पालकांना मानसिक गुलाम बनवले आहे. मूल शिकतंय की नाही, समजतंय की नाही, आनंदी आहे की नाही, यापेक्षा रिपोर्ट कार्डवरचे ग्रेड, स्पर्धा परीक्षा, रँक यालाच महत्त्व दिलं जातं. परिणामी मुलं ताणतणावाखाली वाढत आहेत. आत्मविश्वासाऐवजी न्यूनगंड, जिज्ञासेपेक्षा यांत्रिक पाठांतर आणि आनंदाऐवजी सततची चढाओढ त्यांच्या आयुष्याचा भाग बनत आहे. शिक्षणाने मोकळं करणं अपेक्षित असताना तेच शिक्षण मुलांना गुदमरवू लागलं आहे. सरकारी शाळा वाचवायच्या असतील तर फक्त इमारती रंगवून उपयोग नाही. तिथे शिकणाऱ्या मुलांना आत्मसन्मान, दर्जेदार शिक्षक, आधुनिक साधने आणि समाजाचा विश्वास परत मिळवून द्यावा लागेल. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे धोरणकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सरकारी शाळांवर विश्वास दाखवला पाहिजे. अन्यथा शिक्षणाचा हा व्यापार असाच फोफावत राहील आणि समाज विचारहीन, संस्कारहीन पिढीच्या दिशेने वाटचाल करत राहील. आज नाही तर उद्या, या दुर्लक्षाची किंमत आपल्यालाच मोजावी लागणार आहे. ▮

९९२२९९९५८८

### थंडीत गोधडीची ऊब कालबाह्य

काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात थंडीचे दिवस सुरू झाले की घराघरांत एक वेगळीच लगबग दिसायची. आई, आजीने हाताने शिवलेल्या साडी-लुगड्यांच्या गोधड्या गाठोड्यातून किंवा माळ्यावरून खाली उतरवल्या जायच्या. त्या गोधडीसोबत आठवणी, माया आणि ऊबही पुन्हा जिवंत व्हायची. मात्र, बदलत्या काळात ही ऊब मागे पडत आहे. आता ब्लँकेट, रजई आणि जाड चादरींनी या गोधडीची जागा घेतल्याचे दिसून येते.

पूर्वी घरातील वापरात नसलेली जुनी नऊवारी, सहावारी, साडी किंवा कापड फेकून देण्याऐवजी त्यातून गोधडी शिवली जायची. लांब सुई, जाड दोरा आणि महिलांच्या कुशल हातांनी गोधडी तयार केली जात होती. रिकाम्या वेळेचा सदुपयोग म्हणून गोधडी शिवताना जुन्या आठवणी, गप्पागोष्टी रंगायच्या आणि नकळत गोधडी पूर्ण होत होती. आई, आजीच्या हातची बारीक शिलाई, वेगवेगळ्या रंगांची साडी, लुगड्यांचे वेगळी आणि खास असायची. या गोधडीच्या ऊबेमुळे कडाक्याची थंडीही जाणवत नसे. मात्र काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि बाजारात सहजपणे जाड ब्लॅंकेट, रजई, रग उपलब्ध होऊ लागली. तसेच या वस्तूंचा वापरही वाढला. परिणामी मागणी कमी झाल्याने गोधडी शिवण्याचे कामही कमी झाले.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

## वाचक पत्रे

### मेस्सी आणि व्यक्तिनिष्ठ समाज!

भारतीय समाजाला व्यक्तिनिष्ठेची लागण झालेली ही सर्वांत गंभीर समस्या आहे. क्रिकेटपटू, अभिनेते यांना डोक्यावर घेऊन नाचण्याची प्रवृत्ती आपल्या समाजात जितकी दिसते, तितकी कदाचित अन्यत्र कुठेही आढळत नसेल. कोलकाता येथे झालेल्या फुटबॉलपटू मेस्सीच्या कार्यक्रमातही हेच चित्र दिसून आले. सुमारे ४८ वर्षांपूर्वी महान फुटबॉलपटू पेले कोलकाता येथे आले होते. त्यानंतर २००८ साली फुटबॉलपटू मेरेडोनाही तेथे आले. या दोन्ही प्रसंगी कोलकात्यात मोठ्या प्रमाणावर गोंधळ उडालेला होता. भारतीय समाजाच्या दृष्टीने ही बाब खरोखरच आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. मागील वर्षी डिसेंबरमध्ये 'पुष्पा २' चित्रपट प्रदर्शित होत असताना अभिनेते अल्लू अर्जुन यांना पाहण्यासाठी चित्रपटगृहाबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच अभिनेते जेसन विजय यांच्या राजकीय सभेच्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांना आपले प्राण गमवावे लागले. खेळाडू किंवा अभिनेते यांच्याभोवती एक वलय निर्माण होते, हे मान्य आहे; परंतु राष्ट्र आणि समाजासाठी त्यांचे प्रत्यक्ष योगदान नेमके काय असते, याचा विचार आपण करतो का? अशा व्यक्तींचे अंधानुकरण करून नेमके कुणाचे कल्याण होते? जे खरोखरच समाजासाठी आणि राष्ट्रासाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावून कार्य करतात, त्यांच्याविषयी आपण किती संवेदनशील असतो? खेळाडू किंवा कलाकार आपल्या कामाकरिता कोट्यवधी रुपये मिळवतात; मात्र त्यातून समाजाला नेमका काय लाभ होतो, यावरही चिंतन आवश्यक आहे. व्यक्तिपूजेमुळे माणूस हळूहळू सारासार विवेकबुद्धी गमावतो आणि त्याचा वैचारिक व सामाजिक उत्कर्षही थांबतो. यातून वैयक्तिक नुकसान तर होतेच; पण समाजाची हानीही वेगळ्याच पातळीवर घडते.

व्यक्तिनिष्ठेमुळे समाजाला झालेली हानी पाहता, आणखी किती काळ जगाने आपल्याकडे 'जमाव' किंवा 'झुंड' म्हणून पाहावे? एक सुसंस्कृत, विचारशील आणि शिस्तप्रिय समाज म्हणून भारतीय समाज कधी जगासमोर आपला ठसा उमटवणार, हा प्रश्न गंभीरपणे विचारात घेण्याची वेळ आली आहे. ▮

**संजय चौधरी**/९४२३३००४८५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-७६

गुरुवार, १८ डिसेंबर २०२५

### मम ध्येय ध्वजा जा, वरी वरी

मम ध्येय ध्वजा जा, वरी वरी, डौलांत फडक तू नभांतरी ॥धृ.॥

रूप तुझे ते उदात्त उज्ज्वल, अक्षय ठसले हृत्पटलावर
ध्यास लागला तुझाच दृढतर, मी प्राणपणे तुज धरी करी ॥१॥

विश्व पाहिले मी तव ठायी, मोक्ष देखिला तुझ्याच ठायी
अन् रमलो मी तुझ्याच पायी, झालीत वादळे शांत उरी ॥२॥

सुप्त शक्ति तव ठायि दिव्यतर, मज झाला तत्साक्षात्कार
अन् ओळखिले मज मी सत्वर, त्वत्तेज उजळले हृदंतरी ॥३॥

कर्तृत्वाच्या विश्वासावर, अविचल श्रद्धाभक्तिबळावर
जीवन माझे निर्भय निर्भर, रे नेइन तुज वैभवशिखरी ॥४॥

कळिकाळाशी टक्कर देइन, सावरीन कोसळते गगन
सप्त समुद्रे तव पद न्हाणिन, परि असो एक तव कृपा शिरी ॥५॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**लवाद प्राधिकरण**
**लवाद अधिकारी ॲड. विलास विठ्ठल कुदळे**
**मल्टीस्टेट को-ऑप सोसायटीज ॲक्ट २००२ आर्बिट्रेशन ॲन्ड कन्सीलेशन ॲक्ट अन्वये**

जा. क्र. लवाद / /२०२५ — दिनांक : ०९/१२/२०२५

## लवाद प्राधिकरण

**श्री पंचमुखी हनुमान मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.**
पत्ता - प्लॉट नं. ४, विद्यानगर, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३ ००६

## जाहीर नोटीस

**श्री पंचमुखी हनुमान मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.,**
पत्ता - प्लॉट नं. ४ विद्यानगर, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर ४१३ ००६ -- अर्जदार

विरुध्द

-- जाब देणार

| अ. नं. | केस नं. | समन्स ज्याचेवर काढले त्याचे नाव | पत्ता | जाब देणार नं. | वसुल पात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०२ / २०२५ | पाटील ऋषिकेश मल्लिनाथ | प्लॉट नं ३६ पापाराम नगर, विजापूर रोड, तालुका सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.१ | १३८५८२/- |
| २ | ७ / २०२५ | पाटील ज्योती ऋषिकेश | प्लॉट नं ३६ पापाराम नगर, नुतन प्रशाळे जवळ विजापूर रोड, सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.१ | २८१३७६/- |
| ३ | ७ / २०२५ | पाटील ऋषिकेश मल्लिनाथ | पापाराम नगर, विजापूर रोड, सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.३ | २८१३७६/- |
| ४ | १० / २०२५ | माने शाहिर जगन्नाथ | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | ५०७५२/- |
| ५ | १६ / २०२५ | पावले श्रीदेवी खंडप्पा | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | ६४८५८/- |
| ६ | १६ / २०२५ | रोकडे रेणुका सुनिल | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | ६४८५८/- |
| ७ | १६ / २०२५ | म्हेत्रे सुरेखा नागनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | ६४८५८/- |
| ८ | १६ / २०२५ | पावले खंडप्पा काशीनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.४ | ६४८५८/- |
| ९ | १७ / २०२५ | स्वामी कल्पना शिवानंद | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | ४५७३२/- |
| १० | १७ / २०२५ | जोंकार लता सिंध्वज | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | ४५७३२/- |
| ११ | १७ / २०२५ | म्हेत्रे सुरेखा नागनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | ४५७३२/- |
| १२ | १७ / २०२५ | स्वामी शिवानंद करबसप्पा | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.४ | ४५७३२/- |
| १३ | १८ / २०२५ | जोंकार लता सिंध्वज | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | ३७८८६/- |
| १४ | १८ / २०२५ | म्हेत्रे सुरेखा नागनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | ३७८८६/- |
| १५ | १८ / २०२५ | स्वामी कल्पना शिवानंद | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | ३७८८६/- |
| १६ | १८ / २०२५ | जोंकार सिंध्वज नंदकुमार | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.४ | ३७८८६/- |
| १७ | २० / २०२५ | पावले खंडाप्पा काशिनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | १३८११९/- |
| १८ | २० / २०२५ | स्वामी शिवानंद करबसय्या | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | १३८११९/- |
| १९ | २० / २०२५ | म्हेत्रे ( माळी ) नागनाथ मारुती | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | १३८११९/- |
| २० | २३ / २०२५ | म्हेत्रे लक्ष्मण श्रीमंत | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | ३७३९८१/- |
| २१ | २५ / २०२५ | पटेल वसिम अकबर | मु पो इटकळ टेलर नगर तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.१ | ८४०९४/- |
| २२ | ३० / २०२५ | लिंगाडे कल्पना जयप्रकाश | ८३० मंगळवार पेठ टिळक चौक सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.२ | १३०४१५/- |
| २३ | ३० / २०२५ | आडके यतिराज प्रभाकर | १३/८ अ. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर तालुका सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.३ | १३०४१५/- |
| २४ | ३३ / २०२५ | कोरे विनायक रंगसिद्ध | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | ८४१८४/- |
| २५ | ३४ / २०२५ | शेख हमीद वहिदअली | खानापूर तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००१ | जाबदेणार नं.२ | ३५७७७९/- |
| २६ | ३५ / २०२५ | माळी धर्मेंद्र कृष्णत | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.१ | ३३६०२९/- |
| २७ | ३५ / २०२५ | लोके संजय महादेव | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | ३३६०२९/- |
| २८ | ३५ / २०२५ | सोलापुरे उमाकांत पंचप्पा | शेळगी तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००६ | जाबदेणार नं.३ | ३३६०२९/- |
| २९ | ३६ / २०२५ | तानवडे सुनिल विरभद्र | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | २४३७८२/- |
| ३० | ४१ / २०२५ | गोटे जगन्नाथ बाबूराव | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | २०९६१४/- |
| ३१ | ४५ / २०२५ | अत्तार सोयल अमोल | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | ६२९८२/- |
| ३२ | ४८ / २०२५ | शेख मशाक हसन | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | २१०८३२/- |
| ३३ | ४८ / २०२५ | कोरे अशोक केदारनाथ | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | २१०८३२/- |
| ३४ | ५० / २०२५ | शेख मशाक हसन | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.१ | ११८५८५/- |
| ३५ | ५० / २०२५ | शेख इस्माईल सरदार | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | ११८५८५/- |
| ३६ | ५२ / २०२५ | हुकिरे शुभम राजेंद्र | केशेगाव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.३ | ५६५१२/- |
| ३७ | ५३ / २०२५ | गिराम बाबुराव दिनकर | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | ५९७९९/- |
| ३८ | ५३ / २०२५ | पाटील बसवराज दत्तात्रय | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | ५९७९९/- |
| ३९ | ५३ / २०२५ | कलबडे सुरेश लिंगू | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | ५९७९९/- |
| ४० | ५४ / २०२५ | कांबळे मंदुबाई खंडेराव | केशेगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | २२७००९/- |
| ४१ | ५४ / २०२५ | पठाण अब्रार वजीर | इटकळ तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.२ | २२७००९/- |
| ४२ | ५४ / २०२५ | पठाण राजु सुलतान | इटकळ तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.३ | २२७००९/- |
| ४३ | ५५ / २०२५ | वर्दे राजशेखर खंदु | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | ७२०५२/- |
| ४४ | ५५ / २०२५ | बचाटे श्रीशैल योगीराज | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | ७२०५२/- |
| ४५ | ५५ / २०२५ | पवार राम महादेव | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | ७२०५२/- |
| ४६ | ५६ / २०२५ | खोबरे गौरीशंकर गंगाधर | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | १२५९६/- |
| ४७ | ५६ / २०२५ | मुळे परशुराम बाबुराव | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | १२५९६/- |
| ४८ | ५६ / २०२५ | रोकडे अजय विश्वनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | १२५९६/- |
| ४९ | ५७ / २०२५ | बिराजदार लक्ष्मी बंडू | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | २७०७५/- |
| ५० | ५८ / २०२५ | तालिकोटे मोसिन रहेमान | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.१ | २०६७१२/- |
| ५१ | ५८ / २०२५ | रोकडे अजय विश्वनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.२ | २०६७१२/- |
| ५२ | ५८ / २०२५ | आसापुरे ज्ञानेश्वर आंबादास | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | २०६७१२/- |
| ५३ | ५८ / २०२५ | कोलते गणेश श्रीशैल | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.४ | २०६७१२/- |
| ५४ | ५९ / २०२५ | हुकीरे योगेश काशिनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०१ | जाबदेणार नं.३ | २३४४२०/- |
| ५५ | ६१ / २०२५ | चव्हाण विलास रामचंद्र | चापला नगर पिंजारवाडी मुस्ती , पिंजरवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.१ | ७५९१६/- |
| ५६ | ६१ / २०२५ | चव्हाण जयश्री विलास | चापला नगर पिंजारवाडी मुस्ती , पिंजरवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.३ | ७५९१६/- |
| ५७ | ६३ / २०२५ | धबाले बाबू शिवलिंग | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | ७२२०६/- |
| ५८ | ६४ / २०२५ | लांडगे बसवेश्वर नागनाथ | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.२ | ३४३३०२/- |
| ५९ | ६४ / २०२५ | राऊत शिवाजी पंढरी | काटगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद ४१३६०३ | जाबदेणार नं.३ | ३४३३०२/- |
| ६० | ६७ / २०२५ | कोरे शांताबाई गुरुनाथ | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | २१३७५५/- |
| ६१ | ६९ / २०२५ | नदाफ सुलतान महमद | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.१ | ७६०८७/- |
| ६२ | ७० / २०२५ | घोडके सोमनाथ पांडुरंग | बोरामणी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.१ | २६७८१/- |
| ६३ | ७० / २०२५ | पैलवान काशिनाथ शिवप्पा | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | २६७८१/- |
| ६४ | ७१ / २०२५ | माळी आशा तानाजी | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.१ | ८९५४७/- |
| ६५ | ७४ / २०२५ | पाटील दयानंद रामचंद्र | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | १६०३९६/- |
| ६६ | ७५ / २०२५ | हेले प्रभाकर विश्वनाथ | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | ३२४५८३/- |
| ६७ | ७७ / २०२५ | कोरे विनायक रंगसिद्ध | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.३ | ११५५९९/- |
| ६८ | ८० / २०२५ | दूनगे लक्ष्मण काशीनाथ | पिंजरवाडी मुस्ती, पिंजरवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.१ | १३८५६०/- |
| ६९ | ८२ / २०२५ | वायचळे महादेव बाबूराव | तांदुळवाडी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३१०२ | जाबदेणार नं.२ | १४०८१३/- |
| ७० | ८३ / २०२५ | म्हंत कविता श्रीशैल्य | फ्लँट नं ९ स्वागत नगर , कुमठा नाका तालुका सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००३ | जाबदेणार नं.४ | १७४८५२/- |
| ७१ | ८४ / २०२५ | शेरभाई रुकसाना बानो अ. हुसेन | ५३ हौसेकर वस्ती शेळगी उत्तर सोलापूर तालुका उत्तर सोलापुर जिल्हा सोलापूर ४१३००६ | जाबदेणार नं.१ | ३१७५३८/- |
| ७२ | ८४ / २०२५ | शेरभाई हसीना बेगम अ. करीम | ५३ हौसेकर वस्ती शेळगी उत्तर सोलापूर तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००६ | जाबदेणार नं.२ | ३१७५३८/- |
| ७३ | ८५ / २०२५ | म्हमाणे कल्याणी आण्णाराव | मु.पो. देगांव टोलनाका उत्तर सोलापूर ग्रामपंचायत ऑफिस जवळ, तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.४ | १३७४८७/- |
| ७४ | ८६ / २०२५ | मठपती कलावती नागय्या | ११/२५, घोंगडे वस्ती, बसव नगर सोलापूर तालुका सोलापूर जिल्हा सोलापूर ४१३००२ | जाबदेणार नं.३ | १३८६८९/- |
| ७५ | ८७ / २०२५ | सुतार ज्योती मल्लीनाथ | रुद्रवादी तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३१४ | जाबदेणार नं.१ | २५२१०/- |
| ७६ | ८७ / २०२५ | जमादार अनिता शशिकांत | शाहा बाजार नाका, दयानंद स्कूल जवळ गुलबर्गा ५८५३१४ | जाबदेणार नं.२ | २५२१०/- |
| ७७ | ८७ / २०२५ | सोनार संगिता संजुनाथ | गणेश नगर ब्रम्हपूर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.३ | २५२१०/- |
| ७८ | ८७ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | गुलबर्गा तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३१४ | जाबदेणार नं.४ | २५२१०/- |
| ७९ | ८८ / २०२५ | कलशेट्टी सविता म्हातंप्पा | कडगंची तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३११ | जाबदेणार नं.१ | ४५०९३/- |
| ८० | ८८ / २०२५ | म्हातंप्पा बसवणप्पा कलशेट्टी | स्वामी विवेकानंद नगर, बोगेश्वर स्कूल जवळ कडगंची तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०१ | जाबदेणार नं.२ | ४५०९३/- |
| ८१ | ८८ / २०२५ | बिराजदार अंजना रविंद्र | शिवलीला एज मडीवाला प्लॉट नं ११ देवीनगर अंबाबाई देवळा जवळ भोगेश्वर स्कुल पुढे गुलबर्गा ५८५३०१ | जाबदेणार नं.३ | ४५०९३/- |
| ८२ | ८९ / २०२५ | मजगे धानम्मा बसवराज | ८१ सुन्तान चिंचोळी जी.आर नगर गुलबर्गा ५८५३२२ | जाबदेणार नं.१ | २६८८८/- |
| ८३ | ८९ / २०२५ | हागरगुंडी संगिता शिवानंद | प्लॉट नं १५ फिलटर बेड रोड चन्नवीर नगर गुम्मासाहेब दर्गा जवळ गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.२ | २६८८८/- |
| ८४ | ८९ / २०२५ | मजगे सिद्धम्मा विजयकुमार | ६-१२०२१ महादेव नगर जी.आर नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.३ | २६८८८/- |
| ८५ | ८९ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | २६८८८/- |
| ८६ | ९० / २०२५ | नागेंद्र गुंडेराव चौडोजी | मु पो महाकोगनुर महालक्षि मंदिराजवळ तालुका अफजलपुर जिल्हा गुलबर्गा ५८५२१३ | जाबदेणार नं.२ | २०९१४/- |
| ८७ | ९० / २०२५ | म्हांतप्पा बसवणप्पा कलशेट्टी | मु पो कडगंजी तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३१४ | जाबदेणार नं.३ | २०९१४/- |
| ८८ | ९० / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | २०९१४/- |
| ८९ | ९१ / २०२५ | कल्लप्पा शेशप्पा यारा | चवडेश्वर कॉलोनी लालगिरी क्रॉस रोड माणकेश्वर मंदीर जवळ ब्रम्हपुर ११-२२५० लालगिरी मशीद गुलबर्गा ५८५१०३ | जाबदेणार नं.१ | २०६५९/- |
| ९० | ९१ / २०२५ | संगिता महेश नायकवडी | शरणबसवेश्वर देऊळजवळ गंगा नगर लालगिरी गुलबर्गा ५८५१०३ | जाबदेणार नं.२ | २०६५९/- |
| ९१ | ९१ / २०२५ | जगदेवी सायबणप्पा आणुरे | ११ सक्करगा आळंद भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर तालुका गुलबर्गा जिल्हा कर्नाटक ५८५३०२ | जाबदेणार नं.३ | २०६५९/- |
| ९२ | ९१ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | २०६५९/- |
| ९३ | ९२ / २०२५ | शरणप्पा शंकर उदनुर | जिल्हा परीषद शाळेजवळ कोडगरला तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.१ | १६२३३/- |
| ९४ | ९२ / २०२५ | महादेव परमेश्वर हालके | आळंद रोड हनुमान मंदिरजवळ संतोष कॉलोनी गुलबर्गा कर्नाटक ५८५१०३ | जाबदेणार नं.२ | १६२३३/- |
| ९५ | ९२ / २०२५ | सागर उमाकांत देवणी | प्लॉट नं २९ लोवरलेन हनुमान मंदिरजवळ गुलबर्गा ५८५१०३ | जाबदेणार नं.३ | १६२३३/- |
| ९६ | ९२ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | १६२३३/- |
| ९७ | ९३ / २०२५ | महादेव परमेश्वर हालकी | घर नं ०९ संतोष कॉलोनी हनुमान मंदिरजवळ आळंदरोड गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.१ | १८१३८/- |
| ९८ | ९३ / २०२५ | सागर उमाकांत देवणी | हनुमान मंदिरजवळ जगत सर्कल प्लॉट नं २९ लोवर लेन हनुमान मंदिर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.२ | १८१३८/- |
| ९९ | ९३ / २०२५ | शरणप्पा शंकर उदनुर | कोडगरला तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.३ | १८१३८/- |
| १०० | ९३ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | १८१३८/- |
| १०१ | ९४ / २०२५ | देवम्मा श्यामराव जमादार | २/१७ सक्करगा तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.१ | २४३७५/- |
| १०२ | ९४ / २०२५ | श्यामराव गणपती जमादार | मु पो सक्करगा तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.२ | २४३७५/- |
| १०३ | ९४ / २०२५ | नागेश शिवशणप्पा बिराजदार | मु पो सक्करगा तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.३ | २४३७५/- |
| १०४ | ९४ / २०२५ | आणुरे कविता शरणबसप्पा | भोगेश्वर स्कूलजवळ स्वामी विवेकानंद नगर गुलबर्गा ५८५१०१ | जाबदेणार नं.४ | २४३७५/- |
| १०५ | ९५ / २०२५ | श्यामराव गणपती जमदार | हनुमान मंदिरजवळ सक्करगा तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा ५८५३०२ | जाबदेणार नं.१ | २४३७५/- |
# मदने वस्ती येथील जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील मदने वस्ती येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन संपन्न झाले. यावेळी मराठी व हिंदी बहारदार गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास झिजेवसतीच्या माजी सरपंच उमा जावळे, पिलीवचे माजी सरपंच अमोल मदने, केंद्र प्रमुख राजकुमार फासे, माळिशरस तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन अमोल नष्टे, संचालक सचिन गाटे उपस्थित होते.



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापुरातील तमाम लोकांना, विशेषतः सोलापूर आणि मजरेवाडी परिसरातील सर्व रहिवाश्यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्लॉट जागेचे वर्णन डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जूना स.नं. २९९, नवीन सर्व्हे नं. १५९/१, या पैकी, 'जगदंबा नगर' या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं. ७१ यासी एकूण क्षेत्रफळ १८४.०१ चौ.मी. इतके असून यावर बांधण्यात आलेले 'श्री गायत्री भवन' या अपार्टमेंट मधील तळमजल्यावरील फ्लॅट नं. जी-१ यासी बिल्टअप क्षेत्र ३४.६६ चौ. मी. इतके आहे. यासी चतुःसिमा - पूर्वेस - प्लॉट नं. ७२, पश्चिमेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस सदनिका क्र. जी-२, उत्तरेस-६ मी. रुंदीचा रस्ता.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील फ्लॅट जागा श्री विठ्ठल सिध्दाराम इमडे यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांचे वैयक्तिक कारणास्तव आमचे अशिल श्री केदार राजेश तरटपट्टे यांना कायमखुषखरेदी देण्याचे ठरवून इसारा दाखल काही रक्कम स्विकारली आहेत.

सबब, वर नमूद फ्लॅट विषयी कोणाचा वाद, वहिवाटी, करार, मॉर्गेज, कर्ज, दान, लीज, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, वाटणी, टाच, जप्ती, कुळवहिवाट, कब्जा करार, मदार व इतर कोणत्याही प्रकारचा बोजा हितसंबंध असतील तर खालील नमूद वकीलांकडे योग्य त्या कागदपत्रांनिशी ७ (सात) दिवसांच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद फ्लॅट जागा निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. १७/१२/२०२५

सही/-
ॲड. धनश्री भारत केंदळे
बीएससी., एल.एल.बी.
११४९ बी, जुनी पोलीस लाईन, मुरारजी पेठ,
जि. सोलापूर मो. ८६००३०४४३३

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः मौजे दहिटणे तालुका अक्कलकोट जि. सोलापूर हद्दीतील व या परिसरातील सर्व रहिवांशाना आणि वित्तीय संस्थाना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि व सब डी उत्तर सोलापूर पैकी मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं.२९६/३, एकूण क्षेत्र ९.हे. ८८.00आर. आकार रु. १४.१९ पैसे असे आहे यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस - गट नं. २९२, पश्चिमेस गट नं. ३७४/१, दक्षिणेस गट नं. २९७, उत्तरेस - गट नं. २९५. येणेप्रमाणे शेतजमीनचे मालक शावेझ सुजातअली शेख व इतर हे असून त्यांचे वैयक्तिक कारणास्तव आमचे अशिल श्री. माणिक मोतीराम चव्हाण यांना कायमखुश खरेदी देण्याचे ठरवून इसारा दाखल काही रक्कम स्विकारल्या आहेत.

सबब वर नमूद शेतजमीनी विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मॉर्गेज, इसारा, कर्ज, पावती, अगर इतर कुठल्याही प्रकारचे हितसंबंध वर नमूद शेतजमीनी विषयी असल्यास त्यांनी खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी १५ (पंधरा) दिवसांच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद शेतजमीन निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली दिनांकः १८/१२/२०२५

सही/-
सय्यद अ. जलीदहुसेन
ॲडव्होकेट नोटरी
बी.कॉम., एल.एल.बी, रा-१३५, रेल्वे लाईन,
सोलापूर ४१३००१ मो.९८२३१५१९१५

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेष करुन उपळाई (ठों.) ता. बार्शी येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौ. उपळाई (ठों.) ता. बार्शी जि. सोलापूर येथील गट नंबर ७५६ व गट नंबर ७९६ या जमिनी आमचे आशिलाच्या वडिलोपार्जित मालकीच्या जमिनी असून सदर जमिनी संदर्भाने आमचे आशिलाने बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात रे.मु. नंबर १०९०/२०१९ या नंबरचा वाटपाचा दावा करुन आमचे आशिलाने तिचे अविभक्त १/३ हिश्श्याचे वाटप मागितले आहे. सदर वाटपाचा दावा कोर्टात प्रलंबित आहे.

अशी वस्तुस्थिती असताना काही लोक वरील जमिनी संदर्भाने जमिन हस्तांरणाचा व्यवहार करणेच्या प्रयत्नात आहेत. तशी जमिन व्यवहाराची बोलणीही चालू केली आहे.

तरी तमाम लोकांना असे सुचित करणेत येते की, उपरोक्त जमिनी संदर्भाने कोणीही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये याउपरही कोणी हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. उपरोक्त जमिनी खरेदी करणारास जमिनीचा मालकी हक्क मिळणार नाही. कोणाचीही कसलीही जमिन खरेदी करुन फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. तारीख १७/१२/२०२५.

सही/-
ॲडव्होकेट पी.डी. उबाळे
ॲडव्होकेट
बार्शी ४१३४११ ता. बार्शी, जि. सोलापूर
सिव्हील कोर्ट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. ९८८१८३०३५४ / ९४०३४९६१२३
(रतन दादाराव पारखे तर्फे ॲडव्होकेट)

**खरेदीखतापुर्वी जाहीर सावधानतेची नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. ता. माढा पैकी मौजे दारफळ हद्दीतील लोकांना व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे दारफळ हद्दीतील जमीन याचा गट नं. ११५/२/अ पैकी पुर्व बाजुचे क्षेत्र ०१ हे. ०६ आर, आकार ०२ रु.८१ पै. याची चतुःसिमा :- पूर्वेस - रस्ता, दक्षिणेस - गट नंबर ११४, पश्चिमेस - उर्वरीत जमिन, उत्तरेस - गट नंबर ११६ येणेप्रमाणे आतील दगडमाती तदंगभूत वस्तूसह जिरायत जमीन येणेप्रमाणे येणेप्रमाणे वर्णन केलेली बागायत जमीन

येणे प्रमाणे चतुःसिमेतील वर्णनाची जमीन ही सुधीर दत्तात्रय ताकभाते, सुनिता सचिन कोंढारे, मनीषा दत्तात्रय ताकभाते, दत्तात्रय विश्वनाथ ताकभाते, उषा सुभाष ताकभाते, पद्मिन वसुदेव गोडगे, योगिता भागवत सांगोलकर, रा. दारफळ, ता. माढा, जि. सोलापूर, यांना रेमुनं. ४०/२०१० मधील तडजोड हुकूमनाम्यानुसार आलेली आहे. त्यांनी सदर जमीन ही आमच्या अशिलास त्यांच्या कायदेशीर कौटुंबीक गरजेपोटी विक्री करण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसार रक्कम स्विकारलेली आहे आमचे अशिलासोबत तोंडी व्यवहार झालेला आहे. त्यांच्यामध्ये खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्याचा ठरलेला आहे. सदर जमीन सुधीर दत्तात्रय ताकभाते, सुनिता सचिन कोंढारे, मनीषा दत्तात्रय ताकभाते, दत्तात्रय विश्वनाथ ताकभाते, उषा सुभाष ताकभाते, पद्मिन वसुदेव गोडगे, योगिता भागवत सांगोलकर यांनी निर्वेध निजोखमी बिनबोजाची खरेदी देण्याची जमीन मालकानी आमच्या अशिलास दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबध असल्यास सदर जमिनीसंदर्भात कोणी साठेखत, गहाणखत, नजरगहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिस पत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर लेखी कळवावी मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा नोंदणीकृत व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीखतावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीखतापुर्वी पूर्व जाहीर सावधानतेची नोटीस दिली असे. ता. १७/१२/२०२५

सही/-
अशिलातर्फेड.
ॲड. घोळवे आर. एन.
बी.ए., एल.एल.बी.
ENR. No. MH/4580/2006 Adv. CODE.1542
रा. अलिपूर रोड, शंकर पार्वती नगर, बार्शी
मो.नं. ७५८८२१५२५९ / ९९२२०१९९१८

## महत्वाचे...



### युवती अध्यक्ष पूजा धोत्रे यांचा शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादीत प्रवेश

**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

आगामी सोलापूर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांमधे वेगवान घडामोडी घडताना दिसत आहेत. नगरसेवक होण्यासाठी अनेकजण पदाचा त्याग करून अन्य पक्षात प्रवेश करत असताना दिसून येत आहेत. सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक सोमवारी जाहीर होताच मंगळवारी सोलापुरातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला धक्का बसला आहे. युवती अध्यक्षा पूजा धोत्रे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी भवनात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रवेश केल्यानंतर प्रभाग क्रमांक १८ मधून ओबीसी किंवा सर्वसाधारण जागेवर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक म्हणून अर्ज घेतला आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत आपण प्रभाग क्रमांक १८ मधून ओबीसी किंवा सर्वसाधारण महिला जागेवर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक म्हणून अर्ज घेतला असल्याचे पूजा धोत्रे यांनी सांगितले. याशिवाय पद्मशाली युवकचे माजी अध्यक्ष बालाजी दोंता आणि समीर देशमुख यांनीसुद्धा मंगळवारी राष्ट्रवादी भवनात येऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे. आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी आपण जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी शहराध्यक्ष कार्याध्यक्ष तसेच सर्व पदाधिकाऱ्यांसोबत पक्षाचे काम करणार असल्याचे दोंता आणि देशमुख यांनी सांगितले.

### लोकमंगल बँकेजवळून होंडा शाईन दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

अज्ञात चोरट्यांकडून पार्क केलेली होंडा शाईन मोटारसायकल चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना शहरातील किल्ला बगिचा रोड परिसरात लोकमंगल बँकेजवळ घडली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवार पेठ, सोलापूर येथील रहिवासी सुनिल दिगंबर



अंजिखाने (वय ४५) यांनी दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान त्यांनी आपली काळ्या रंगाची होंडा शाईन मोटारसायकल एमएच १३ बीके ५०८६) किल्ला बगिचा रोड येथील लोकमंगल बँकेच्या गेटजवळ पार्क केली होती. मात्र परत येऊन पाहिले असता सदर मोटारसायकल तेथे आढळून आली नाही. चोरीस गेलेल्या म ोटारसायकलीची किंमत अंदाजे १५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेची तक्रार दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.३१ वाजता दाखल करण्यात आली असून, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.



### भक्तीच्या प्रकाशात इंगळे महाराजांना ५४ दिव्यांनी ओवाळणी

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

सोलापुरातील अध्यात्मिक स्तंभ म्हणजे सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप सुधाकर महाराज इंगळे असल्याचे गौरवोद्गार पतंजली किसान सेवा समिती जिल्हा प्रभारी, आधार युवा ग्रुपचे प्रमुख, तज्ञ योगशिक्षक असलेले भगवान बनसोडे यांनी काढले. अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सोलापुरातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त आधार योगा ग्रुप आणि श्री संत मुक्ताई प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात 'राम कृष्ण हरी' या भजनाने करण्यात आली. या भजनाला गायनाचार्य ह.भ.प. तानाजी महाराज बेलेराव यांनी स्वर साथ दिली, तर सुप्रसिद्ध मृदुंग वादक दिलीप वाघमारे यांनी मृदुंगावर साथसंगत केली. यानंतर प्रमुख मान्यवर हेमंत पिंगळे, चंद्रकांत पवार, पतंजली योगाचे स्वाती राऊत, बसवराज उंबर्जे यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आधार योगा ग्रुप आणि श्री संत मुक्ताई प्रतिष्ठानच्या वतीने ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांचा मुख्य सत्कार करण्यात आला. महाराजांचा ५४ वा वाढदिवस असल्याने ५४ दिव्यांनी ओवाळणी घालून त्यांचा वाढदिवस भक्तिभावात साजरा करण्यात आला. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाने उपस्थित भाविकांम ध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले. हा कार्यक्रम संजय जगताप, विजय जगताप, शंकर चौगुले, विलास चिंचोलकर, व्ही डी पाटील, सावंत साहेब, नाना कुरडे, मच्छिंद्र पाटील तसेच मुक्ताई महिला योगा ग्रुपच्या सहकार्यामुळे यशस्वी झाला. सूत्रसंचालन अविनाश अलदर यांनी केले. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

> **सोलापुरातील अध्यात्मिक स्तंभ इंगळे महाराज**

# महसूल कर्मचारी उद्यापासून बेमुदत संप पुकारणार!

**विनाचौकशी निलंबनाच्या कारवाईवर संघटना आक्रमक**

**दुसऱ्या दिवशीही १२९७ कर्मचारी सामुहिक रजेवर**

**महसूलमंत्र्यांनी बोलावली गुरूवारी तातडीची बैठक**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

तहसीलदारांच्या विनाचौकशी होणाऱ्या निलंबनाच्या घोषणांमुळे तसेच महसूल विभागाच्या दीर्घकाळ प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्यांचा निपटारा न झाल्याने महसूल कर्मचाऱ्यांचे मंगळवारपासून राज्यभरात तीव्र आंदोलन चालू आहे. दरम्यान, याबाबत महसूल मंत्र्यांबरोबर गुरूवार, दि. १८ रोजी दुपारी संघटना पदाधिकाऱ्यांची एक बैठक असून, या बैठकीत मागण्या मान्य न झाल्यास महसूल कर्मचारी शुक्रवारपासून बेमुदत संप पुकारणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील १२९७ कर्मचारी आज दुसऱ्या दिवशीही सामुहिक रजेवर गेल्याने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय व इतर सर्व महसूल विभागात शुकशुकाट दिसून आला.

नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात महसूल मंत्र्यांनी अवैध गौण उपसा प्रकरणी ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी आणि २ तलाठ्यांना दोषी धरुन थेट निलंबित केले आहे. मात्र या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई होणे अपेक्षित होते. त्यामुळे निलंबनाची झालेली कारवाई चुकीची आणि कर्मचाऱ्यांचे मनोधर्य खच्चीकरण करणारी आहे. यासाठी पुणे विभागातील विविध जिल्ह्यात महसूल कर्मचारी, तलाठी कर्मचारी आणि तहसीलदार, नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने सामूहिक आंदोलन सुरु करण्यात आले आहे. मंगळवारी जिल्ह्यातील जवळपास दीड हजार कर्मचारी सामुहिक रजा आंदोलनात सहभागी झाले होते. आजही हे कर्मचारी कर्तव्यावर हजर नाहीत. त्याम ुळे जिल्हाधिकारी कार्यालयात दुसऱ्या दिवशीही कोरोना काळाप्रमाणे आजही दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

कुठलीही तक्रार झाली तर चौकशी न करताच महसूल मंत्र्यांकडून थेट विधिमंडळातच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निलंबनाच्या घोषणा केल्या जातात. अधिकारी-कर्मचाऱ्यांची बाजू ऐकून घेतली जात नसल्याने त्यांच्यामध्ये भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नैसर्गिक न्यायाने कारवाई व्हावी, अशी अपेक्षा या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत गुरूवारच्या बैठकीत महसूल संघटना आणि महसूल कर्मचारी संघटना यांच्यात काही निर्णय न झाल्यास हे कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला. या संपामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे मात्र प्रलंबित पडणार असल्याचे दिसून येत आहे. आज संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये गट अ ३३, गट ब ४५, गट क ११२४, गट ड ९५ असे एकूण १ हजार २९७ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तर कर्तव्यावर गट अ १, गट क ५, गट ड ४ असे एकूण १० कर्मचारी होते.

#### निलंबन आदेश मागे घेण्याची मागणी

१२ डिसेंबर २०२५ रोजी विधानसभेत कोणतीही चौकशी न करता ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी व २ ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर १३ डिसेंबरला भंडारा जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पालघर जिल्ह्यातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांवरही कारवाई जाहीर करण्यात आली. ही कारवाई नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. हे सर्व निलंबन आदेश तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

#### राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी संघाच्या प्रमुख मागण्या

१२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर केलेले सर्व निलंबन आदेश पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करावेत, निलंबनाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्पष्ट व आदर्श कार्यप्रणाली निश्चित करावी, नायब तहसीलदार व इतर संवर्गांचे सुधारित ग्रेड पे व वेतनश्रेणी लागू कराव्यात, महसूल सेवक संवर्गाच्या दीर्घकालीन प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात, महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध तात्काळ मंजूर करावा, नायब तहसीलदार पदासाठी खात्यांतर्गत परीक्षा सुरू करावी, अर्धन्यायिक व हक्क नोंदीच्या प्रकरणात थेट फौजदारी कारवाई ऐवजी विभागीय चौकशीची प्रक्रिया राबवावी अशा प्रकारच्या मागण्या महसूल अधिकारी व कर्मचारी महासंघाने मुख्यमंत्री यांनादिलेल्या निवेदनात केल्या.

#### सोलापूर जिल्ह्यातील १२९७ कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग

महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना सोलापूर शाखेच्या वतीने आज दुसऱ्या दिवशीही १२९७ कर्मचारी सामुहिक रजेवर असल्याबाबत एक निवेदन देण्यात आले आणि शासनाच्या वतीने आम्हा न्याय मिळेपर्यंत हे आंदोलन चालूच राहणार असल्याचा इशारा दिला आहे. हे निवेदन देताना शंतनू गायकवाड, धैर्यशील जाधव, अमरनाथ भिंगे, लक्ष्मीकांत आयगोळे, रविराज नष्टे, गजानन गायकवाड, खंडू भोसले, रणजीत म्हेत्रे, गंगाधर हाके, समाधान राऊत, संदीप माने, अनिल पवार, कदम, अजित कांबळे, एफएम शेख, श्रीकांत घुगे, प्रशांत गाडे, केतन राचमाले, सोमय्या स्वामी, सुहास म्हेत्रे, झारी, ज्ञानेश्वर कराळे, महेश निलंगे, वैभव मिसाळ आदींची उपस्थिती होती.

## आचारसंहिता भंगाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी : डॉ. सचिन ओम्बासे

**मनपा आयुक्त कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकाऱ्यांची आढावा बैठक**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

ेलापूर : महापालिका निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता व कायदेशीर नियमांचे पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. म हाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व राज्य निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे. निवडणूक काळात आचारसंहिता भंगाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे, राजकीय पक्ष व उमेदवारांशी समन्वय राखणे तसेच कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी तथा मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निमित्ताने आज सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक (सह) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. या बैठकीत निवडणूक कार्यक्रमाची अंम लबजावणी, नामनिर्देशन प्रक्रिया, छाननी, उमेदवारी माघार, मतदान व्यवस्थापन, मतमोजणी प्रक्रिया तसेच निवडणूक आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागनिहाय जबाबदाऱ्या स्पष्टपणे सांगण्यात आल्या. सोलापूर म हानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व विश्वासार्ह वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो अंजली मरोड,उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अभिषेक देशमुख,उपविभागीय अधिकारी सोलापूर सदाशिव पडदुणे, उपविभागीय अधिकारी, भैरप्पा माळी,उपविभागीय अधिकारी, विजया पांगारकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी, जयश्री आव्हाड , सहायक आयुक्त गिरीष पंडित, निवासी नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे, नायब तहसीलदार सुधाकर दाहिजे, शितल कन्हेरे, विकास पवार, नगर अभियंता सारिका अक्कूलवार उपस्थित होते.

## पालिका निवडणुकीत महाविकास आघाडीला विजयी करा



**नरसय्या आडम यांचे आवाहन**

**निवृत्तीवेतन ७१ हजार रुपये पक्षाच्या निवडणूक निधीसाठी सुपूर्द**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी लोकशाही बळकट करावी. धर्मांध आणि सांप्रदायिक विषारी प्रचाराला आळा घालण्यासाठी लाल सैनिक पेटून उठले पाहिजेत. सोलापूरच्या जनतेला खोटी विकासाची स्वप्ने विकणाऱ्या सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता दाखवण्याचा निर्धार करा, असे आवाहन ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉम्रेड नरसय्या आडम मास्तर यांनी केले.

भारत कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ची सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, दत्तनगर येथे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांबरोबर पार पडली. सभेचे अध्यक्षस्थान माजी नगरसेविका कॉम्रेड कामिनी आडम यांनी भूषवले. मंचावर माजी नगरसेविका नलिनी कलबुर्गी, अॅड. अनिल वासम उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉम्रेड नरसय्या आडम मास्तर यांनी आपल्या एक महिन्याचे निवृत्तीवेतन ७१ हजार रुपये निवडणूक निधी म्हणून पक्षाचे जिल्हा सचिव मेजर कॉम्रेड युसुफ शेख यांच्याकडे सुपूर्द केले. तसेच, कॉम्रेड गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कर्मचारी व प्रभारी यांनी १ लाख रुपये, दत्तनगर कार्यालयातील कार्यकर्ते व सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी १ लाख रुपये, तर माजी नगरसेविका कॉम्रेड नलिनीताई कलबुर्गी व त्यांच्या कुटुंबीयांनी २५ हजार रुपये निवडणूक निधी म्हणून पक्षाकडे दिले. सभेचे प्रास्ताविक पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड मेजर युसुफ शेख यांनी केले. महानगरपालिका निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी कार्यकर्ते सज्ज राहावेत. भांडवलशाही प्रवृत्ती व सत्ताधाऱ्यांच्या अवगुणांना मातीमोल करून लोकशाही मार्गाने मुकाबला करूया, असे आवाहन माकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य एम. एच. शेख यांनी केले.

## जुन्या सिद्धेश्वर मंदिरासह रेवणसिद्धेश्वर मंदिरास रंगरंगोटी सुरू

**लगबग ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेची**

**९०० लिटर विविध रंगांचा होतोय वापर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा दृष्टीक्षेपात आली असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात तयारी सुरू झालेली आहे. यात्रेच्या अनुषंगाने शहरातील विविध मंदिर आणि मंदिर परिसरात मंदिर समितीच्या वतीने रंग-रंगोटीचे कामकाजास सुरुवात करण्यात आली आहे. जुने सिद्धेश्वर मंदिर परिसरात रंगरंगोटी करण्याच्या कामाचा श्री गजानन पूजनाने शुभारंभ करण्यात आला. रेवणसिध्देश्वर मंदिर रंगवण्यास सुरुवात करण्यात आली आहे.



यात्रेच्या अनुषंगाने दरवर्षी एक महिना अगोदर या कामकाजास सुरुवात होते. बुधवारपासून रंगरंगोटीच्या कामकाजाचा सुरुवात झाली असून एक महिन्यानंतर हे काम पूर्ण होणार आहे. यात्रेच्या अगोदर हे काम पूर्ण करणे आवश्यक असते. त्यानंतरच यात्रेच्या विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होते.

#### मंदिर रंगवण्यासाठी लागणारे साहित्य

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील यात्रेनिमित्त शहरातील जुने सिद्धेश्वर मंदिर, रेवन सिद्धेश्वर मंदिर, गुरुभेट शिवलिंग मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, श्री सिद्धेश्वर मंदिर व परिसर परिसरातील ६८ शिवलिंग आणि अष्टविनायक मंदिर रंगविण्यात येते. १० जानेवारीपर्यंत याचे कामकाज चालते. यासाठी ऑईल पेंट, अपेक्स, ऑईलबॉण्ड, वॉटरप्रूफ पेंट, सिमेंट पेंट, अशा विविध प्रकारचे सुमारे ९०० लिटर रंग २० रोलर, १५ ब्रश यांची गरज लागते. सर्व प्रथम डागडुजी करून त्यावर प्रायमर लावून रंगकाम केले जाते. यासाठी कामगार १६ राबतात. त्यामध्ये चार कामगार हे उत्तर प्रदेश मधून आलेले आहेत. तर उर्वरित कामगार हे सोलापूर जिल्ह्यातील आहेत. यात्रेच्या अगोदर रंगकामाचे काम पूर्ण केले जाते. एक सेवा म्हणून श्रींचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. सकाळी सात वाजल्यापासून ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत हे काम सुरू राहते.

**- मनोज कडाळे, पेंटर**

#### सोलापूर शहरात यूपी, बिहारी कामगारांची वाढतीय संख्या

ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त शहरातील विविध ६८ शिवलिंग, तसेच अष्टविनायक मंदिर, जुने सिद्धेश्वर मंदिर, रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरास रंग देण्यासाठी यु.पी. आणि बिहार येथील कामगार येतात. सध्या यु.पी आणि बिहार येथील कामगारांची संख्या महाराष्ट्रात जास्त आहे. मनोज कडाळे यांच्याकडे चार ते पाच यु.पी बिहारी कामगारांची संख्या आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



धाराशिव येथील तेरणा रेडिओ वर्धापनदिनाच्या निमित्ताने सोलापूर तरुण भारत मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के आणि जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे यांनी सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी तेरणा रेडिओ प्रसारण प्रमुख संजॉय मैदर्गी, प्रा. गणेश भातलवंडे, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा मोरे, रेडीओचे रमेश पेठे आदी उपस्थित होते.



# परंडा विधानसभेत शिंदे गटाचा दिग्गज नेता कमळाच्या प्रेमात?

## प्रवेशाची जोरदार चर्चा, नाव मात्र गुलदस्त्यात!

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१७ डिसेंबर -**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वारे राज्यभर जोरात वाहू लागले असून, मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा धुरळा लवकरच उडण्याचे संकेत स्पष्ट दिसू लागले आहेत.

गावोगावी चौकात, हॉटेल मध्ये चाय-पे चर्चा आणि राजकीय बैठकीत निवडणुकांची गणिते मांडली जात असून कार्यकर्ते व नेतेमंडळी सक्रिय झाल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती या निवडणुका कार्यकर्त्यांच्या ताकदीची खरी कसोटी मानल्या जातात.

त्यामुळे सर्वच पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी आपापल्या यंत्रणांना कामाला लागण्याचे आदेश दिल्याची माहिती राजकीय सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण तापवणारी खळबळजनक चर्चा रंगू लागली आहे. शिंदे गटातील एक दिग्गज नेता सध्या कमळाच्या प्रेमात पडल्याची जोरदार वावडी असून, भाजपमध्ये प्रवेशाची चर्चा आतून बाहेर येऊ लागली आहे.



मात्र हा नेता नेमका कोण, याबाबत सध्या नाव अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. निवडणुकांच्या तोंडावर घडणाऱ्या या हालचालींमुळे परंडा विधानसभेत आगामी काळात राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कोण कुणाच्या गळ्यात हार घालणार आणि कुणाचा राजकीय चेहरा उघड होणार, याकडे आता संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

### हा नेता कोण? चर्चेला उधाण...

धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण तापवणारी खळबळजनक चर्चा सुरू झाली आहे. शिंदे गटातील एक दिग्गज नेता सध्या कमळाच्या प्रेमात पडल्याची जोरदार वावडी पसरली असून, त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा आता आतल्या गोटातून बाहेर येऊ लागली आहे. मात्र हा नेता नेमका कोण, याबाबत सध्या नाव गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे.

## शोक संदेश...



### विजय शहापूरकर यांचेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**

मंगरूळ यमगरवाडी एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांना धाराशिव येथील ज्येष्ठ माजी मुख्याध्यापक विजय शहापूरकर यांच्याकडून पेन इतर साहित्य वाटप करण्यात आले. विजय शहापूरकर यांच्यामार्फत दरवर्षी दोन वेळा इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना पेन शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येते. या वर्षीही वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, अनिल घुगे, संतोष बनसोडे, दयानंद भडंगे, बालाजी क्षीरसागर, प्रणिता शेटकार, निर्मला हुग्गे, दत्ता भोजने, कोंडिबा देवकर, खंडू काळे, हरीश मगदूम, माधव पाटील, जाधव, अण्णासाहेब मगर उपस्थित होते.



### वाशी येथे विठ्ठल बिरुदेव महाआरती व महाप्रसाद सोहळा संपन्न

**वाशी, दि.१७ डिसेंबर -**

वाशी येथे आज धनगर समाजातर्फे गेल्या पन्नास वर्षापासून पारंपरिक चालू असलेल्या विठ्ठल बिरुर्देव यांची महाआरती व महाप्रसाद, सोहळा संपन्न झाला. वाशी येथे आज धनगर समाजातर्फे गेल्या पन्नास वर्षांपासून पारंपारिक वडिलोपार्जित चालू असलेल्या उत्साहात साजरा, विठ्ठल बिरुदेव या देवाचे वाजत गाजत, फटाक्याची आतिषबाजी करून ग्राम प्रदक्षिणा वाशी जुने बस स्टॅन्ड, शिवाजीनगर, हनुमान मंदिर, वर्तक चौक तसेच बिरुदेव मंदिर अशी ग्रामप्रदर्शना करून धनगर समाजाच्या ओव्याचा कार्यक्रम करण्यात आला व महाआरती, महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी ईटकुरचे हनुमंत महाराज यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

### बशीर शेख यांची राज्यस्तरावर निवड

**उमरगा, दि.१७ डिसेंबर -**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या



स्पर्धेत आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथील गणित शिक्षक बशीर शेख यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आज लातूर येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत त्यांनी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन - १० वी नापास विद्यार्थ्यांसाठी करिअर संधी या विषयावर शाळेत प्रभावीपणे राबविलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणास विभागस्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला असून, जानेवारी महिन्यात मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल शकुंतला मोरे, सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, अमोल राजपूत, पद्माकर मोरे, सुजाता मोरे, जोशी, शिला मुदगडे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी बशीर शेख यांचे अभिनंदन केले.

# बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश; येडशी येथे ऐनवेळी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

जिल्ह्यातील येडशी येथे दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ऐनवेळी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आधारे प्रशासनाने तत्काळ हालचाल करत सकाळी ठीक ११ वाजता होऊ घातलेला बालविवाह यशस्वीपणे रोखला. एका मुलीचे बालपण आणि उज्ज्वल भविष्य वाचविण्यात प्रशासनाला मिळालेले हे यश समाजात सकारात्मक संदेश देणारे ठरले आहे.



प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे तसेच जिल्हा समन्वयक विकास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव तालुक्यातील येडशी गावात ही कारवाई करण्यात आली. बाल संरक्षणाच्या दृष्टीने संवेदनशीलता दाखवत संबंधित यंत्रणांनी तात्काळ पावले उचलली.

या कारवाईत बाल संरक्षण कक्षातील प्रज्ञा बनसोडे, चाईल्ड हेल्पलाईन कक्षातील अभय काळे (केस वर्कर), श्रीमती पल्लवी पाटील (सुपरवायझर) यांच्यासह पोलीस विभाग, ग्रामसेवक, अंगणवाडी सुपरवायझर, अंगणवाडी सेविका, सरपंच तसेच ग्राम बाल संरक्षण समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून बालविवाह प्रतिबंध केला. कारवाईदरम्यान पालकांचे सखोल समुपदेशन करण्यात आले. बालविवाहामुळे मुलीच्या आरोग्य, शिक्षण व भविष्यातील आयुष्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव करून देण्यात आली. त्यानंतर पालकांकडून हमीपत्र लिहून घेण्यात आले.

वेळीच मिळालेली माहिती, प्रशासनाची तत्परता आणि विविध यंत्रणांमधील प्रभावी समन्वय यामुळे एका निष्पाप मुलीचे बालपण सुरक्षित राहिले. बालविवाहासारख्या सामाजिक अपप्रथा रोखण्यासाठी समाजानेही सजग राहावे व कोणतीही शंका असल्यास तत्काळ प्रशासन किंवा चाईल्ड हेल्पलाईनशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुरूम येथील एसबीआय बँकेत ग्राहकांची गैरसोय

## दिड तास व्यवहार बंद ठेवल्याने संताप...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१७ डिसेंबर -**

मुरूम येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) शाखेबाबत ग्राहकांच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. बुधवारी दुपारी तर बँकेच्या शाखा प्रमुखांसह सर्वच कर्मचाऱ्यांनी मध्यान्ह भोजनाचा वेळ सांगत सर्व व्यवहार बंद ठेवल्याने ग्राहकांना तब्बल दीड तास वेठीस धरल्याचा प्रकार घडला. नियमानुसार अशा वेळी किमान एक काउंटर सुरू ठेवणे अपेक्षित असताना, बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनाच केराची टोपली दाखवल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. या प्रकारामुळे बँकेत उपस्थित ग्राहकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.




ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी तसेच सर्वसामान्य खातेदार मोठ्या संख्येने आर्थिक व्यवहारासाठी बँकेत येतात. मात्र, बँक कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक वागणूक दिली जात नसल्याची तक्रार आहे. समोर ग्राहक उभे असतानाही काही कर्मचारी मोबाईलवर खाजगी संभाषणात व्यस्त असल्याचे दिसून येते. दोन मिनिटांचे काम असताना तासभर बँकेत थांबावे लागत असल्याने ग्राहक त्रस्त झाले आहेत. काही मर्जीतील लोकांची कामे मात्र तात्काळ केली जात असून, इतर ग्राहकांना एकाच कामासाठी वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचेही सांगण्यात येत आहे.

यातच दुपारच्या वेळेत मध्यान्ह भोजनाचे निमित्त करून सर्व आर्थिक व्यवहार बंद ठेवले जात असल्याने ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. बुधवारी दुपारी याच कारणामुळे ग्राहकांना दीड तास ताटकळत बसावे लागले. याबाबत विचारणा केली असता काही कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी उद्धट भाषेत संवाद साधल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे संतप्त ग्राहक संघटना व नागरिकांनी तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

सदर बँकेत जेवणाच्या वेळेत किमान एक कॅश काउंटर सुरू ठेवावा, शाखा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांना नियमांची सक्तीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात, तसेच ग्राहकांशी उद्धट वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा अग्रणी बँक अधिकारी तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.

### तुळजाभवानी मंदिरात चोरी; दोन महिला अटकेत

**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

फिर्यादी संजोता बाळासाहेब बेडक्याळे (वय ४०, रा. अजिंक्यतारा सोसायटी बी-३/५, चेंबूर, मुंबई) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.१६ डिसेंबर रोजी दुपारी १२.१५ वाजता मैत्रिणीसोबत देवदर्शनासाठी तुळजाभवानी मंदिरात जात असताना महाद्वारात प्रवेश करताच त्यांच्या पर्समधील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २,२३० रुपये, असा एकूण १,१०,२३० रुपये किमतीचा माल चोरीस गेल्याची घटना घडली. या प्रकरणी संशयित आरोपी स्नेहा हिरेमन सुकळे (वय २५) व निलाबाई शिवराम शिंदे (वय ५५), दोघी रा. राशन, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर, यांनी चोरी केल्याचा आरोप आहे.

# तुळजापूर शाकंभरी नवरात्र महोत्सव; २८ डिसेंबरला घटस्थापना

## नवरात्र विशेष
## ३१ डिसेंबर रोजी जलयात्रा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्रोत्सवास २८ डिसेंबर रोजी घटस्थापनेने प्रारंभ होणार असून नवरात्रोत्सवापूर्वीच्या मंचकी निद्रेस येत्या शनिवारपासून प्रारंभ होणार आहे.

घटस्थापनेच्या दुसऱ्या दिवसापासून देवीच्या विविध रथालंकार पूजा मांडण्यात येणार असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, नगर परिषद प्रशासन आणि मंदिर संस्थानाकडून तयारी सुरू आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्रोत्सव २० - डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत साजरा होणार आहे.



त्या अनुषंगाने तुळजाभवानी मंदिर संस्थान, नगरपालिका आणि प्रशासनाकडून रात्रंदिवस तयारी सुरू आहे.

शाकंभरी नवरात्र महोत्सवात २० ते २८ डिसेंबर या कालावधीत श्रीतुळजाभवानी देवीची मंचकी निद्रा परंपरेनुसार सुरू राहणार आहे.

२८ डिसेंबर रोजी पहाटे देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना होणार असून, दुपारी १२ वाजता घटस्थापनेने खऱ्या अर्थाने देवीच्या शाकंभरी नवरात्रोत्सवास प्रारंभ होणार आहे.

घटस्थापनेच्या दुसऱ्या दिवशी २९ डिसेंबर रोजी देवीची रथ अलंकार महापूजा, ३० डिसेंबर रोजी मुरली अलंकार महापूजा, ३१ डिसेंबर रोजी सकाळी जलयात्रा, तसेच शेषशायी अलंकार महापूजा, १ जानेवारी रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा, २ जानेवारी रोजी महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा, ३ जानेवारी रोजी शाकंभरी पौर्णिमा देवीची नित्योपचार पूजा, दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व घटोत्थापन, ४ जानेवारी भक्तांसाठी महाप्रसाद याप्रमाणे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

मंदिर संस्थानाच्या वतीने महोत्सव काळात अपेक्षित असलेल्या भक्तवर्गाच्या सोयी सुविधासह व्यवस्थापनासाठी सुरक्षा, स्वच्छता, तसेच वाहतूक व्यवस्थापन याबाबत आवश्यक ती तयारी करण्यात येत आहे.



## प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

### धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.

**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**

दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११


# तुळजापूरमध्ये राजकीय वादानंतर हिंसाचार; भाजप आमदार व पोलिसांवर महाविकास आघाडीचे आरोप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**

भाजप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादानंतर महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दि. १७ डिसेंबर रोजी काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद घेत पोलीस प्रशासनासह भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर आरोपींना वरदहस्त दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. एवढी मोठी घटना घडूनही घटनास्थळी पोलीस तब्बल दोन तास उशिरा पोहोचल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माधवराव कुतवळ यांनी सांगितले की, मृत्यूशी झुंज देणाऱ्या मारहाणीत जखमी झालेल्या युवक व त्यांच्या कुटुंबीयांशी तुळजापूरचे आमदार यांनी कोणताही संपर्क साधलेला नाही. त्यामुळे या राड्याला त्यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. घटना घडल्यानंतर पोलिसांना काही मोठ्या व्यक्तींचे फोन येत होते आणि त्यांच्याशी संभाषण सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. राजकीय दबावामुळेच सशस्त्र आरोपी अजूनही मोकाट फिरत असल्याचे कुतवळ यांनी नमूद केले.

काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार अमर मगर यांनी पत्रकार परिषदेत संपूर्ण घटनाक्रम सविस्तर मांडला. त्यांनी सांगितले की, रस्त्याचे काम त्यांच्या नातेवाईकांनी घेतले होते. त्या ठिकाणी भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार विनोद गंगणे यांनी शिवीगाळ केल्यानंतर किरकोळ वाद झाला, मात्र तो वाद तिथेच मिटवण्यात आला. त्यानंतर नऊ ते दहा वाहनांतून सुमारे २५ ते ३० युवक धारदार शस्त्रे घेऊन दहशत पसरवत मगर यांच्या घराकडे आले.

घरात ७५ वर्षांची आई आणि भाऊ एकटे असताना घरावर हल्ला करण्याच्या उद्देशाने हे लोक आल्याने तुळजापूरला बिहारचे स्वरूप आले असल्याचे त्यांनी सांगितले.

या जमावाला समजावून पाठविल्यानंतर रस्त्यात स्कुटीवरून जाणाऱ्या त्यांच्या चुलत भावावर कुलदीप मगर यांच्यावर हल्ला करण्यात आला. दोन रिव्हॉल्व्हरमधून हवेत गोळीबार करण्यात आला तसेच कोयत्याने डोक्यावर दोन ते तीन वार करण्यात आले.

या हल्ल्यात कुलदीप मगर गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला ३७ ते ३८ टाके पडल्याची माहिती अमर मगर यांनी दिली.

या पत्रकार परिषदेला माधवराव कुतवळ, धीरज पाटील, अमर मगर, भाऊ भांजी, सुधीर कदम, भारत कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रेल्वे संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**

सोलापूर तुळजापूर धाराशिव या रेल्वे मार्गासाठी तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने २००६ पासून रेल्वे आंदोलन विविध माध्यमातून सुरुवात करण्यात आली होती व हे आंदोलन २० ते २५ वर्षे चालले होते की या आंदोलनाची दखल घेऊन आनंदी युनिव्हर्सल फाउंडेशन पुणे यांनी महाराष्ट्र गौरव पुरस्कार तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीला यांना प्रदान केला होता.

महाराष्ट्र गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गोकुळ शिंदे यांनी तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समिती अध्यक्ष बबनराव गावडे, अशोक साळुंखे, रत्नाकर खोले, खैयुम शेख, मोहन भोसले, शुभम खोले या सर्व उपस्थित असलेल्या सदस्यांचा हार, श्रीफळ व फेटा बांधून तुळजापूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये १६ डिसेंबर रोजी भव्य सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अभय माने, चंद्रकांत दिंडोरी, अनिल झाडपिडे, चंद्रकांत दिंडोरे, अरुणकुमार झाडपिडे, उपस्थित होते.

# ‘उदगीर-नांदेड एक्सप्रेस’चा विस्तार नागपूरपर्यंत करण्याची आवश्यकता

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ डिसेंबर :** बंगळुरू - उदगीर-नांदेड एक्सप्रेसचा विस्तार नागपूरपर्यंत करण्याची आवश्यकता आहे. आज ही गाडी सुरू होऊन जवळपास ३२ वर्ष झाली. मागील काही वर्षांपासून मराठवाड्यासह महाराष्ट्रातील आणि ही गाडी ज्या मार्गे धावते त्या मार्गांचे विद्युतीकरण पूर्ण होऊनही २ वर्षे होत आली. इतरही रेल्वे विकासाची बरीच कामे झाली. सध्या ही गाडी बंगळूरू- नांदेड हे १०३९ किमी अंतर आहे. दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन सदरील रेल्वे नांदेडच्या पुढे १९५ किमी वर तेलंगणातील आदिलाबाद पर्यंत विस्तारित करणार असल्याचे नियोजन केले आहे.

या रेल्वेचा अनावश्यक स्लॅक टाईम कमी करून नांदेडच्या पुढे ४५० किमी महाराष्ट्राची उप राजधानी नागपूर करण्याची आवश्यकता आहे. ह्या मार्गावर असलेल्या लातूर रोड (चाकूर) बीएसएफ छावणी, मुदखेड (सीआरपीएफ कँप) येथील जवानांना उत्तरेचे प्रवेशद्वार असलेल्या नागपूरहून उत्तरेकडे जायला कनेक्शन मिळेल.



तसेच उदगीर, परळी वैजनाथ येथील शिक्षण नोकरीनिमित्त नागपूरला जाऊ इच्छिणाऱ्या लोकांना दररोज एक गाडी मिळेल. आपल्या सूक्ष्म नियोजनामुळे तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने नागपूरला मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे उभारले जात आहेत.

लातूर, बीड, नांदेड परभणी परिसरातून मोठ्या प्रमाणावर लोक आता पुण्यात बरोबरच नागपूर येथेही नोकरी रोजगाराच्या शोधात जात आहेत त्यांना नागपूरशी दररोज कनेक्टिव्हिटी मिळावी ह्या करिता बंगळुरू-नांदेड एक्सप्रेसचा विस्तार नागपूरपर्यंत करण्याची आपण रेल्वेमंत्र्यांकडे शिफारस करावी ही विनंती आहे. सध्या नागपूर - बंगळुरू तितकीशी कनेक्टिव्हिटी नाही असली तरी खास नागपूरहून सुटणारी आणि बंगळुरूला जाणारी अशी हक्काची गाडी नागपूरकरांकरिता नाही.

बंगळुरू-नांदेड एक्सप्रेसचा विस्तार नागपूर पर्यंत झाल्यास नागपूर आणि बंगळुरू दोन औद्योगिक शहरे एकमेकांना जोडली जातील. औद्योगिक शहर, संत्र्यांचे शहर, दीक्षाभूमीचे शहर नागपूर हे आयटी सिटी बंगळुरूला जोडले जाईल. त्यामुळे बंगळुरू-नांदेड एक्सप्रेसचा विस्तार नागपूर पर्यंत करण्याची मागणी आपण स्वतः रेल्वेमंत्र्यांकडे करावी ही विनंती दिल्ली येथे केले.

सध्या नागपूर बंगळुरू तितकीशी कनेक्टिव्हिटी नाही असली तरी खास नागपूरहून सुटणारी आणि बंगळुरूला नांदेड विस्तार जाणारी अशी हक्काची गाडी नागपूरकरांकरिता नाही. बंगळुरू एक्सप्रेसचा नागपूर पर्यंत झाल्यास नागपूर आणि बंगळुरू दोन औद्योगिक शहरे एकम ेकांना जोडली जातील.

औद्योगिक शहर, संत्र्यांचे शहर, दीक्षाभूमीचे शहर नागपूर हे आयटी सिटी बंगळुरूला जोडले जाईल. एक्सप्रेसचा त्यामुळे बंगळुरू-नांदेड विस्तार नागपूर पर्यंत करण्याची मागणी उदगीर रेल्वे संघर्ष समीतीच्यावतीने नितिन गडकरी यांना देण्यात आले.

या शिष्टमंडळात ॲड. नरेश सोनवणे, अहमद सरवर अशिषत पाटिल राजूरकर, संतोष कुलकर्णी ओम गांजूरे, जाधव उपस्थित होते.



# गुरनाळ येथील रस्ता केला अतिक्रमण मुक्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १७ डिसेंबर :** गुरनाळ, तालुका देवणी येथील सर्वे नंबर ८७ मध्ये जाण्यासाठी सर्वे नंबर ९० व सर्वे नंबर ८८ यांच्या सामायिक बांधावरून रस्ता देण्याबाबत तहसीलदार सोमनाथ वाडकर यांच्या न्यायालयातून निकाल आदेश पारित झाला . त्या आदेशाच्या अनुषंगाने पोलीस, महसूल व भूमी अभिलेख विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता वहिवाटीवरील अतिक्रमण मुक्त करण्यात आले.

या कारवाईच्या वेळी गणेश हिवरे (बोरोळ मंडळ अधिकारी), ग्राम महसूल अधिकारी दयानंद बोचरे, पोलीस कॉन्स्टेबल शौकत, महिला पोलीस कॉन्स्टेबल, उपअधीक्षक भूमी अभिलेख यांचे प्रतिनिधी, गावचे पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. सदरचा रस्ता काढल्यामुळे शेतकऱ्याचा आनंदाचे वातावरण निर्माण झाले आणि तहसीलदार सोमनाथ वाडकर यांचे आभार व्यक्त केले.

# ‘कमळा’ला मतदान देऊन विकासाला गती द्या : बावनकुळे




**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १७ डिसेंबर :** निलंगा नगरपालिका निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्व २३ उमेदवारांना बहुमताने निवडून देवून विकासाच्या चार चाकी गाडीला गती द्या असे आवाहन करत निलंगा नगरपालिकेला भरघोस विकास निधी देण्याचे अभिवचन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी निलंगा येथील शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर सुरक्षित, समृद्ध आणि स्वच्छ, निलंगा शहरासाठी विजय संकल्प सभा भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते.

**जातीचा विचार करू नका : बसवराज पाटील**

निलंगा नगरपालिका निवडणुकीत जात-पात धर्म न पाहता निलंगा शहराचा विकास करणाऱ्या भाजपा महायुती पॅनलच्या नगराध्यक्षपदासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करावे. आज केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे व राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे लोकाभिमुख सरकार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल खात्याचा कारभार पारदर्शक केले आहे. त्यामुळे जातपात धर्म न पाहता विकासाला मतदान करा असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांनी केले

यावेळी माजी पालकमंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी खासदार डॉ सुनिल गायकवाड,भाजपा जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे व मिलिंद लातुरे, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार, संजयराज हलगरकर,माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व २३ उमेदवार व भाजप पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले नगरपलिकेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकारच्या ५८ योजना व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महाराष्ट्र शासनाच्या ४८ योजना आहेत. तर पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या जिल्हा नियोजन समितीच्या २२ योजना आहेत. शहरातील नागरिकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी या १२६ योजना निलंगा नगर परिषदेच्या माध्यमातून राबवण्यात येतील. आगामी काळातील निलंगा कसा असेल त्या विकसित निलंग्याचे वचन देण्यासाठी मला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवले आहे. राज्यात जोपर्यंत भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद पडणार नाही असे त्यांनी सांगितले.

निलंगा नगरपालिका निवडणुकीत संजयराज हलगरकर निवडून आल्यानंतर बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपये देऊन ५०० महिलांना लखपती दीदी करणार आहोत.. त्याचबरोबर आपल्या घरातील विजेचे बिल अर्ध्यावर आणणार आहोत.

शेतकऱ्यांचे बहात्तर हजार कोटीचे वीज बिल माफ केले असून पुढील पाच वर्षासाठी कसलेच बिल येणार नाही. अतिवृष्टी झालेल्या भागासाठी ३२००० कोटीची नुकसान भरपाई दिली आहे. तसेच ३० जून २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले, बाभळगावकरांनी निलंगा नगर परिषद ताब्यात घेण्याचे दिवा स्वप्न पाहू नये. निलंगा नगरपालिकेवर भाजपचा झेंडा तर फडकवणारच आहोत पण १६ जानेवारीला लातूर महानगरपालिकेवर भाजपचा झेंडा फडकवू. मला मतदार संघातील सर्व जनता आमदार नव्हे तर भैय्या म्हणतात. मामा म्हणून तुमच्या लेकरा बाळाची जबाबदारी माझी आहे. भविष्यात मुला मुलींच्या व महिलांच्या सुरक्षितेसाठी प्रत्येक चौकात आणि गल्ली बोळात आपल्या सुरक्षितेसाठी सीसीटीव्हि कॅमेरे बसवणार असल्याचे अभिवचन आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी दिले.

# खेळामुळेच मानसिक बळ मिळते : तहसीलदार

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ डिसेंबर :** मैदानी खेळ खेळल्यामुळे विद्यार्थ्यांचे शरीर तर मजबूत होतेच शिवाय मानसिक दृष्ट्या सुद्धा सकारात्मक परिणाम होतात. असे मत उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर यांनी पत्रकारांच्या वतीने मातृभूमी महाविद्यालयामध्ये अजिंक्य खेळाडुंचा सत्कार कार्यक्रमात व्यक्त केले. यावेळी मातृभूमीच्या प्राचार्या श्रीमती उषा कुलकर्णी, केंद्रप्रमुख मारोती लांडगे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यस्तरीय व्हॉलीबॉल अजिंक्यपद पद पटकावलेला गजेंद्र पांचाळ, राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पधेत प्रथम आलेल्या कु. नुपुर रामदास मलवाडे व महिल शिक्षका अर्चना शेवाळे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

पुढे बोलताना बोरगावकर म्हणाले की, अनेक छोटे छोटे देश सुद्धा मैदानी खेळात मोठ्या प्रमाणात प्रगती केलेले आपण पाहतो. पण आपला देश त्या दृष्टीने खुप मागे असून त्यात महाराष्ट्र व महाराष्ट्रात आपला मराठवाडा तर खुपच मागे आहे. त्यामुळे मैदानी खेळाला महत्व देणे गरजेच असून ती काळाजी गरज असल्याचे सांगतले.

अलिकडे मैदानी खेळ खुपच कमी झाले असून अनेक ठिकाणी मैदानचं शिल्लक राहिले नसल्याची खंत यावेळी व्यक्त करताना अनेक पालकांना असे वाटते की, मूलं खेळण्यात वेळ घालवला तर शिक्षणात कमी पडतात. पण एरवदा खेळाडू जर कोणत्याही खेळामध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर जर विशेष कामगीरी केली तर, त्यांना वर्ग एकच्या पदासह अनेक विभागात स्पर्धा



परिक्षा शिवाय सरळ नियुक्ती देण्याची पद्धत आपल्या शासनात तरतुद असल्याचे शेवटी म्हणाले. व कार्यक्रमाच्या शेवटी खेळाडूंचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी पत्रकार विनायक चाकुरे, बबन कांबळे, सुनिल हवा, सुनिल मादळे, प्रभुदास गायकवाड, सिद्धार्थ सुर्यवंशी, शेख इरफान हाणमत केंद्रे, महादेव गोणे, मंगेश सुर्यवंशी, निवृत्ती जवळे, शिंदे, संदिप निडवदे, आदि पत्रकारांसह श्रीमती अरुणा पांचाळ साहित्यिक रामदास केदार, अमजद पठाण, रामदास मलवाडे, शेवाळे सर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन शिवशेट्टे तर आभार प्रा. बिभीषण मद्येवाड यानी मानले.

# रसिका शिक्षण संकुल संस्काराने समृद्ध : गहिनीनाथ महाराज औसेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १७ डिसेंबर :** रसिका शिक्षणसंस्था आचार, विचार आणि संस्काराने चालणारी समृद्ध शिक्षण संस्था असून या संस्थेने हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार देऊन समृद्ध केले आहे. म्हणून अशा शिक्षण संस्था विकसित होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सद्गुरु ह. भ. प. गहिनीनाथ महाराज (सहअध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान, पंढरपूर) यांनी केले आहे.

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी अंतर्गत रसिका शैक्षणिक संकुल देवणी येथे नूतन इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी या शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी आशीर्वचन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक आमदार विक्रम काळे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून आ. संजय बनसोडे (माजी मंत्री, क्रीडा व युवक कल्याण), आमदार सतीश चव्हाण, (मराठवाडा शिक्षक पदवीधर मतदारसंघ) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार धर्माजी सोनकवडे, ॲड. व्यंकटराव बेद्रे (माजी नगराध्यक्ष, लातूर), संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, बबन आबा भोसले, अंकुश नाडे, माजी महिला व बालकल्याण सभापती कुशावर्ताताई बेळे, दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, मनोज कन्नाडे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास संस्था सहसचिव सौ. गीतांजली भोपणीकर, कविताताई बिरादार, संगीताताई बिरादार, भामाबाई पाटील, मधुकरराव लांडगे मामा, सौ. मीनाक्षीताई शिंगडे , प्रणिताताई सूर्यवंशी शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस लातूर, रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, आबासाहेब इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अहमद भट, वलांडीच्या माजी सरपंच शीतल सोनकवडे, राष्ट्रवादी युवा नेते अमोल कांडगिरे, अंकुश माने, प्रीतम आष्टुरे, अजय भोळे, रामदास नगराळे यांच्यासह देवणी तालुक्यातील पालक,प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ डिसेंबर :** रोटरी क्लब अहमदपूर आणि पोलीस स्टेशन अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूर उपविभागीय कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या पोलीस बांधवांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी, रक्ततपासणी व वैद्यकीय सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्यातून हे शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अतुल खडके, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. ऋषिकेश पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष कपिल बिरादार, सचिव धीरेंद्र ढेले यांच्यासह अनेक पोलीस स्टेशन मधील मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात लिपीड प्रोफाइल, ब्लड शुगर क्ल-१३, हिमोग्लोबिन (क्ह), यूरिक सिड, रक्तदाब, ईसीजी, डोळे तपासणी तसेच दात तपासणी अशा सर्वसमावेशक तपासण्या करण्यात आल्या. डॉ. ऋषिकेश पाटील, डॉ. अतुल खडके, डॉ. रामेश्र्वर चामले, डॉ. तुकाराम नलवाड, डॉ. गोविंद खोडवे, डॉ.शैलेश यलगट्टे आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला व उपचार दिले.

मार्गदर्शन करताना डॉ. ऋषिकेश पाटील यांनी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी विश्रांती या गोष्टी



जीवनशैलीत अंगीकारण्याचे आवाहन केले. समारोपप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी अशा उपक्रमांमुळे पोलीस बांधवांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, असे सांगून रोटरी क्लब व डॉक्टरांचे आभार मानले.

# हॅन्डबॉल स्पर्धेत म. गांधी महाविद्यालय प्रथम

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन विद्यापीठस्तरीय हॅन्डबॉल मुले/ मुली अजिंक्यपद स्पर्धा दि १६ डिसेंबर मंगळवारी महात्मा गांधी महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी संस्थेचे सचिव अँड पी. डी. कदम यांच्या हस्ते उद्घाटन व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा पार पडल्या असून यामध्ये विद्यापीठ क्षेत्रातील नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली या जिल्ह्यांतील




विविध महाविद्यालयातील मुलांचे व मुलींचे संघ सहभागी झाले होते. सदरील स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयाच्या हॅन्डबॉलच्या मुलांच्या संघाने सर्व प्रथम येऊन आपल्या क्रीडा विभागाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

यामध्ये सौरभ नरहरे, सुदर्शन गवारे, लक्ष्मण पोळ, शुभम रेचेवाड, दत्ता मोरतळे यांनी विशेष नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. उद्घाटन तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी क्रीडा संचालक तथा सिनेट सदस्य डॉ विनोद माने यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बी. व्ही. नरवाडे तर आभार डॉ. यादव सूर्यवंशी यांनी मानले.

याप्रसंगी डॉ. आर. बी. देसाई, डॉ. के. एन. शिवलकर, डॉ. ए. आर. कराड, डॉ. बी. के. पाटील, डॉ. व्ही. पी. शेळके, डॉ. एस. आर. होळकर, प्रा. पी. आर. अर्जून, प्रा. डी. जी. पुरी, सिद्धेश्वर चोथवे, सुनील राठोड, दीपक दुर्गे तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात**
**जाहीर प्रगटन**
**जन्म-मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. दिलीप प्रभू एकुर्गे विरूद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपचायत कार्यालय, तळेगाव बोरी. ज्याअर्थी नामे प्रविण दिलीप एकुर्गे, रा. तळेगाव बोरी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांच्या मुलाचा/मुलीचा/नाताचा/नातीचा जन्म दि. १०/६/२०११ रोजी मौजे तळेगाव बोरी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार दिलीप प्रभू एकुर्गे, रा. तळेगाव बोरी यांनी या न्यायालयात त्यांच्या पृष्ठार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव बोरी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथ त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्याअर्थी सदरहू नामे प्रविण दिलीप एकुर्गे रा. अंकुलगा राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर ह्याचा/हिचा १०/१०/२०११ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे प्रविण दिलीप एकुर्गे, रा. तळेगाव बोरी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

**स्वाक्षरित तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ**

**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात**
**जाहीर प्रगटन**
**जन्म-मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. नरसिंग गोविंद माने विरूद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अ. राणी. ज्या अर्थी नामे आयुष नरसिंग माने, रा. अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांच्या मुलाचा/मुलीचा/नाताचा/नातीचा जन्म दि. ३१/१०/२०१४ रोजी मौजे अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार नरसिंग गोविंद माने, रा. अ. राणी यांनी या न्यायालयात त्यांच्या पृष्ठार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथ त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्याअर्थी सदरहू नामे आयुष नरसिंग माने रा. अंकुलगा राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर ह्याचा/हिचा ३१/१०/२०१४ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे आयुष नरसिंग माने, रा. अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.
पुढील तारीख : १५ दिवसानंतर.

**स्वाक्षरित तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ**

**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात**
**जाहीर प्रगटन**
**जन्म-मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. नरसिंग गोविंद माने विरूद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अ. राणी. ज्या अर्थी नामे आकांक्षा नरसिंग माने, रा. अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांच्या मुलाचा/मुलीचा/नाताचा/नातीचा जन्म दि. ३१/१०/२०१४ रोजी मौजे अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार नरसिंग गोविंद माने, रा. अ. राणी यांनी या न्यायालयात त्यांच्या पृष्ठार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथ त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्याअर्थी सदरहू नामे आकांक्षा नरसिंग माने रा. अंकुलगा राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर ह्याचा/हिचा ३१/१०/२०१४ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे आकांक्षा नरसिंग माने, रा. अ. राणी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.
पुढील तारीख : १५ दिवसानंतर.

**स्वाक्षरित तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ**

# बोगस शालार्थ घोटाळ्याचे लोन बीडसह मराठवाड्यात

## बीडमधील दोन शाळेत मोठ्या प्रमाणात शिक्षक-शिक्षकेत्तर भरतीमध्ये अनियमितता, संस्था चालकावर होणार गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

राज्यात गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असून नागपूर नंतर नाशिक विभागात मोठा घोटाळा उघडकीस आल्यानंतर या बाबतीत मराठवाडाही मागे नाही. याचा विशेष तपास (एसआयटी) ने बीडसह मराठवाड्यात लक्ष्य घातले आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर उपसंचालक कार्यालयासह विभागातील पाचही जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना २०१२ ते २०२४ या कालावधीतील वैयक्तीक मान्यता शालार्थ आयडीच्या फाईल चौकशीसाठी तयार ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह इतरांच्या सेवा अधिगृहीत करून सदरील फाईलची तपासणी सुरू झाली आहे. शिक्षण विभागात गेल्या अनेक महिन्यापासून गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याचे सन २०१२ ते २०२४ मधील वैयक्तीक मान्यता शालार्थ आयडी शोधण्यास तातडीने सुरूवात झाली आहे. ज्या फाईल सापडणार नाहीत त्या कालावधीतील कार्यालय प्रमुख, प्रशासन अधिकारी व संबंधित लिपीकांना फाईलच्या शोधासाठी नोटीस देण्यात आल्या आहेत. व सदरील फाईलची संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याच्या सूचना शिक्षण विभागाला मिळाल्या आहेत.

बीड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक भरती करून अनियमितता समोर आली आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्याच्या शिक्षण आयुक्तांनी एसआयटीच्या चौकशीसाठी मराठवाड्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैयक्तीक मान्यता व शालार्थ आयडी दिल्याच्या फाईल तयार ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. २०१२ -२०१९ आणि २०१९ ते २०२४ या कालावधीतील फाईलचा शोध घेण्यात येत आहे. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने वैयक्तीक मान्यता आणि शालार्थ आयडीच्या फाईलवर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कामाला लावले आहे. या शिवाय काही सेवाही अधिगृहीत केल्या. सापडलेल्या फाईलही तात्काळ स्कॅन केल्या जात असून या फाईल स्कॅन करण्यासाठी आधुनिक स्कॅनरही मागविण्यात आले आहेत.

कर्मचारी व शिक्षकांची स्वतंत्र यादी

शिक्षकांच्या नियुक्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी झाली असून त्यात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची शिक्षक म्हणून नियुक्त केल्याचे प्रकरणं सर्वाधिक असल्याचे तपासणीत समोर येत आहे. त्यामुळे या प्रकरणाची स्वतंत्र यादी बनविण्याच्या सूचनाही शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

अनुदानितवरच्या बदल्यांची चौकशी

अनेक शिक्षण संस्थांमध्ये विशेषातः बीडमध्ये विनाअनुदानितवर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती दाखवली आहे. या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बदली अनुदानितवर केल्याचे शेकडो प्रकरणं समोर आली आहेत. त्याची संख्याही स्पष्ट होणार आहे. अशा प्रकारची माहिती उपलब्ध करून ठेवण्याच्या सूचना शालेय शिक्षण विभागाला दिल्या आहेत.

# पन्नालाल सुराणा, बाबा आढाव यांनी समाजासाठी आयुष्य घालवले-राजेंद्र आगवान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

समाजवादी नेते व कष्टकऱ्यांचे नेते पन्नालाल सुराणा व कष्टकऱ्यांचे नेते कै.बाबा आढाव यांनी आपले आयुष्य निस्वार्थपणे समाजासाठी दिले. त्यांच आदर्श समोर ठेवून काम करावे असे प्रतिपादन संपादक राजेंद्र आगवान यांनी केले.

मागच्या आठवड्यात या दोन्ही समाजवादी नेत्यांचे दुःखद निधन झाले. दोघांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतांना जेष्ठ संपादक राजेंद्र आगवान म्हणाले की, वरील नेत्यांची साधी राहणी व उच्च विचारसरणीमुळे दिनदलित दुबळ्यांचे प्रश्न सोडवण्यात त्यांना आनंद वाटत असे. माझा व पन्नालाल सुराणा दै.मराठवाड्याचे संपादक असतांना २० वर्षापासून त्यांचे संबंध होते. त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहिल.

# संस्था चालकावर गुन्हा दाखल करण्याचे परळी वे येथील न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ डिसेंबर**

परळी वे येथील मराठवाडा एजुकेशन अॅड वेलफेअर सोसायटी या संस्थे अंतर्गत मोजे सिरसाळा, ता. परळी वै.जि. बीड येथे मदरसे फारुखी उर्दू शाळा हो शाळा बऱ्याच वर्षापासुन चालवली जाते. सदर शाळेसाठी तात्कालीन संस्था सदस्यांनी स्वनिधीतुन मौजे सिरसाळा येथे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३९९ क्षेत्र ४१४.५९ चौ.मी ही जागा खरेदी घेतली होती. भविष्यात सदर जागेवर शाळेची टोलेजंग इमारत उभी रहावी असे स्वप्न फिर्यादी व काही सुज्ञ संचालकांचे होते.



दरम्यानच्या काळात संस्थेचे सचिव अब्दुल मुक्तार सत्तार पटेल, तसेच काही संचालक नामे १. अब्दुल मुस्ताख अब्दुल सत्तार, २. अब्दुल इसरार अब्दुल सत्तार, ३. शेख आसीफ शेख शोकत, ४. जरीनाबेगम अब्दुल सत्तार, ५. अब्दुल जफर अब्दुल सत्तार या सर्वांनी आपसात संगणमत करुन संस्थेची सदर जागा विक्री करण्याचा बनावट ठराव तयार करुन मा. धर्मदाय उप आयुक्त, बीड यांचा बनावट शिक्का तयार करुन बनावट प्रमाणपत्र बनवले व त्याअधारे सदर मालमत्ता क्र. ३९९ ही बेकायदेशीररित्या अयस्थ व्यक्तीला खरेदीखत क्र. ६८२/२०२४ अन्वये विक्री केली व सदर जागेची घेतलेली किंमत ही नगदी स्वरुपात घेवुन ती संस्थेच्या खात्यात न भरता स्वतःचे फायद्यासाठी वापरुन रक्कम रु. ५,१०,०००/- अक्षरी पाच लाख दहा हजार रुपयांचा अपहार केला आहे.

या प्रकरणी फिर्यादी सुलतानखान गाजियोद्दीनखान पठाण, रा. सिरसाळा, ता. परळी वै.जि. बीड यांनी मा. धर्मदाय उप आयुक्त, बोड, मा. धर्मदाय सह आयुक्त, लातुर, मा. पोलीस निरीक्षक साहेब, पोलोसठाणे सिरसाळा, मा. पोलीस उपअधिक्षक साहेब, माजलगांव, मा. पोलीस आयुक्त साहेब, बीड यांच्याकडे लेखी तक्रारी देवुन सुध्दा कार्यवाही न झाल्यामुळे फिर्यादी सुलतानखान गाजियोद्दीनखान पठाण यांनी परळी वे येथील मा. न्यायदंडाधिकारी साहेब, प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २८२/२०२५ हा सुलतानखान विरुध्द अब्दुल मुक्तार व इतर हा अॅड. प्रदिप सी.गिराम यांच्या मार्फत दाखल केला ज्यावर मा. न्यायालयात फिर्यादीचे वतीने अॅड. प्रदिप सी. गिराम यांनी युक्तीवाद केला. तद्नंतर मा. न्यायालयाने कागदपत्रांची पडताळणी व युक्तीवादातील मुद्दे गृहीत धरुन उपरोक्त संस्था चालक यांचे विरुध्द गुन्हा कलम ३३६ (१), ३३६ (२), ३३८, ३३९, ३४०(२), ३४१(२), ३१८(२), ३१८(४), ३१६(५),३ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे /व जुने कलम ४१७, ४२०, ४०९, ४६५, ४६७, ४७४, ४७१, ४७३ व ३४ भा.दं.वी.प्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे आदेश दि. १५/१२/२०२५ रोजी पोलीस ठाणे सिरसाळा यांना दिले आहेत.सदर प्रकरणात फिर्यादीचे वतीने अॅड. प्रदिप सी. गिराम यांनी काम पाहिले त्यांना अॅड. प्रकाश एच. मराठे यांनी मार्गदर्शन केले तर अॅड. सुलतान एम. सय्यद, अॅड. उमेश बी. घोडके व अॅड. प्रणव पी. मराठे यांनी सहकार्य केले.

# बीड शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

## चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल नागरिकांना केले परत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

बीड शहर पोलीस दलाने चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल शोधून काढून ते मूळ मालकांकडे सुपूर्द करत नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. या कारवाईत एकूण १८ मोबाईल फोन नागरिकांना परत देण्यात आले आहेत.



सदरील उपक्रमाची संकल्पना व प्रेरणा बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनानुसार हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

या संपूर्ण कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. दिलीप खेडकर, पोलीस अंमलदार श्री. सुषेण उगले व पोलीस अंमलदार श्री. सय्यद शहनशहा यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन विशेष परिश्रम घेतले. सखोल तपास, तांत्रिक विश्लेषण व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सदरील कामगिरी होऊ शकली.

शोधून काढलेले मोबाईल पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना परत देण्यात आले. या कामगिरीमुळे नागरिकांचा पोलीस दलावरील विश्वास अधिक दृढ झाला असून, बीड पोलीस दल सदैव नागरिकांच्या सेवेत तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबर पर्यंत सी.सी.आय. कडे कापुस विक्रीसाठी नोंदणी करावी : सभापती सुर्यभान मुंडे



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ डिसेंबर**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कापुस उत्पादक शेतक-यांचा शाासकीय हमीभाव दराने कापुस विक्री करीता पुर्व नोंदणी करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ अंतीम तारीख आहे यापुर्वी शेतक-यांनी नोंदणी करावी. परळी तालुक्यातील जिनिंगवर सी.सी.आय. मार्फत शासकीय हमीभाव दराने कापुस खरेदी सुरु असुन सी.सी.आय.यांना कापुस विक्री साठी फोटो, आधारकार्ड, व नुतन ७/१२ द्वारे किसान अॅप द्वारे कापुस उत्पादक शेतक-यांनी अंतीम दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पुर्वी ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन सभापती सुर्यभान (नाना) मुंडे यांनी केले आहे.

# समीक्षा मुळे साहित्यकृतीचे योग्य मूल्यमापन होते - डॉ. रामनाथ वाढे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ डिसेंबर**

एखाद्या साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण आणि मूल्यमापन करणारे लेखन समीक्षण होय. समीक्षेमुळे साहित्यकृतीचे योग्य मूल्यमापन होते असे प्रतिपादन डॉ. रामनाथ वाढे यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित वा.ल. कुलकर्णी व्याख्यान मालेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे, विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. गंगाधर उषमवार यांची उपस्थिती होती.

# राज्य स्तरीय खो-खो महासंग्रामासाठी बीड सज्ज

## ४ क्रीडांगणे,भव्य प्रेक्षक गॅलरी

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१७ डिसेंबर**

१८ ते २१ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बीड शहर पूर्णपणे सज्ज झाले असून आयोजकांकडून युद्धपातळीवर तयारी सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.



स्पर्धा स्थळ असलेल्या श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात एकाच वेळी सुरळीत सामने पार पडावेत यासाठी ४ स्वतंत्र क्रीडांगणे सज्ज करण्यात येत आहेत. मापदंडानुसार आखणी आणि योग्य प्रकाशयोजना यामुळे खेळाडूंना सर्वोत्तम खेळाचे वातावरण मिळणार आहे.

प्रेक्षकांसाठी सुरक्षित व प्रशस्त गॅलरी व्यवस्था उभारण्यात येत असून, राज्यभरातून येणाऱ्या क्रीडाप्रेमींना थरारक सामने आरामात पाहता येतील. स्पर्धेच्या चारही दिवसांत मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.खेळाडू, प्रशिक्षक व अधिकाऱ्यांसाठी स्वच्छ, पौष्टिक व वेळेवर भोजन व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच बीड शहरात ये-जा सुलभ व्हावी यासाठी वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था आणि समन्वय पथके तैनात करण्यात आली आहेत.

या स्पर्धेमुळे केवळ उत्कृष्ट खेळाडूंची निवडच होणार नाही, तर बीडच्या क्रीडा व्यवस्थापन क्षमतेचे दर्शन घडणार असल्याचे सांगून, ही स्पर्धा संस्मरणीय ठरेल, असा विश्वास शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मार्गदर्शक प्रा. जनार्दन शेळके यांनी व्यक्त केला. प्रा. जे. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष - ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे,सचिव - विजय जाहेर , राज्य प्रसिद्धी समिती सदस्य प्रा . राजेंद्र बरकसे, अविशांत कुमकर यांच्यासह वर्षा कच्छवा, योगेश सोळसे, मनोज जोगदंड, कैलास गवते, अनिल शेळके, माधव जायगुडे, बंडू घोरड अमोल सांगुळे, प्रफुल्ल हाटवटे , नितीन फुटवाड, रमेश पिसाळ, सुधीर हजारे, नितीन येळवे, अंकुश गायकवाड, संदिप हांगे , बापू तारुकर , ठोकरे, राऊत, घरत यादव, मुंजाराम निरडे, सोमनाथ मंडलिक, छत्रभूज ढेंबरे आदी कार्यकर्ते ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत.

# माजलगाव न्यायालयात ई-फायलिंग प्रशिक्षण शिबीर



## वकील संघातील सदस्यांचा उस्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ डिसेंबर**

माजलगाव न्यायालयातील वकिलांसाठी ई-फायलिंगवर एकदिवसीय शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने व उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात ई-फायलिंग प्रक्रियेचे विविध पैलू समजावून सांगण्यात आले.

शिबिराचे उदघाट्न दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एस.एस. बुद्रुक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डि.एन.चामले साहेब,मा.क.दिवाणी न्यायाधीश जी.एस खुपसे साहेब उपस्थित होते.सदरील उपक्रमासाठी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश श्रीमती राजश्री परदेशी मॅडम यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले.मास्टर ट्रेनर म्हणून ऍड.दिपक देशमुख व ऍड.ए.डी.घाडगे यांनी ई फायलिंग विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.या शिबिरात संधीचे अर्ज, मुदतीसंबंधित नियम कागदपत्रे अपलोड ही प्रक्रिया यावर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक डेमो देण्यात आला.शिबिरात ईफायलिंग सारखी आधुनिक प्रणाली व्यवहारात आणण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिराचे महत्व अधोरेखित केले.सदरील कार्यक्रमाचे प्रस्तविक ऍड.दिपक देशमुख यांनी केले.तर सूत्रसंचालन ऍड.एन एम.जाधव यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव ऍड.तेलगड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ.राजेश इंगोले यांची मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाचे राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ डिसेंबर**



येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वैद्यकीय कक्षाचे राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील नियुक्तीचे पत्र त्यांना नुकत्याच देवडी या ठिकाणी संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण व पत्रकारांच्या गुणगौरव सोहळ्यानिमित्य आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आले. या निवडी बद्दल डॉ.इंगोले यांचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

डॉ.राजेश इंगोले हे मागील अनेक वर्षांपासून इंडियन मेडिकल असोसिएशन या राज्यस्तरीय वैद्यकीय संघटनेचे क्रियाशील राज्य पदाधिकारी, सांस्कृतिक समिती राज्याध्यक्ष तसेच स्थानिक शाखेचे सात वर्षे अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांचा राज्यभर संपर्क निर्माण झालेला आहे आणि त्यामुळेच मागील अनेक वर्षापासून त्यांचा केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे तर राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक सामाजिक क्षेत्रात सतत सहभाग असतो. याच सामाजिक कार्यामुळे त्यांची मागील पाच वर्षांपूर्वी अखिल भारतीय मराठी परिषदेशी नाळ जुळली आणि मराठी पत्रकार परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून ते अंबाजोगाई तालुक्यातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी सातत्याने घेत आहेत.

# राज्यातील महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांचा अन्यायाविरोधात एल्गार

## १९ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ , जिल्हा शाखा बीड यांच्या वतीने महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या एकतर्फी , अन्यायकारक निलंबन कारवाई , विभागातील प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्या , तसेच नैसर्गिक आपत्ती व निवडणूक काळातील अतिरक्त कामकाज असूनही संरक्षण न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर १९ डिसेंबर २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे . यासंदर्भातील निवेदन आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना देण्यात आले.



निवेदन सादर , तीव्र नाराजी व्यक्त : जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत शासनाकडे आपली भूमिका ठामपणे मांडली . महसूल विभाग हा राज्य प्रशासनाचा कणा असून सामान्य जनतेशी थेट संपर्क असलेला विभाग आहे . मात्र अलिकडच्या काळात केवळ महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच जबाबदार धरून निलंबन , फौजदारी कारवाई व चौकशीचे सत्र सुरू असल्याने विभागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे , अशी तीव्र भावना व्यक्त करण्यात आली.

निलंबन सत्राला विरोध : निवेदनात नमूद करण्यात आले आहे की , महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन , वाहतूक व चोरी रोखण्याची जबाबदारी केवळ महसूल विभागाची नसून पोलीस व परिवहन विभागाचीही संयुक्त जबाबदारी आहे . मात्र प्रत्यक्षात कारवाई होताना सर्व दोष महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर टाकले जात आहेत . परिणामी न्यायालयीन निर्देश , नैसर्गिक न्यायाची तत्त्वे व प्रशासकीय नियम डावलून एकतर्फी निलंबने केली जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे.

प्रमुख मागण्या स्पष्ट : महासंघाने शासनासमोर प्रमुख मागण्या मांडल्या आहेत . त्यामध्ये १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निलंबन आदेशांचा पुनर्विचार व रद्दबातल निर्णय , चौकशी पूर्ण होईपर्यंत पूर्ववत पदस्थापना , महसूल विभागातील नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी , महसूल सहाय्यक यांच्या वेतनश्रेणी व ग्रेड पे सुधारणे , राज्यातील महसूल सेवक संवर्गाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्यांना तातडीने मंजुरी देणे , तसेच निवडणूक व आपत्ती काळातील कामकाजासाठी संरक्षणात्मक धोरण राबविणे यांचा समावेश आहे.

कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता : महासंघाने स्पष्ट केले आहे की , मागण्या मान्य न झाल्यास १९ डिसेंबर २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात महसूल विभागाचा बेमुदत कामबंद आंदोलनात सहभाग राहील . त्यामुळे जमीन नोंदणी , फेरफार , सातबारा , दाखले , आपत्ती मदत , पिक पाहणी आदी कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील , असा इशारा देण्यात आला आहे .

संवादाची मागणी : महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी संघर्ष नको तर संवाद हवा अशी भूमिका घेत शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने तोडगा काढावा , अन्यथा आंदोलन अपरिहार्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे . शासनाने वेळीच सकारात्मक निर्णय घेतल्यास जनतेचे हित आणि प्रशासनाची विश्वासार्हता अबाधित राहील , अशी अपेक्षाही महासंघाने व्यक्त केली आहे . निवेदन देताना अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हाधिकारी मनोज घोडे , कविता जाधव , शिवकुमार स्वामी , प्रभोदय मुळे , शैलेश सूर्यवंशी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , डी सी मेंडके , नरेंद्र कुलकर्णी , विनोद रणनवरे , विलास तरंगे , राकेश गिड्डे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व विविध संघटनेचे पदाधिकारी यात महादेव चौरे , पुरुषोत्तम आंधळे , अरविंद राऊत आदी उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ११ डिसेंबरच्या मोर्चामुळे ग्रंथालय कर्मचाऱ्यांना नवसंजीवनी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी लोकशाहीचे राज्य आहे. या राज्यात तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळच्या परिस्थिती नुसार १९६७ साली ग्रंथालय कायदा केला आणि गाव तिथे ग्रंथालय ही चळवळ खेड्यापाड्यात पोहोचवली पाहिजे आणि यातून खेड्यातील समाजाला एकंदरीत संपूर्ण जगातील घडामोडीचे ज्ञान मिळाले पाहिजे. अशिक्षित समाज सुशिक्षित, सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी ग्रंथालय चळवळ वाढविण्यासाठी त्यांचे खूप मोठे योगदान आहे. याच उद्देशाने ग्रंथालयात काम करणारा कर्मचारी समाज व नवी पिढी सुसंस्कृत घडविण्यासाठी अहोरात्र काम करीत आहे . सन २०१२ पर्यंत राज्यात १२५०० ग्रंथालये कार्यरत होती पण २१ ते २५ मे २०१२ मध्ये राज्यातील ग्रंथालयांची पडताळणी झाली आणि तेथून चळवळ संपूष्टात येते की काय ? असे वाटत असताना या चळवळीत ३० वर्षा पासून काम करणारा एक संघर्ष योध्दा ग्रंथालय कर्मचारी साठी कायम काम करणारा महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे नावाचा एक असामान्य नेतृत्वग्रंथालय हिताय कर्मचारी सुखाय या उद्देशाने स्वतः साठी जगलाच तर मेलाच. दुसऱ्या साठी जगलाच तर जगलाच या ध्येयाने प्रेरित होऊन समोर आला.



# एकजूट, लोकसंपर्कातून भाजपचा विजय निश्चित : बावनकुळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** जगातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान भाजपाला कार्यकर्त्यांच्या समर्पणामुळे मिळालेला असून राज्यासह देशातील विविध निवडणुकांमध्ये पक्ष पदाधिकारी यांच्या एकजूट भावनेतून केलेल्या लोकसंपर्कामुळे भाजपला विजय मिळाला आहे. हीच समर्पण आणि एकजुटीची भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क आणि केलेल्या विकास कामाच्या बळावर भाजपला लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत निश्र्चीत विजय मिळेल असा विश्वास महसूल मंत्री तथा निवडणूक प्रदेश प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाने लातूर शहरातील औसा रोड येथे असलेल्या पाटील प्लाझा येथे सुरु केलेल्या निवडणूक कार्यालय शुभारंभ प्रसंगी घेतलेल्या आढावा बैठकीत ना. बावनकुळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री तथा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर, प्रदेश सचिव किरण पाटील, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, ॲड. शैलेश गोजमगुंडे, सुधीर धुत्तेकर, सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रविण कस्तुरे आदींची उपस्थिती होती.






पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र-राज्य सरकारने समाजातील प्रत्येक घटकांसाठी विविध योजना राबवत अनेक विकासाची कामे पूर्णत्वास नेली असल्याचे सांगत चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले कि नेत्यांच्या निवडणुका झालेल्या असून आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका होत आहेत. नेत्यांच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करत मोठा विजय मिळवलेला आहे. आता कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत नेते सर्वस्वी ताकत पणाला लावत त्यांच्या पाठीशी उभे राहतील असा विश्वास ना. बावनकुळेनी दिला.

केंद्र व राज्य सरकारने लातूर शहराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला असून या पुढे लातूरच्या विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली. मात्र हा निधी हक्काने आणण्यासाठी मनपावर भाजपचा झेंडा फडकावणे आवश्यक आहे. सरकारच्या माध्यमातून केलेली विकास कामे कार्यकर्त्यांची एकजूट आणि समर्पण भावना तसेच होत असलेला लोकसंपर्क या बळावर भाजपचा विजय निश्र्चीत होईल असा विश्वास व्यक्त केला. मात्र पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अति आत्मविश्वास बाळगू नये असे सांगून आपण केलेली कामे आणि आगामी काळातील लातूरच्या विकासाची संकल्पना प्रत्येक मतदारापर्यंत पोहचवावी असे आवहान ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

आगामी महापालिका निवडणुकीत आपला विजय निश्चीत असला तरी या विजयासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गाफील न राहता मतदारांशी होत असलेल्या संपर्क मोहिमेला अधिक गती द्यावी अशी

### महापालिका निवडणूक आढावा बैठक ; काँग्रेस पदाधिकाऱ्यासह माजी नगरसेवकाचा भाजपात प्रवेश

अपेक्षा जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त करत विरोधकांच्या खोट्या आमिषांना आणि दिशाभूल करणाऱ्या घडामोडींना हाणून पाडून आपण काय केले आणि आगामी काळात लातूरच्या विकासाला कशी गती देणार हे मतदारांना पटवून द्यावे. या निवडणुकीच्या प्रचारात आम्ही सर्वच नेते लातूर ढवळून काढत कार्यकर्त्यांना बळ देत त्यांच्या विजयासाठी जीवाचे रान करू अशी ग्वाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.

बैठकीच्या प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आगामी महापालिका निवडणुक संदर्भात पक्षांने काय काय तयारी केली आहे याची माहिती देत पक्ष आणि पक्षश्रेष्टीना अपेक्षित असणारा निवडणुकीतील विजय मिळवण्यासाठी आम्ही सर्वजन एकजूट आणि समर्पण भावनेतून काम करू असा विश्वास दिला. यावेळी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक व्यवस्थापन संदर्भात विविध सूचनाही केल्या.

या बैठकीच्या प्रारंभी काँग्रेसचे माजी नगरसेवक गौरव काथवटे, काँग्रेसच्या प्रदेश रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या उपाध्यक्षा स्वाती जाधव, सचिव दिलीप बेरूलकर, बळीराम गाडेकर, स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील यांनी भाजपात प्रवेश केला.

या सर्वांचे स्वागत करत ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रवेश केलेल्यांना शुभेच्छा देऊन आगामी निवडणुकांसाठी त्यांनी समर्पण भावनेतून काम करावे असे सांगितले.

## गुरुवारी अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** अल्पसंख्यांक नागरीकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, तसेच याबाबतच्यावैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी, यासाठी १८ डिसेंबर हा अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने १८ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने विद्यार्थी यांच्यासाठी भित्तीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी कार्यक्रम आयोजित करून कार्यक्रमातील विजेत्यांना पारितोषिके वितरीत करावीत. तसेच व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## महसूल मंत्री बावनकुळे यांचे माजी आ.कव्हेकरांकडून स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्याच्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे लातूर दौऱ्यावर आले असताना त्यांच्या पाटील प्लाझा येथील पक्षाच्या नियोजित कार्यक्रम स्थळी त्यांची भेट घेऊन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी चंद्रशेखर बावनकुळे व माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्यामध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी माजी कामगार कल्याण मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, माजी खा.डॉ. सुनिल गायकवाड, भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरूनाथ मगे, देविदास काळे, लातूर मनपाचे माजी गटनेते शैलेश गोजमगुंडे, पृथ्वराज बायस आदी मान्यवर उपस्थित होते.




## मनपा निवडणुकीत तीन प्रभागांसाठी एका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तीन प्रभागांत एक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. मनपा आयुक्त मानसी मीना यांनी मंगळवारी निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून आढावा बैठक घेतली.

लातूर शहर महानगरपालिका लातूर सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांनी एकूण ६ उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक निर्णय अधिकारी व ६ तहसीलदार संवर्गातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची निवड करण्याचे आदेश दिले होते.

उपजिल्हाधिकारी संवर्गातील ल निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक म्हणून तहसीलदार. त्यानुसार शरद झाडके, उपविभागीय अधिकारी निलंगा, मंजुषा लटपटे, उपविभागीय अधिकारी अहमदपूर, रोहिणी नन्हे, उपविभागीय अधिकारी लातूर अविनाश कोरडे उपविभागीय अधिकारी औसा- रेणापूर सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी, उदगीर व संदीप कुलकर्णी उपजिल्हाधिकारी (पुनर्वस) यांच्या नियुक्ती करण्यात आली आहे.

**कर्मचारी नेमणूक, प्रशिक्षण सुविधांवर चर्चा**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासोबत तीन सहाय्यक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय आदेश तयार करणे, राजकीय पक्ष व पत्रकारांच्या बैठका आयोजित करणे, निवडणूक कामासाठी कर्मचारी नेमणूक करणे, कर्मचारी प्रशिक्षण, मतदान केंद्रावरील सोयी सुविधा, स्ट्राँगरुम व मतमोजणी केंद्र, एक खिडकी कक्ष, निवडणूक खर्च व पर्यवेक्षण, आचारसंहितेची प्रभावी अंमलबाजावणी इत्यादी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



**लातूर :** लातूर येथून दुचाकीने गावाकडे निघालेल्या दोन युवकांचा कारच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना जोगन चिंचोली येथे घडली. या घटनेत कारसहर दुचाकीचेही नुकसान झाले आहे.

## शासकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग उद्या बंद राहणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** दर्शवेळा अमावस्यानिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ रोजी बंद राहील. तसेच शनिवार, २० डिसेंबर २०२५ पासून शासकीय सुट्टीच्या दिवशी बाह्यरुग्ण विभाग (ओ. पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

## एचएसआरपी नंबर प्लेट वेळेत बसवा, दंड टाळा!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांना एचएसआरपी बसविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याबाबत शासनाद्वारे नियुक्त करण्यात आलेले अधिकृत एचएसआरपी फिटमेंट सेंटरर्स येथे क्ष्ठझ बसविण्याची कार्यपध्दती व इतर सर्वप्रकारची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी लातूर जिल्ह्यातील वाहन वाहनधारकांनी या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरून ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असेही आवाहन आशिषकुमार अय्यर कंकरेज यांनी केले आहे.

## बाल वैज्ञानिक परीक्षेत शारदा स्कूलचे यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी होमी भाभा बालवैज्ञानिक राज्यस्तरीय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात उपाध्यक्ष एल. एम. पाटील यांच्या नियोजनात सहावी व नववीतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. यात सहावीतील दुर्वा नागेश बाळे हिची दुसऱ्या स्तरावरील प्रात्यक्षिक फेरीसाठी निवड झाली आहे.

सहावीतील दुर्वा बाळे, तन्मय दुडिले, श्रीराज गुट्टे, श्रावणी आर्या, विघ्नेश तारडे, संभुराजे क्षीरसागर, स्वरांजली कोकाटे, समर्थ गिरी, अर्णव घोगरे, शंकर पाटील व नववीतील राशी अणमुलवाड, उमर सय्यद, ऋतुजा धावरे, धन्वंतरी भंडारे, पूनम आयनिले हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल प्राचार्य लक्ष्मण पुरी, मार्गदर्शक नुपूर पवार, ऐश्र्वर्या बागल, बालाजी जंगम, राधाकिशन चव्हाण व तुकाराम सूर्यवंशी यांनी कौतुक केले आहे.

## गोल्डक्रेस्ट हाय स्कूलच्या वतीने आयोजित 'संगीत रजनी'स उत्स्फूर्त प्रतिसाद










**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ डिसेंबर :** गोल्डक्रेस्ट हाय स्कूल, लातूर यांच्या वतीने आयोजित ओपन-एअर म्युझिकल व आर्ट कॉर्नर प्रदर्शन कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा भव्य कार्यक्रम मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता क्रीडा संकुल, लातूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'आरंभ है प्रचंड', 'एक जिंदगी', 'अलबेला साजन', 'सौ तरह के', 'कंधो से मिलते है कंधे', 'मेरे ढोलना', 'चले छैया छैया', 'बॉलीवूड मॅशअप', 'तेरे लिए' आणि 'बुलेया' या गीतांवर आधारित गायन, वादन व नृत्य सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

इयत्ता सहावी ते नववीतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही विविध सादरीकरणांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेष आकर्षण ठरलेले ऑर्केस्ट्रा सादरीकरण तसेच शिक्षक-विद्यार्थ्यांचे संयुक्त सादरीकरण यांना प्रेक्षकांकडून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट मिळाला.

कार्यक्रमस्थळी विद्यार्थ्यांनी साकारलेले आर्ट कॉर्नर प्रदर्शन हे त्यांच्या कल्पकतेचे व सर्जनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण ठरले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्रित सादर केलेले 'हम साथ चले तो' हे समूहगीत भावस्पर्शी ठरले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, नियोजनबद्ध व अत्यंत दर्जेदार पद्धतीने पार पडला.

या कार्यक्रमातून गोल्डक्रेस्ट हाय स्कूलचा सर्वांगीण विकास, कला, संस्कृती व शैक्षणिक गुणवत्तेचा सुंदर संगम प्रेक्षकांसमोर सादर झाला. पालक, विद्यार्थी व नागरिकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विश्वजीत ठाकूर उपस्थित होते. तसेच शाळेच्या प्राचार्या उषाकिरण सूद, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.